CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक १ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



राष्ट्रदेवाच्या श्रीचरणी, आपल्या तारुण्याची तीन वर्षे अर्पण करणे ही सामान्य गोष्ट नाही. जीवनभर अभिमान बाळगावा अशी ही गोष्ट आहे. प्रचारक जीवनात प्राप्त झालेले लोकसंग्रहाचे संस्कार त्याला जीवनभर साथ देत राहतील.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका वंदनीय मावशी केळकर यांचा आज तिथीनुसार स्मृतिदिन

# अल फलाह विद्यापीठातील १५ डॉक्टर बेपत्ता




- शाहीनच्या व्हॉट्सअॅप ग्रुपमधील दोनशे जण रडारवर
- दहशतवादी मॉड्यूलमधील चार डॉक्टरांची नोंदणी रद्द

◆ **नवी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

दिल्लीतील कार बॉम्बस्फोट प्रकरणात सहभागी असलेल्या उच्चशिक्षित दहशतवादी मॉड्यूलशी संबंध असेलेले अल फलाह विद्यापीठातील १५ डॉक्टर बेपत्ता आहेत. तपास यंत्रणांना त्यांच्या मोबाईलचे लोकेशन मिळविण्यात अद्याप यश आलेले नाही आणि या डॉक्टरांचा घटनेनंतर कुटुंबासोबतही संपर्क नसल्याचे तपासात उघड झाले. याशिवाय फरिदाबाद दहशतवादी मॉड्यूलमध्ये अटक करण्यात आलेली डॉ. शाहीन सईद हिच्या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये दोनशे डॉक्टरांचा समावेश असून त्यांचाही शोध सुरू आहे. विशेष असे की, यातील बहुतांश डॉक्टर काश्मिरातीलच आहे.

हरयाणाच्या फरिदाबाद दहशतवादी मॉड्यूलसंदर्भात अटक करण्यात आलेले चार डॉक्टर डॉ. मुझफ्फर अहमद, डॉ. आदिल अहमद, डॉ. मुझम्मिल गनई आणि डॉ. शाहीन सईद यांचे परवाने राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अर्थात् एनएमसीने शनिवारी रद्द केले. दिल्लीत बॉम्बस्फोट घडविणारा डॉ. उमर नबी आणि फरिदाबाद दहशतवादी मॉड्यूलमध्ये सहभागी असलेला डॉ. मुझम्मिल गनईच्या संपर्कात असेलेले अल फलाह विद्यापीठातील १५ डॉक्टर बेपत्ता असल्याची माहिती तपास पथकातील एका अधिकाऱ्याने दिली. त्यांच्या शोधासाठी विविध पथके रवाना करण्यात आली. मुझम्मिलच्या कॉल डिटेल्सच्या आधारे तपास यंत्रणांनी त्याच्याशी अनेक वेळा बोललेल्या डॉक्टरांशी संपर्क साधला, परंतु त्यांचे फोन बंद आहे.

फरिदाबाद मॉड्यूलची प्रमुख सदस्य डॉ. शाहीनने पाकिस्तानसह अनेक देशांमध्ये तिचे नेटवर्क पसरवले होते. ती अनेक काश्मिरी वंशाच्या डॉक्टर आणि विद्यार्थ्यांशी संपर्कात होती, ज्यात एका पाकिस्तानी लष्कराच्या डॉक्टरचाही समावेश आहे. तिच्या संपर्कात उत्तर प्रदेशातील २०० काश्मिरी वंशाचे डॉक्टर आणि वैद्यकीय विद्यार्थी होते, तर देशभरात ही संख्या हजारपेक्षा जास्त असल्याचे तपासात समोर आले. ◀(वृत्तसंस्था)

### अल फलाह विद्यापीठाविरुद्ध गुन्हे




**दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने अल फलाह विद्यापीठाविरुद्ध दोन एफआयआर दाखल केले. एक एफआयआर फसवणुकीशी संबंधित आहे, तर दुसरी बनावटगिरीच्या कलमांखाली आहे. पोलिसांनी विद्यापीठाला नोटीसही बजावली असून त्यांना काही नोंदी मागितल्या आहेत. शनिवारी दिल्लीच्या ओखला येथील विद्यापीठाच्या कार्यालयात पोलिसांनी छापा टाकला.**

### अनेक देशांमध्ये नेटवर्क स्थापन

एनआयएच्या चौकशीतून डॉ. शाहीन आणि डॉ. मुझम्मिल यांनी पाकिस्तान, मलेशिया, तुर्की, यूएई, मालदीव आणि बांगलादेशसह अनेक देशांमध्ये नेटवर्क स्थापन केल्याचे समोर आले. दिल्लीतील अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून परदेशात पळून जाण्याची योजना आखली होती. डॉ. शाहीनने व्हिसासाठी अर्जही केला होता.

### सूत्रधार अफगाणमध्ये

दहशतवादी मॉड्यूलमध्ये पकडण्यात आलेला डॉ. आदिलचा मोठा भाऊ डॉ. मुजफ्फर हा दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणाचा सूत्रधार असल्याचे तपासात समोर आले असून तो दुबईतून अफगाणमध्ये पसार झाला. त्याच्याविरोधात लवकरच रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात येईल. दिल्लीतील कार स्फोटात आठ आरोपींमध्ये त्याचाही समावेश आहे. तो जैशच्या उकाशा नावाच्या हँडलरच्या संपर्कात असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

### पठाणकोट, प. बंगालमधून दोघांच्या आवळल्या मुसक्या

**नदी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात तपास यंत्रणांनी शनिवारी पंजाबमधील पठाणकोट येथून ४५ वर्षीय डॉ. रईस अहमद भट्ट याला अटक करण्यात आली. तो जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग येथील रहिवासी आहे. तो फरिदाबादमधील अल-फलाह विद्यापीठात चार वर्षे काम करत होता.

याशिवाय पश्चिम बंगालमधील उत्तर दिनाजपूर येथून एमबीबीएसचा विद्यार्थी निसार आलम याला अटक केली, तो अल-फलाह विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. त्याच्याकडून डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. ◀(वृत्तसंस्था)

# मुंबई मनपा निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार : चेन्निथला

## पक्षाच्या उमेदवारांना संधी देण्याची कार्यकर्त्यांची मागणी




◆ **मुंबई, १५ नोव्हेंबर**

मुंबई महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला असून, याबाबतची घोषणा मुंबई काँग्रेसच्या एकदिवसीय शिबिरात काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केली.

काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी स्वबळावर लढण्याची मागणी केली असून, २२७ जागांवर पक्षानं स्वतःच्या उमेदवारांना संधी द्यावी, अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. ही निवडणूक स्थानिक पातळीवरील असून, स्थानिक नेत्यांच्या भावना आणि कार्यकर्त्यांच्या इच्छेला महत्व द्यायला हवं, असं रमेश चेन्निथला यांनी काँग्रेसच्या एकदिवसीय शिबिरामध्ये स्पष्ट केले.

आगामी महापालिका निवडणूक स्थानिक पातळीवरची असल्यामुळं स्थानिक स्तरावरील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना उमेदवारीची संधी द्यावी, असं पक्षाचं मत आहे. मात्र, मुंबईमधील आणि इतर जिल्ह्यातील आघाडीबाबतचे निर्णय वेगवेगळे घेतले जाऊ शकतात, कारण प्रत्येक जिल्ह्यातील परिस्थिती वेगवेगळी असल्यानं, स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन निर्णय घेतले जातील. असे सांगताना, पक्षश्रेष्ठींच्या निर्देशानुसार मुंबईमध्ये आघाडी केली जाऊ नये, असा निर्णय घेतल्याचं यावेळी चेन्निथला यांनी आवर्जून सांगितले. काँग्रेसचे नेते कार्यकर्ते स्वबळाची भाषा वारंवार करतच होते. तसा निर्णय राज्याच्या कार्यकारीणीत घेऊन दिल्लाला कळवला होता. त्यानुसार आता स्वबळावर लढण्याचा निर्णय अखेर काँग्रेसने जाहीर केला. ◀(तभा वृत्तसेवा)

# लालूंच्या कुटुंबात कलह

## कुटुंबीयांशी फारकत, राजकारण सोडले; रोहिणीची घोषणा

◆ **पाटणा, १५ नोव्हेंबर**

राजदच्या झालेल्या पराभवासाठी पक्षातील अंतर्गत राजकारण जबाबदार आहे वेळोवेळी मी यासंदर्भात सतर्क केले. मात्र कुणीच लक्ष दिले नाही. आता मी राजकारण सोडत असून कुटुंबासोबचे सर्व संबंध तोडत असल्याची घोषणा लालूप्रसाद यादव यांची कन्या रोहिणी आचार्य यांनी केली. रोहिणी यांच्या टिप्पणीने लालू कुटुंबात कलह निर्माण झाला आहे.

पक्षाच्या पराभवानंतर लालूप्रसाद यादव यांची छोटी मुलगी आणि तेजस्वी यादव यांची बहीण रोहिणी आचार्य यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, मी राजकारण कायमचे सोडत आहे आणि मी माझ्या कुटुंबासोबतचे सर्व संबंधही तोडत आहे. संजय यादव आणि रमीज यांनी मला हेच करायला सांगितले होते. सगळ्या गोष्टींची जबाबदारी मी घेत आहे.



बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी लालूप्रसाद यादव यांनी त्यांचा मोठा मुलगा तेजप्रताप यादव यांच्यासोबतचे संबंध तोडले होते. तेजप्रताप यांनी वेगळा पक्ष काढून बिहार विधानसभा निवडणूक लढवली. निवडणुकीच्या निकालानंतर लालू कुटुंबात कलहाचे वातावरण आहे. राजकीय संघर्ष यादव कुटुंबापर्यंत पोहोचला आहे. राज्यसभा खासदार संजय यादव हे राजदचे निवडणूक रणनीतीकार आहेत. रोहिणी यांनी सातत्याने त्यांच्या कार्यप्रणालीवर आक्षेप घेतले होते. ◀(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### अमोनियम नायट्रेटचा स्फोट होऊन ९ ठार, ३२ जखमी

**श्रीनगर :** फरिदाबाद येथून जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटचे नमूने घेताना जोरदार स्फोट झाल्याने ९ जणांचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास श्रीनगर येथील नौगाम पोलिस ठाण्यात घडली. स्फोटात ३२ जण जखमी झाले. जम्मू-काश्मीरचे पोलिस महानिरीक्षक नलिन प्रभात यांनी दिलेल्या माहितीनुसार जवळपास ३६० किलो अमोनियम नायट्रेट हरयाणतील फरिदाबाद येथून जप्त करण्यात आले होते. ही स्फोटके नौगाम पोलिस ठाण्यात ठेवण्यात आली होती. स्फोटकांची तपासणी करण्यासाठी ते प्रयोगशाळेत पाठविले जाणार होते. त्यासाठी नमूने घेण्याची प्रक्रिया सुरू असताना रात्री अचानक स्फोट झाला. यामध्ये फॉरेन्सिक सायन्स लेबोरेटरीचे तीन कर्मचारी, दोन फोटोग्राफर,दोन महसूल अधिकारी, एक शिंपी आणि एक तपास संस्थेचा अधिकारी, अशा ९ जणांचा मृत्यू झाला. स्फोटाची तीव्रता एवढी भीषण होती की एक किलोमीटर पर्यंत आवाज गेला. स्फोटामुळे आजूबाजूची घरांना तडे गेले असून पोलिस स्टेशनची इमारत कोसळून पडली, असे प्रभात यांनी सांगितले. या घटनेमागे दहशतवाद्यांचा हात नसून हा केवळ अपघात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ■

# तब्बल ५५ शाखाध्यक्षांनी सामुहिकपणे उगारले 'राजीनामास्त्र'

**शिवसेना शिंदे गटाचे वाढले 'टेन्शन' । जगताप व बागल गटात राजकीय सुंदोपसुंदी**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १५ नोव्हेंबर-**

नगरपरिषदा, नगरपालिका, नगर पंचायतच्या निवडणुकीची घोषणा झाली आहे. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत शिवसेना शिंदे गटाच्या करमाळा येथील दोन-तीन नव्हे तब्बल ५५ शाखाध्यक्षांनी सामुहिकपणे राजीनामास्त्र उगारल्याने पक्षसंघटनेचे जणू टेन्शन वाढले आहे. यावरुन माजी आमदार जयवंतराव जगताप व शिवसेना नेते दिग्विजय बागल गटात राजकीय सुंदोपसुंदी सुरु असल्याचे स्पष्ट होते.

शिवसेना शिंदे गटाकडून माजी आमदार जयवंतराव जगताप यांची करमाळा नगरपालिका निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची नियुक्ती होताच शिवसेना नेते दिग्विजय बागल यांच्या समर्थक असलेले तब्बल ५५ शाखाध्यक्षांसह अन्य पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत सामूहिक राजीनामास्त्र उगारले आहे. २० हजार सभासदांनी आपापले राजीनामे पक्षश्रेष्ठींकडे पोस्टाद्वारे पाठविणार आहेत. शिवसेना शाखाध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांच्या एका बैठकीत राजीनामा देण्याविषयी एकमुखी निर्णय घेण्यात आला. दिग्विजय बागल यांनी यापूर्वी शिवसेना शिंदे गटाकडून करमाळा विधानसभेची निवडणूक लढवली होती. करमाळा तालुक्यात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे.



माजी आमदार जगताप यांच्या नियुक्तीवरुन बागल गटाला डावलले जात असल्याची भावना बागल समर्थकांमध्ये निर्माण झाली आहे. या बैठकीस श्री मकाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक सतीश नीळ, आशिष गायकवाड, राजेंद्र मोहोळकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कुलदीप पाटील, आनंद ढेरे, रंगनाथ शिंदे, नवनाथ बदर, अशोक हनपूडे, संदीप शेळके, राणा वाघमारे, विजयसिंह हाके, रवी शेळके, अक्षय सरडे, केशव बोराडे, विशाल शिंदे, आनंद टेकाळे, विजय काळे, प्रशांत पवार, केशव शिवाजी बोराडे, संदीप गोडसे, महादेव माने, सतीश सोनवणे, दत्तात्रेय काळे, लहू पवार, सचिन शिंदे, पप्पू सरक, शहाजी काळे, दीपक हाके, संदीप हाके, सतीश घेडे, हेमंत शिंगरे, सुदाम झोळ, हेमंत गिरंजे, संजय डोळे, संतोष चांदणे, ओमकार करे, प्रमोद हाके, प्रतीक हाके, विशाल माने, किरण डोंगरे आदी उपस्थित होते.




# पाण्याखाली स्फोटके शोधणारे अनोखे उपकरण विकसित

- डीआरडीओच्या संशोधकांचे यश
- एमपी-एयूव्ही धोकादायक वस्तूंचा घेणार वेध

◆ **नवी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात् डीआरडीओने सोनार प्रणाली आणि कॅमेऱ्यांनी सुसज्ज असलेले मॅन-पोर्टेबल ऑटोनॉमस अंडरवॉटर व्हेईकल्स अर्थात् एमपी-एयूव्ही नावाचे अनोखे उपकरण विकसित केले. हे उपकरण पाण्याखाली भूसुरुंगांसारख्या धोकादायक वस्तूंचा शोध घईल आणि त्यांना निष्क्रिय देखील करेल. एमपी-एयूव्ही डीप लर्निंग तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. समुद्रातील धोके आणि मोहिमांसाठी हे उपकरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

संरक्षण विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, डीआरडीओने अत्याधुनिक स्वयंचलित एमपी-एयूव्ही उपकरण विकसित केले. सोनार प्रणाली आणि कॅमेऱ्याने सुसज्ज असलेले हे उपकरण भूसुरुंगांसारख्या धोकादायक वस्तूंना त्वरित शोधण्यास आणि ओळखण्यास मदत करणार आहे. हे उपकरण डीप लर्निंग तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे.



नवीन उपकरण विशाखापट्टणम येथील डीआरडीओच्या नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळेने विकसित केले आहे. ते पाण्याखालील खाण-संरक्षण मोहिमांसाठी डिझाईन केलेले आहे. या प्रणालीमध्ये साईड-स्कॅन सोनार आणि अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात आले. पाण्याखाली स्फोटके पेरून लढाऊ नौकांना उद्ध्वस्त करण्याचे प्रयत्न शत्रूकडून केले जाते. असे धोके त्वरित ओळखून हे उपकरण निष्क्रिय करते. ◀(वृत्तसंस्था)

### डीआरडीओ सचिवांकडून कौतुक

**डीआरडीओचे सचिव समीर व्ही. कामत यांनी उपकरणाच्या यशस्वी चाचणीबद्दल नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळेच्या पथकाचे अभिनंदन केले. त्यांनी म्हटले की, हे पाऊल सक्षम, स्मार्ट आणि नेटवर्क-आधारित अँटी-माईन सोल्यूशनच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण यश आहे.** ■

### कारवाईसाठी डेटा उपलब्ध होणार

पाण्याखाली आढळणाऱ्या संशयास्पद वस्तूंची स्वयंचलितपणे ओळख पटवून वर्गीकरण करता येणार आहे. यामुळे पाण्यातील मोहिमांसाठी मोठी मदत होणार आहे. उपकरण व्हॉईस कम्युनिकेशन प्रणालीने सुसज्ज आहे. यामुळे वेगवेगळ्या मोहिमांसाठी डेटा उपलब्ध होऊ शकेल आणि त्याचा वापर शत्रूविरोधात कारवाई करण्यासाठी होईल. या उपकरणाची अलिकडेच यशस्वी चाचणी प्रणालींचे प्रमुख तांत्रिक पॅरामीटर्स आणि मिशन उद्दिष्टे यशस्वीरीत्या सत्यापित झाली आहेत. या उकरणाचे उत्पादन काही महिन्यांत सुरू होईल. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...



### महसूल विभागाकडून अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

वडकबाळ येथे सीना नदीपात्रातून अवैद्य वाळू भरणाऱ्या टेम्पोवर महसूल विभागाच्या पथकाकडून कारवाई करून ६० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करून वाहनचालकासह टेम्पोवर मंद्रूप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंद्रूप तहसीलदारांच्या आदेशानुसार मंडलअधिकारी ज्योतिबा पवार, राणा वाघमारे, वडकबाळच्या महसूल अधिकारी प्रिती साळुंखे, रावसाहेब कोकरे यांच्या पथकाला वडकबाळ येथे सीना नदीच्या जुन्या पुलावर क्रमांक नसलेल्या टेम्पोमधून वाळू भरण्यात येत असल्याची माहीती मिळाल्यावर तहसीलदार सुजित नरहरे यांच्या उतस्थितीत वाहनावर कारवाई करण्यात आली. यावेळी वाहनचालकाकडे रॉयल्टी भरल्याची पावती नसल्याने वाहनासह चालकावर गुन्हा दाखल करण्यात आले आहे. यावेळी वाळू १० हजार रूपये तर वाहनाची किंमत ५० हजार रूपये असे ६० हजार रूपयांचे मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. वाहनचालक महादेव खरात याच्याविरुद्ध मंद्रूप पोलीसात फिर्याद देण्यात आली आहे. अवैद्य वाळू व मुरूम उपसा करणाऱ्या वाहनचालकावर कारवाई करण्यात येणार असल्याचे महसीलदार नरहरे यांना सांगितले.



### अपघात टाळण्यासाठी नियमांचे पालन करा : विभागीय अधिकारी यामावार

**वळसंग दि. १५ नोव्हेंबर-**

ट्रॅक्टर चालकांनी रिफ्लेक्टरचा वापर करावा, ड्रिंक-ड्राईव्ह प्रतिबंध, वाहनांवर रिफ्लेक्टर टेप लावणे तसेच अपघात टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या वाहतूक सुरक्षेच्या नियमांचे पालन करावे, अशी सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर व सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे यांनी दिली. वळसंग पोलीस ठाणे हद्दीतील गोकुळ शुगर कारखाना, धोत्री येथे ऊस वाहतूक करणाऱ्या सर्व चालकांची बैठक आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकी दरम्यान वाहनांवर रिफ्लेक्टिव्ह टेप लावणे अनिवार्य, मद्यप्राशन करून वाहन चालवण्यास सक्त मनाई, रात्रीच्या वेळी लाईट, इंडिकेटर, रिफ्लेक्टर तपासून वापरणे, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून अपघात प्रतिबंध, अवैध पार्किंग, रिव्हर्स किंवा ओव्हरटेक टाळणे असे अनेक नियमांचे पालन करण्याची सूचना दिली. बैठकीस कारखान्याचे पदाधिकारी तसेच ७० ते ७५ ऊस वाहतूक चालक व ट्राफिक अंमलदार उपस्थित होते.




### सौर जल-क्षारीकरण प्रणालीवर डॉ. संतोष डोंगरे यांची पीएच.डी.

**पंढरपूर, दि. १५ नोव्हेंबर-**

स्थानिक संशोधक डॉ. संतोष द. डोंगरे यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयात सौर जल-क्षारीकरण प्रणाली या संशोधन विषयावर आपला पीएच.डी. संशोधन प्रबंध यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. या संशोधन चे सादरीकरण ८ ऑगस्ट रोजी ओरिएंटल युनिव्हर्सिटी, इंदौर येथे करण्यात आले. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी नवनियुक्त कुलगुरू प्रा. (डॉ.) अमोल गोरे यांचे हस्ते डिग्री प्रदान झाली या संशोधनासाठी त्यांनी प्रा. (डॉ.) एस. के. सोमाणी, माजी कुलगुरू, ओरिएंटल युनिव्हर्सिटी इंदौर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सह-मार्गदर्शक प्रा. (डॉ.) एच. एस. पाटील, प्राचार्य, GIDC कॉलेज, नवसारी (गुजरात) यांचे सहकार्य मिळाले. डॉ. संतोष डोंगरे यांचे संशोधन हे पिण्यायोग्य पाण्याच्या टंचाईच्या समस्येवर उपाय शोधणारे असून, सौर ऊर्जेचा वापर करून समुद्रातील अथवा खाऱ्या पाण्यापासून स्वच्छ व शुद्ध पाणी मिळविण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण मानले जात आहे. या अभिनव संशोधनात सौर परबोलिक डिश, घरगुती कुकर आणि कॉम्पॅक्ट कंडेन्सर यांचा एकत्रित वापर करून एक नवीन हायब्रिड डीसेलिनेशन सिस्टम विकसित करण्यात आले आहे. या कार्यासाठी सतत प्रेरणा देणारे पंढरपूर येथील रहिवासी प्रा. (डॉ.) अतुल अ. सागडे (रिसर्च सायंटिस्ट, थॉम्पसन रिसर्च लॅब, एरिका, इटली) यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या अध्यक्षपदी नंदकुमार देशपांडे

**पंढरपूर, दि. १५ नोव्हेंबर-**





अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची बैठक जिल्हाध्यक्ष शशिकांत हरीदास यांचे अध्यक्षतेखाली ज्येष्ठ मार्गदर्शक सुभाष सरदेशमुख, दीपक इरकल, प्रांत सहसंघटक विनोद भरते, प्रांत सदस्य जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये जिल्हा सचिव सुहास निकते यांच्या उपस्थितीत शहर तालुका अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात येऊन अध्यक्षपदी नंदकुमार देशपांडे, उपाध्यक्षपदी भाळवणी येथील प्रशांत माळवदे यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी ओझर येथे झालेल्या कार्यकर्ता शिबिराची माहिती शशिकांत हरीदास जिल्हाध्यक्ष व दीपक इरकल यांनी दिली. पदाधिकाऱ्यांच्या निवडी पुढील प्रमाणे : सचिवपदी महेश भोसले सहसचिव आझाद अल्लापुरकर कोषाध्यक्ष सागर शिंदे यांच्या पदाच्या निवडी घोषित केल्यानंतर कार्यकारणी सदस्य म्हणून धनंजय पंडीत,संजय खंडेलवाल, सतीश निपाणकर, मंगेश देशपांडे, शशिकांत सुगंधी, इंद्रजीत फडे, शाम तापडिया, शहाजी जाधव, शहाजी ठोंबरे आदींचा यामध्ये समावेश करण्यात आला. या निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार शशिकांत हरिदास, विनय उपाध्ये दीपक इरकल यांच्या हस्ते करण्यात आला.

# पंधरा दिवसांत ७०० दुरुस्ती प्रस्ताव मंजूर

## शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचा विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

शालेय रेकॉर्डमध्ये अनेकवेळा विद्यार्थ्यांच्या नावात किंवा जन्मतारखांमध्ये चुका असतात. पहिली ते दहावीपर्यंतच नावात किंवा शाळेच्या रेकॉर्डमध्ये बदल करता येतो. त्यासाठी शिक्षण विभागाकडे प्रस्ताव दाखल करून त्यास मंजुरी मिळणे गरजेचे आहे. दहावी व बारावी परीक्षेच्या बोर्ड प्रमाणपत्रावर आलेले नाव शेवटपर्यंत कायम राहते. त्यामुळे शाळांच्या प्रम णपत्र व दाखल्यावरील दुरूस्ती करण्यासाठी पालक व विद्यार्थी वारंवार शिक्षणाधिकारी कार्यालयाला चकरा मारतात. मात्र अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे दुरूस्तीऐवजी मनस्ताप सहन करावा लागतो. शिक्षण विभागाच्या मंजुरीशिवाय त्यामध्ये मुख्याध्यापकांना बदल करता येत नाही. नाव, स्पेलिंग, प्रमाणपत्र व विविध दुरूस्तीच्या ७०० प्रस्तावांना शिक्षणाधिकारी कार्यालयाला मंजूरी दिल्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दुरूस्ती प्रस्तावांना प्राधान्य देऊन पालक व विद्यार्थ्यांचा त्रास कमी केला आहे. शैक्षणिक नोंदीमधील अडचणी दूर केल्या केल्याने विद्यार्थी व पालकांमधून शिक्षणाधिकाऱ्यांचे कौतुक करण्यात येत आहे. आधारकार्ड व जन्मदाखल्यावर वेगळे नाव, जन्मतारखेत चुका, नावाच्या अक्षरात म ागेपुढे, स्पेलिंगमध्ये बदल, काना-मात्रा वेगळा, वडिलांच्या नावात बदल, जन्मतारखेतील महिना वेगळा, तारीख वेगळी, आडनावात चुका चुका शाळा व पालकाकडून झालेले असतात. शैक्षणिक कागदपत्रातील चुकांमुळे अडचण निर्माण होऊ नये यासाठी विद्यार्थी व पालक जन्मदाखल्याप्रमाणेच नाव व जन्मतारीख व्हावी यासाठी शाळेकडे हेलपाटे मारतात. शाळेकडून कागदपत्रासह प्रस्ताव शिक्षण विभागाकडे सादर केला जातो. त्या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर मुख्याध्यापक आपल्याकडील रेकॉर्डवरील नावात व जन्मतारखेत बदल करतात.

> शाळेच्या कागदपत्रांमध्ये चुका व बदल असल्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात त्रास सहन करावे लागते. त्यामुळे नावात व जन्मतारखेत बदलाचे ७०० हून अधिक प्रस्ताव दाखल झाले होते. कागदपत्रांची पडताळणी करून पंधरा दिवसात ७०० प्रस्ताव मंजूर केले आहेत. यामुळे विद्यार्थी व पालक यांचे वेळ व पैशाची बचत होणार आहे. पालकांनी, शाळांनी माध्यमिक शिक्षण विभागातून हे मंजुरी आदेश तातडीने घेऊन जावेत.
>
> **सचिन जगताप**
> माध्यमिक शिक्षणाधिकारी,
> जिल्हा परिषद.

> शाळांच्या दप्तरमध्ये पालक व विद्यार्थी यांच्या नजरचुकीमुळे चुका झालेले असतात. त्यांची दुरूस्ती करून घेण्यासाठी दहावी व बारावीपर्यंत संधी असते. असे प्रस्ताव माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी १५ दिवसात ७०० प्रस्ताव मंजूर करून पालक व विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. त्यामुळे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचे काम कौतुकास्पद आहे.
>
> **सुनिल व्हनमाने,** अध्यक्ष, पालक संघ, मंद्रूप



### उत्कर्ष विद्यालयात बालदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १५ नोव्हेंबर-**

येथील उत्कर्ष प्राथमिक विद्यालयात बालदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी लोकमंगल बँकेचे संचालक विजय कुलकर्णी, सल्लागार ॲड. गजानन भाकरे, व्यवस्थापक शिवाजी दरेकर, संस्थेच्या संस्थापिका डॉ. संजीवनी केळकर, दमयंती कुलकर्णी, वसुंधरा कुलकर्णी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

प्रास्ताविक शिवाजी दरेकर यांनी केले. ॲड. गजानन भाकरे यांनी जिद्द, धाडस आणि चिकाटी ठेवा, यश हमखास प्राप्त होईल. तसेच सर्व सत्ता येतील जातील परंतु बालपण परत येणार नाही असे मनोगतातून सांगितले. यावेळी बँकेमार्फत घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे प्राचार्य सुनील कुलकर्णी, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शिक्षिका रसाळ यांनी केले. आभार शिक्षक शेळके यांनी मानले. बालदिनानिमित्त इ.१ ते ४ च्या वर्गामध्ये विविध मनोरंजनात्मक खेळ घेत गाणी, गोष्टी व चित्रपट यांचे व्हिडिओ क्लिप दाखवण्यात आले.

## पिलीव बसस्थानक येथील मुख्य चौक कधी घेणार मोकळा श्वास?

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१५ नोव्हेंबर-**

सोलापूर-सातारा महामार्गावरील माळशिरस तालुक्यातील पिलीव हे मुख्य बाजारपेठ असणारे गाव असून याठिकाणी कायम रहदारी असते. पिलीव बसस्थानक येथील मुख्य चौकातील काम गेल्या पाच ते सहा वर्षांपासून रखडले असल्याने वाहतुकीचा पुरता बोजवारा उडाला आहे. याकडे लक्ष वेधताना येथील मुख्य चौक मोकळा श्वास कधी घेणार? असा संतापजनक सवाल उपस्थित केला जात आहे.

संबंधित ठेकेदाराने गेल्या पाच-सहा वर्षांपासून येथील काम रखडविले आहे. याठिकाणी ना डिव्हायडर, ना वाहतुक नियंत्रण रेषा, ना लाईट अशी विदारक चित्र दिसून येत आहे. विशेष म्हणजे, पदपथावरील विक्रेत्यांसह अस्ताव्यस्तपणे रस्त्याच्या कडेला लावण्यात येणारी चारचाकी व दुचाकी वाहने यामुळे या चौकातून जा-ये करणे मुश्कीलीचे बनले आहे.



पोलीस चौकीसमोरच वाहने अस्ताव्यस्त लावलेली असतात. बचेरी चौकापासूनच गाडीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. पिलीव बसस्थानकापासून जवळच कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह विद्यार्थ्यांनाही येथील अतिक्रमणाचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांसह विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने या परिसरातील अतिक्रमण हटविण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

### बुधवारी निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

बुधवार, दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी, श्री शुभराय महाराज मठ येथे, बालसप्ताह निमित्त शालेय निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ आयोजित केला आहे. श्री शुभराय महाराज मठ आणि पाखर संकुल, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या निबंध स्पर्धेला सोलापूर शहरातील खूप शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बक्षीस वितरण समारंभात स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी आणि शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित राहणार आहेत. सर्वांनी वेळेवर उपस्थिती रहावे आणि कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन मठाचे श्रीमती शुभांगी बुवा यांनी केली आहे.




### लोकमंगल महाविद्यालयात बालदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

लोकमंगल कृषी महाविद्यालय-वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत बालदिन म्हणजेच पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ.अमोल शिंदे हे अध्यक्षस्थानी होते. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी योगिता शिंदे हिने प्रास्ताविक केले.

रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा.अजित कुरे यांच्यासह संजना पाटील, संस्कार ठेले, सानिका सावंत आणि साक्षी काळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. प्रणिती चोरमले हिने आभार मानले. गौरव शिंदे याने सूत्रसंचालन केले. याप्रसंगी प्रा.सुजाता चौगुले, प्रा.नम्रता गोरे यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होते.



### दक्षिण सोलापूर तालुका युवक काँग्रेस अध्यक्षपदी अनंत म्हेत्रे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून काम केलेले व युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव असणारे अनंत म्हेत्रे यांची दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. काँग्रेसच्या खासदार प्रणिती ताई शिंदे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनानुसार त्यांची तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रा. सातलिंग शटगार, शहराध्यक्ष चेतन नरोटे, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष भीमाशंकर जमादार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शहराध्यक्ष गणेश डोंगरे, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, माजी महापौर संजय हेमगड्डी, मंद्रुपचे राहुल म्हेत्रे, राहुल भागवत, वागेश म्हेत्रे, नागनाथ नंदुरे, संदीप अडोळे, अमित देशम ुख, महादेव पराणे, महेश स्वामी, ओंकार शेंडगे, संजय म्हेत्रे, महेश म्हेत्रे, ज्ञानदीप म्हेत्रे आदी उपस्थित होते. म्हेत्रे यांच्या निवडीबद्दल कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

## ‘सुर्वेंची कविता म्हणजे शोषितांचा आवाज’

### सांगोल्यात पद्मश्री नारायण सुर्वे काव्य जागर व पुरस्कार वितरण




**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१५ नोव्हेंबर -**

समाजातल्या असंख्य प्रश्नांना आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजासमोर मांडणारे पद्मश्री नारायण सुर्वे हे प्रतिभावंत कवी होते. असंख्य कवितांच्या माध्यमातून स्वतःच्या जगण्यातलं वेदनामय चित्रण त्यांनी आपल्या कवितेत मांडलं. त्यांची कविता अंधारात चाचपडणाऱ्या व हतबल झालेल्या युवकाला प्रकाशाची वाट आहे. म्हणूनच सुर्वेंची कविता म्हणजे शोषितांचा आवाज आहे, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांनी केले. ते सांगोला विद्यामंदिर येथे पद्मश्री नारायण सुर्वे जन्मशताब्दी निमित्त आयोजित केलेल्या काव्य जागर व पुरस्कार वितरण कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सुदाम भोरे, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, काळ्या मातीत मातीत तिफन चालते या गीताचे गीतकार डॉ. विठ्ठल वाघ, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी कल्याणराव शिंदे, डॉ.द.ता.भोसले यांच्या सहचारिणी प्रा.स्वाती भोसले, कवयित्री स्मिता पाटील, ज्येष्ठ साहित्यिक कृष्णा इंगोले, प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बाजीराव सातपुते यांनी पद्मश्री नारायण सुर्वे यांचा जीवन परिचय दिला. त्यानंतर काव्य जागर या कार्यक्रमात जयश्री श्रीखंडे, प्रतिमा काळे, रजनी कानडे, राजेंद्र वाघ, कुमार खोंद्रे, स्मिता पाटील, सुधीर इनामदार, इंद्रजीत घुले व मानसी चिटणीस यांनी नारायण सुर्वे यांच्या कवितांचे सादरीकरण केले. प्रास्ताविक पुरुषोत्तम सदाफुले यांनी केले. याप्रसंगी डॉ.विठ्ठल वाघ यांच्या आवाजात काळ्या मातीत मातीत तिफन चालते या कवितेने सभागृह मंत्रमुग्ध झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दिगंबर ढोकळे यांनी केले.

> **यांचा झाला सन्मान**
>
> पद्मश्री नारायण सुर्वे संस्कारक्षम संस्था- सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला, पद्मश्री नारायण सुर्वे जीवन गौरव पुरस्कार-कवी विठ्ठल वाघ, मास्तरांची सावली पुरस्कार-प्रा.स्वाती भोसले, काव्यप्रतिभा पुरस्कार-कवयित्री डॉ.स्मिता पाटील, साहित्य पुरस्कार-डॉ.सागर भजनावळे यांचा कुंपण व कवी सुधाकर इनामदार यांचा माझे दगडाचे हात पुस्तकासाठी.

# जिल्हा परिषद शाळांकडून शासनाच्या आदेशाला केराची टोपली

## शासन नियमानुसार सकाळी नऊ वाजता शाळा भरविण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

सकाळची शाळा नऊऐवजी साडेसात वाजता सुरू केल्याने लहान मुलांच्या मानसिक आणि शारिरीक स्वास्थ्यावर परिणाम होत असल्याने व अनेक ठिकाणी मुले शाळत झोपत असल्यामुळे महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल रमेश बैस यांनी सर्व शाळांना आदेश देऊन सकाळच्या सत्रातील शाळा नऊ वाजल्यानंतर भरविण्याचे आदेश दिल होते. राज्यपालांच्या आदेशानंतर काही काळ शाळा सकाळी नऊ वाजता भरविण्यात आले. मात्र शिक्षक संघटनांनी आंदोलन करून सकाळच्या वेळेत बदल करून घेतले. त्यामुळे ग्रामीण भागातील शाळा सकाळी पुन्हा साडेसात वाजताच भरविण्यात येत आहे. त्यामुळे शाळा प्रशासनासह शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक राज्यपालांसह शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत असल्याचे दिसून येते.

चिमुकल्यांची पुरेशी झोप व्हावी म्हणून प्राथमिक शाळा सकाळी नऊनंतरच भरवाव्यात, असे निर्देश तत्कालीन राज्यपाल रमेश बैस यांनी दिले होते. त्याची दखल घेत शालेय शिक्षण विभागाने ८ फेब्रुवारी २०२४ रोजी पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शाळा सकाळी नऊनंतर भरविण्याचे परिपत्रक काढले. परंतु त्याला बहुतांश शाळांनी हरताळ फासला. सकाळी सात ते आठ या वेळांमध्येच शाळा भरवण्याचा हट्ट कायम ठेवला आहे. सध्या थंडीचे दिवस असून या काळात मुले उशिरा उठतात. पुरेशी झोप न झाल्यामुळे मुलांमध्ये आळस निर्माण होते. त्यामुळे सकाळी नऊ वाजल्यानंतर शाळा भरले तर मुलांच्या अभ्यासावर परीणाम होणार नाही. थंडीमुळे मुलांना कुडकुडतच शाळा गाठावी लागते. त्यांची तयारी करण्यासाठी पालकांना पहाटे पाच वाजताच उठावे लागते. झोप अपूर्ण झाल्यामुळे बेंचवर बसल्यानंतर काही मुले पेंगत असतात. थंडीच्या दिवसांत सर्वच शाळांमध्ये हे चित्र असते. पण लहान मुलांच्या या त्रासाकडे दुर्लक्ष करून मुख्याध्यापक व शिक्षक स्व:ताच्या सोईसाठी सकाळी साडेसात वाजता शाळा भरविण्यावर ठाम आहेत. शिवाय अनेक शिक्षकांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत ठराव करून या निर्णयावर शिक्कामेर्तब केला आहे. त्यामुळे शिक्षणधिकारी व जिल्हा परिषदेला शाळेवर कारवाई करताना अडचणी येत आहेत. दुसरीकडे जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडून कारवाई करताना हलगर्जीपणा होत असल्याचे पालकांमधून सांगण्यात येत आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांना भेटी देऊन शासनाच्या नियम ांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. शिक्षकांच्या सोईपेक्षा मुलांच्या मानसिक स्वास्थ्याचा विचार करण्यावर भर देण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीलाही मार्गदर्शन करावे. तसेच वेळोवेळी ग्रामीण भागातील शाळांना भेटी देऊन कारवाई करणे अपेक्षित आहे.

> **शाळा व्यवस्थापन समितीला अधिकार**
>
> सकाळी नऊ वाजता शाळा भरविण्याचे आदेश सर्व शाळांना पूर्वीच देण्यात आले आहेत. त्यामुळे शाळा व्यवस्थापन समितीला शाळेच्या वेळेत बदल करण्याचा अधिकार आहे. मात्र शाळेच्या वेळेत बदल करताना शिक्षण विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. शाळेच्या वेळेत बदल करण्यासाठी जिल्ह्यातून अनेक प्रस्ताव आले आहेत. त्यापैकी २० प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे. शाळांनी शासनाच्या आदेशाचे पालन करावे.
>
> **कादर शेख,** प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर

> **व्यायामासाठी योग्य वेळ**
>
> सकाळच्या सत्रात साडेसातला शाळा भरविल्याने मुलांना कवायत व व्यायाम करून घेण्यासाठी योग्य वेळ आहे. शिवाय ग्रामीण भागातील पालक व मुले रात्री लवकर झोपत असल्यामुळे त्यांना सकाळी शाळेला सकाळी लवकर येण्यास त्रास होत नाही. शिवाय दुपारी घरी जाण्यास उशिर होत नाही. त्यामुळे सकाळच्या सत्रात शाळेची वेळ साडेसातच योग्य आहे.
>
> **अनिल म्हेत्रे,**
> शिक्षक, भंडारकवठे

> **थंडीचे दिवस असल्याने...**
>
> सध्या थंडीचे दिवस असल्याने सकाळी लवकर उठल्याने मुलांची झोप पुरेशी होत नाही. त्यामुळे मुलांमध्ये चिडचिडेपणा दिसून येत आहे. सकाळी नऊ वाजल्यानंतर शाळा भरविल्यास मुलांची झोप पूर्ण होऊन मुले 'फ्रेश मूड'मध्ये शाळेला जाऊ शकतात. त्यामुळे सकाळच्या सत्रातील शाळा साडेसातऐवजी नऊ वाजता भरविण्यात यावे.
>
> **शरणप्पा हेळवी,** पालक, मंद्रूप

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# २५ पैकी २४ मंत्र्यांनी मारले मैदान

## जनप्रतिनिधी उतरले मतदारांच्या पसंतीला, एक जण पराभूत

◆ **पाटणा, १५ नोव्हेंबर**

नितीश कुमार मंत्रिमंडळातील तब्बल २५ मंत्र्यांना पुन्हा तिकीट देण्यात आले होते. यापैकी २४ मंत्री पुन्हा निवडून आले आहेत. २०२० मध्ये अपक्ष म्हणून निवडून आल्यानंतर मंत्री झालेले सुमित कुमार सिंह मात्र पराभूत झाले.

भारतीय जनता पक्षाचे उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी हे तारापूर तर विजय कुमार सिन्हा हे लखीसराय येथून विजयी झाले आहेत. कृषी मंत्री प्रेम कुमार हे गया, सुपौल येथून कृषी राज्यमंत्री बिजेंद्र यादव ,साहेबगंज येथून मंत्री राजू कुमार



सिंग हे विजयी झाले. २०२० मध्ये राजू कुमार सिंग हे विकासशील पक्षाच्या तिकीटावर विजयी झाले होते आणि नंतर ते भाजपात सामील झाले.

दरभंगा येथून संजय सरोगी आणि बांकीपूर येथून नितीन नाबीन हे सलग पाचव्यांदा विजयी झाले आहेत. दोघेही मंत्री आहेत. याशिवाय रेणू देवी (बेतीया), नितीश मिश्रा (जहांजापूर), निरज कुमार सिंग (छातपूर), केदार प्रसाद गुप्ता (कुरहानी) विजय कुमार मंडल (अमनौर), जिबेश कुमार (जाले), कृष्णानंदन पासवान (हरसिधी)आणि सुनील कुमार (बिहारशरीफ) हे सर्व मंत्री पुन्हा विजयी झाले. हे सर्व मंत्री भारतीय जनता पक्षाचे आहेत. सुमीर कुमार सिंह यांचा चकाई मतदारसंघात राजदच्या सावित्री देवी यांनी तेरा हजारांच्या फरकाने पराभव केला. *(वृत्तसंस्था)*

### विजयी झालेले जदयूचे मंत्री

**संयुक्त जनता दलाचे शीला कुमारी (फुलपारस), लेशी सिंह (धमधाना), रत्नेस सदा (सोनबारसा), मदन साहनी (बहादुरपूर), विजय कुमार चौधरी (सराईरंजन), जयंत राज(अमरपूर), श्रावण कुमार (नालंदा) आणि मोहम्मद जमा खान (चैनपूर) हे सर्व मंत्री पुन्हा विधानसभेत पोहचले आहेत.**

### भाजपचे सर्व मंत्री विजयी

**निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे निवडणुकीला भारतीय जनता पक्षाचे एकूण १५ मंत्री उभे होते. मतदारांनी या सर्व मंत्र्यांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. मात्र, नव्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश होईल की नाही, हे येणाऱ्या काही दिवसांतच समजणार आहे.**

### बिहार विधानसभा निवडणूक निकाल-२०२५

**एकूण जागा : २४३**



**रालोआ २०२ | महागठबंधन ३४ | इतर ७**

| पक्ष | जागा | पक्ष | जागा | पक्ष | जागा |
|---|---|---|---|---|---|
| भाजप | ८९ | राजद | २५ | एआयएमआयएम | ५ |
| जदयू | ८५ | काँग्रेस | ६ | बसपा | १ |
| लोजपा | १९ | माकपा (मा) | १ | आयआयपी | १ |
| हम | ५ | माकप (माले) | २ | - | - |
| रालोम | ४ | व्हीआयपी | - | - | - |

स्रोत : निवडणूक आयोग, भारत

### माजी खासदार सिंह भाजपातून निलंबित

◆ **पाटणा, १५ नोव्हेंबर**

पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत माजी केंद्रीय मंत्री आर.के. सिह यांच्यासह विधान परिषद आमदार अशोक कुमार आणि त्यांची पत्नी व कटिहारच्या महापौर उषा यांना निलंबित करण्यात आले आहे.

सिंह यांनी उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि भाजपच्या माजी प्रदेशाध्यक्षांवर टीका केली होती. चौधरी यांच्यावर गुन्हेगारी प्रकरणे असल्याचाही त्यांनी आरोप केला. तसेच भाजप नेते आणि माजी उपमुख्यमंत्री तारकेश्वर प्रसाद यांच्याविरोधात अशोक कुमार अग्रवाल यांनी कटिहार विधानसभेत मुलगा सौरभ याला विकासशील इन्सान पक्षाकडून उभे केले. त्यामुळे अग्रवाल यांना पत्नीसह सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. *(वृत्तसंस्था)*



बिहार विधानसभा निवडणुकीत चिराग पासवान यांच्या नेतृत्वातील लोकजनशक्ती पार्टी(राम विलास)चे १९ आमदार निवडून आले. चिराग यांनी शनिवारी पाटणा येथे या सर्व आमदारांची भेट घेतली

# जदयूच्या अवघ्या २७ तर भाजप उमेदवाराचा ९५ मतांनी विजय

## बिहारात अनेक ठिकाणी झाल्या चुरशीच्या लढती

◆ **पाटणा, १५ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी रालोआने निर्विवाद विजय मिळवत जोरदार मुसंडी मारली. रालोआने या निवडणुकीत २४३ पैकी तब्बल २०२ जागा जिंकत ऐतिहासिक विजय मिळविला. अशातच बिहारमधील संदेश, अगिआंव दोन मतदारसंघ सध्या चर्चेचा विषय ठरले आहे. संदेश मतदारसंघात जदयू उमेदवार रामचरण साह यांचा केवळ २७ मतांनी विजय झाला, तर अगिआंव मतदारसंघात भाजपाचे उमेदवार महेश पासवान यांनी केवळ ९५ मतांनी बाजी मारली. दोन्ही मतदारसंघात अगदी थोड्या फरकाने जय-पराजयाचा फैसला झाला.

बिहारमधील संदेश विधानसभा मतदारसंघात अगदी थोड्या फरकाने निकाल लागला. येथे जेदयूचे उमेदवार रामचरण साह यांनी केवळ २७ मतांनी विजय मिळवला. साह यांना ८० हजार ५९८ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी असलेले राजदचे दीपू सिंह यांना ८० हजार ५७१ मते मिळाली. जनसुराज्य पक्षाचे उमेदवार राजीव रंजन राज यांना ६०४० मते मिळाली.

याशिवाय अगिआंव मतदारसंघातही अगदी माफक फरकाने निर्णय झाला. येथे भाजपाचे उमेदवार महेश पासवान यांनी केवळ ९५ मतांनी बाजी मारली. त्यांनी सीपीआय माले पक्षाचे उमेदवार शिव रंजन यांना पराभूत केले. बलरामपूर मतदारसंघातही अटीतटीची लढत झाली. येथे एलजेपीआर पक्षाच्या संगीता देवी यांनी अवघ्या ३८९ मतांनी बाजी मारली. संगीता देवी यांनी एमआयएमचे उमेदवार मोहम्मद आदिल हुसेन यांना पराभूत केले. तर बख्तियारपूर मतदारसंघात एलजेपीआर पक्षाचे उमेदवार अरुण कुमार हे ९८१ मतांनी विजयी झाले. त्यांनी राजदचे उमेदवार अनिरुद्ध कुमार यांना पराभूत केले. याशिवाय बोधगया विधानसभा मतदारसंघात राजदचे उमेदवार कुमार सर्वजित हे ८८१ मतांनी विजयी झाले. त्यांनी एलजेपीचे उमेदवार श्यामदेव पासवान यांना पराभूत केले. *(वृत्तसंस्था)*

### भाजपचे दोन उमेदवार थोड्याच मतांनी पराभूत

**ढाका मतदारसंघात राजदचे उमेदवार फैसल रहमान यांनी १७८ मतांनी बाजी मारली. त्यांनी भाजपाच्या पवनकुमार जैसवाल यांचा पराभव केला. याशिवाय फारबिसगंज मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार मनोज विश्वास यांनी २२१ मतांनी विजय मिळवला. त्यांनी भाजपाच्या विद्या सागर केशरी यांना पराभूत केले.**

# बिहारात सरकार स्थापनेच्या हालचालींना सुरुवात

◆ **नवी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

बिहारमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने तब्बल २०२ जागा जिंकत प्रचंड यश मिळविले आहे. आता सरकार स्थापनेच्या हालचालीना प्रारंभ झाला आहे.

बिहार विधानसभेत भाजप ८९ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार पुढील आठवड्यात राज्यपालांची भेट घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संयुक्त जनता दलाचे नेते राजीव रंजन, संगजय झा आणि लल्लन सिंह दिल्लीला दाखल झाले आहेत. सरकार स्थापन करण्यासंदर्भात हे नेते भारतीय जनता पक्ष आणि संयुक्त जनता दलाच्या नेत्यांशी चर्चा करण्याची शक्यता आहे.

नितीशकुमारच पुढचे मुख्यमंत्री असतील ,हे निश्चित मानले जात आहे. शपथविधीची तारीख निश्चित करण्यासाठी दोन्ही पक्षांमध्ये चर्चा होणार आहे. शपथविधीला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुढील आठवड्यात नितीशकुमार राज्यपालांची भेट घेऊन राजीनामा देणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यानंतर विधिमंडळ नेतेपदाच्या निवडीची औपचारिकता पूर्ण केली जाणार आहे. नितीशकुमार हे दहाव्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार असून हा एक विक्रम मानला जात आहे. *(वृत्तसंस्था)*

# मतांच्या खरेदीसाठी ४० हजार कोटींचा खर्च

### जन सुराज पक्षाचा रालोआवर आरोप

◆ **पाटणा, १५ नोव्हेंबर**

बिहार निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वीच सरकारने महिलांच्या खात्यात पैसे वळते केले, मतांच्या खरेदीसाठी ४० हजार कोटींचा खर्च करण्यात आला. त्यामुळेच रालोआतील पक्षाला ऐतिहासिक विजय मिळाला. कल्याणकारी योजनांचा निधी मतदारांना देण्यासाठी करण्यात आला, असा आरोप जन सुराज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय सिंह यांनी शनिवारी केला.

पत्रपरिषदेत बोलताना सिंह म्हणाले, मते खरेदी करण्यासाठी रालोआ सरकारने निवडणुकीपूर्वीच ४० हजार कोटी खर्च केले आणि अशाप्रकारे खर्च करून एखाद्या राज्य सरकारने हे बहुमत मिळवण्याची ही

### कल्याणकारी योजनांचा निधी वळवला



पहिलीच वेळ आहे. जनतेच्या पैशाने लोकांची मते विकत घेतली गेली. शिक्षण, रोजगार आणि आरोग्य विभागातील निधी मतदारांना पैसे वितरित करण्यासाठी झाला. त्यात जागतिक बँकेकडून घेतलेल्या १४,००० कोटींच्या कर्जाचादेखील समावेश आहे. ही निवडणूक आम्ही उपस्थित केलेल्या मुद्द्यावरच झाली.

आम्ही विधानसभेत नसलो तरी

### कलंकित आमदारांना मंत्रिमंडळात घेतले

एका मजबूत विरोधी पक्षाची भूमिका बजावणार आहोत. बिहारमध्ये स्थापन होणाऱ्या नवीन सरकारकडून आमची मागणी आहे की राज्यात स्वच्छ सरकार असावे आणि त्यात कलंकित आमदारांना मंत्रीपद मिळू नये. ज्या दृढनिश्चयाने जन सूराजची स्थापना केली गेली आणि परिवर्तनाचे उद्दिष्ट होते तेच कायम राहील. आम्ही सरकारच्या उणीवा उघड करत राहू. *(वृत्तसंस्था)*

### राजदला रोखण्यासाठी रालोआकडे मते वळली

राजद-काँग्रेस विरोधी पक्षाची भूमिका योग्यरित्या पार पाडत नव्हते. जरी आम्ही आता विधानसभेत नसलो तरी, बिहारचे लोक आता जन सुराजला एक मजबूत विरोधी पक्ष म्हणून पाहत आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत जन सुराजच्या कामगिरीबद्दल सिंह म्हणाले, निकालाने आम्ही निराश आहोत, पण आत्मविश्वास कायम आहे. शेवटच्या क्षणी लोकांना वाटले की जन सुराजला मतदान केल्याने राजद पुन्हा सत्तेत येऊ शकेल, म्हणून त्यांनी त्यांची मते रालोआकडे वळवली.


## चित्रपट वार्ता

### दहा वर्षांनी छोट्या उद्योगपतीसोबत दिसली क्रिती



**मुंबई** : सध्याच्या हिंदी सिनेसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक असणारी क्रिती आता तिच्या वैयक्तिक जीवनावरून चर्चेत आहे. तिचे नाव प्रसिद्ध उद्योजक कबीर बहियासोबत जोडले जात आहे. अनेकदा दोघे एकत्र दिसले तरी त्यांनी नात्याविषयी उघडपणे काहीच सांगितलेले नाही. नुकतीच क्रितीने काजोल आणि ट्विंकल खन्नाच्या टॉक शोमध्ये हजेरी लावली. त्यावेळी तिला ट्विंकलने विचारले की, तुझा लेटेस्ट क्रश कोण आहे. त्यावर क्रिती लाजली आणि म्हणाली, ही अशी व्यक्ती आहे ज्याचा इंडस्ट्रीशी कोणताही संबंध नाही. मी एका व्यक्तीला पार्टीत भेटले. आमच्यासाठी बऱ्याच गोष्टी नवीन आहेत. अर्थातच, क्रितीने कबीरचे नाव घेतले नाही. मात्र, आपल्या लग्नाविषयी अफवा पसरवल्या जात आहेत, असे आवर्जून सांगितले.

### बाळासह घरी परतली कॅटरिना



**मुंबई** : हिंदी सिनेजगतातील लोकप्रिय जोडी कॅटरिना कैफ आणि विकी कौशल यांच्याकडे ७ नोव्हेंबरला चिमुकल्या बाळाचे आगमन झाले. सात दिवसांनंतर आता कॅटरिना बाळासह घरी परतली आहे. तिला रुग्णालयातून बाहेर पडताना पाहिले गेले. ती आपल्या बाळासह घराकडे जाण्यासाठी रवाना झाली. त्यावेळी विकीदेखील सोबत होता. याचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. बाळाच्या आगमनाने कॅट आणि विकी दोघांच्याही घरी आनंदाला नुसते उधाण आले आहे. विकीचे वडील शाम कौशल आणि भाऊ सनी कौशलनेही समाज माध्यमांवर आपला आनंद व्यक्त केला.

### पापाराझींवर पुन्हा संतापल्या जया बच्चन



**मुंबई** : ज्येष्ठ अभिनेत्री जया बच्चन पुन्हा एकदा पापाराझींवर संतापल्या आहेत. त्यांनी त्यांना जाहीरपणे फटकारले आणि असभ्य वर्तन करू नका, असा इशारा दिला. फॅशन डिझायनर्स अबू जानी आणि संदीप खोसला यांनी आयोजित केलेल्या फॅशन इव्हेंटमध्ये जया बच्चन सहभागी झाल्या होत्या. त्यांची मुलगी श्वेता नंदा देखील उपस्थित होती. या इव्हेंटमधील त्यांचा एक व्हिडीओ समोर आला आहे ज्यामध्ये त्या डिझायनर अबू जानीसोबत रॅम्पवर चालणाऱ्या तब्बूला उभे राहून टाळ्या वाजवत असल्याचे दिसत आहे. थोड्याच वेळात, जया बच्चन त्यांची मुलगी श्वेतासोबत एका फॅशन इव्हेंटमधून बाहेर पडताना दिसल्या. पापाराझी जवळ येताच त्या संतापल्या. जय बच्चन यांच्या संतापण्याची ही पहिली वेळ नव्हती. यापूर्वीही बरेचदा त्या कॅमेरा पाहून संतापल्या आहेत.

### ठाण्यात डॉक्टरचे अपहरण करून २ लाख लुटले, पाच अटकेत

◆ **ठाणे, १५ नोव्हेंबर**

कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातून एका डॉक्टरचे अपहरण करून २ लाख लुटल्याची घटना ठाणे जिल्ह्यात घडली असून याप्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना ८ नोव्हेंबरला सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. आरोपी इरफान अझगर अली हा चार साथीदारांसह आला आणि स्वतःला पोलिस असल्याची थाप मारली. बनावट चलन बाळगल्याच्या आरोपाखाली अटक करण्याची धमकी दिली आणि त्याच्याजवळून तेव्हा २ लाख लुटले आणि त्यानंतर आणखी १२ लाखांची मागणी केली. सायंकाळी डॉक्टर आरोपींच्या तावडीतून निसटण्यास यशस्वी झाला आणि त्याने कळवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. *(वृत्तसंस्था)*

# १६ हजार फूट उंचीवर चालवली मोनोरेल

## ● अरुणाचल प्रदेशात भारतीय लष्कराची कमाल ● आवश्यक वस्तू जलद पोहोचवता येणार

◆ **इटानगर, १५ नोव्हेंबर**

भारतीय लष्कराच्या गजराज कॉर्प्सने विकसित केलेली हाय-अल्टिट्यूड मोनोरेल अरुणाचल प्रदेशच्या खडकाळ पर्वतीय प्रदेशात, १६ हजार फूट उंचीवर चालवत कमाल केली. मोनोरेलमुळे सुरक्षा दलाला आवश्यक वस्तू जलद



पोहोचवता येणार आहे.

या प्रणालीमुळे भारतीय सैन्याला कामेंग हिमालयीन प्रदेशात अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा पोहोचवण्यास मदत होणार आहे.

रस्ते किंवा इतर वाहने उपलब्ध होवू शकत नाही अशा दुर्गम भागासाठी लष्कराच्या गजराज कॉर्प्सने मोनोरेल विकसित केली. पर्वतांमध्ये, अरुंद रस्ते, सैल खडक, खराब हवामान आणि मर्यादित ऑक्सिजनमुळे लहान अंतर देखील लांब आणि कठीण वाटते. सैनिकांना अनेकदा विविध आवश्यक वस्तू त्यांच्या पाठीवर वाहून न्याव्या लागत होत्या, त्यासाठी वेळ आणि मेहनत घ्यावी लागत होती. आता, मोनोरेलमुळे वेळ आणि मेहनत दोन्ही वाचेल आणि त्याचबरोबर धोकाही कमी होईल, अशी माहिती लष्कराच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. गजराज ही भारतीय सैन्याची चौथी कॉर्प्स आहे. त्याची स्थापना ४ ऑक्टोबर १९६२ रोजी भारत-चीन युद्धादरम्यान झाली. तिचे मुख्यालय आसाममधील तेजपूर येथे आहे. पारंपारिक युद्ध आणि बंडखोरांविरोधी कारवायांसाठी ही कॉर्प्स ओळखली जाते. या कॉर्प्समध्ये ७१ वा माउंटन डिव्हिजन, ५ वा बॉल ऑफ फायर डिव्हिजन आणि २१ वा रिअल हॉर्न डिव्हिजन यांचा समावेश आहे. *(वृत्तसंस्था)*

### दुर्गम भागात वेळेवर होणार वस्तूंचा पुरवठा

मोनोरेलची सुरुवात ही आव्हानात्मक भूभागांमध्ये लॉजिस्टिक कार्यक्षमता वाढवण्याच्या लष्कराच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहे, ज्यामुळे दुर्गम भागात तैनात असलेल्या सैन्याला वेळेवर पुरवठा आणि ऑपरेशनल सपोर्ट मिळणार आहे. स्वदेशी उपकरणांनी तयार केलेली मोनोरेल हिमालयीन सीमेवर संरक्षण तयारी मजबूत करण्यासाठी तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्णतेचा वापर करण्याच्या लष्कराच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

### दळणवळणातील धोके होतील कमी

गजराज कॉर्प्सने एक्सवर मोनोरेलचा एक व्हिडीओ शेअर केला, ज्यामध्ये त्याच्या ऑपरेशनल क्षमतांवर प्रकाश टाकण्यात आला. अरुंद पर्वतीय मार्गांवरून जड वस्तू वाहून नेणाऱ्या सैनिकांवर येणारा शारीरिक ताण आणि उंच ठिकाणावर खराब हवामान, सैल खडक आणि कमी ऑक्सिजन पातळीमुळे निर्माण होणारे लॉजिस्टिक धोके दोन्ही कमी करणे या उपक्रमाचा उद्देश आहे. मोनोरेल वाहतुकीचा वेळ लक्षणीयरीत्या कमी करेल आणि आवश्यक पुरवठा वितरणाची सुरक्षितता सुधारेल, असे गजराज कॉर्प्सच्या प्रवक्त्याने सांगितले.

# कचरेवाडी ब्रीजजवळ उभ्या वाहनाला ट्रकने ठोकरल्याने झाला तिहेरी अपघात

**मंगळवेढा दि. १५ नोव्हेंबर-**

मंगळवेढा-आंधळगाव मार्गावरील कचरेवाडी ब्रीजजवळ पंक्चर झालेल्या उभ्या पीकअपला भरधाव वेगात आलेल्या ट्रकने जोराची धडक दिल्याने एकजण किरकोळ जखमी होवून वाहनामधील पाच टन डाळींबीचे नुकसान होण्यास कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात ट्रक चालकाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

जखमी फिर्यादी रऊफ शेख (रा.मालेगाव) हे १२ नोव्हेंबर रोजी रात्री ७.३० वाजता बेवनूर ता.जत येथून पिकअपमध्ये अडीच टन डाळींब घेवून सांगोलाहून सोलापूरकडे जात असताना रात्री ९.३० वाजता कचरेवाडी ब्रीजवर आल्यावर फिर्यादीच्या ओळखीचे फिरोज शेख (रा. मोमीनपुरा, नांदेड) यांची महिंद्रा पिकअप गाडी पंक्चर झाल्याने ती रोडच्या बाजूस लाईट पार्कींग करुन पंक्चर काढत असताना फिर्यादी हे मदतीकरता गेले होते. या दरम्यान सांगोल्याकडून भरधाव वेगात एक ट्रक येवून सदर चालकाने निष्काळजीपणे हयगयीने रस्त्याची परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन उभ्या पिकअपला जोराची धडक देवून फिर्यादीस दुखापत केली, पिकअपची बॉडी शो तुटून फुटून पाच टन डाळींबाचे नुकसान झाले.

### कारचालकाने ठोकरल्याने मोटर सायकलस्वाराचा मृत्यू

**मंगळवेढा दि. १५ नोव्हेंबर-**

ब्रम्हपुरी-मंगळवेढा या राष्ट्रीय महामार्गावर एका मोटरसायकलस्वारास कार चालकाने भरधाव वेगात गाडी चालवून पाठीमागून ठोकरल्याने मोटर सायकलस्वार बबुवाहन यशवंत सोनवले (वय ६०, रा.ब्रम्हपुरी) हे जागीच ठार झाले. याप्रकरणी अज्ञात इनोव्हा कार चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी किशोर सोनवले (वय-३६, रा.ब्रम्हपुरी) यांचे वडील बब्रुवाहन सोनवले हे एम.एच.१३ डी.के.३५११ होंडा शाईन मोटरसायकलवरुन मंगळवेढा येथे असलेल्या आपल्या लेकीला भेटावयास जात होते. तेव्हा, ब्रम्हपुरी हद्दीतील इंडियन पेट्रोल पंपासमोरील पाटील वस्ती जवळ भरधाव वेगात येणाऱ्या के.ए.४८ एम.४२०५ या कार गाडीच्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत मोटर सायकलस्वारास पाठीमागून जोराची धडक देवून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. अधिक तपास पोलीस हवालदार नवले हे करीत आहेत.

# कोम्बिंग ऑपरेशन, वाहनात सापडल्या तलवारी

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि. १५ नोव्हेंबर-**

मरवडे-डोणज मार्गावर मंगळवेढा पोलीस कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान पेट्रोलिंग करत असताना एम.एच.४५ ए.९५०१ या क्रमांकाची स्कॉप्रिओ वाहन संशयास्पदरित्या आढळून आली. त्या वाहनात तलवारी सापडल्याने तिघा जणांविरुध्द शस्त्र अधिनियमाच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यांची नावे याप्रमाणे गणेश मारुती कचरे, रामभाऊ शहाजी पाटोळे (रा.मेंढापूर, ता.पंढरपूर), शिवदास उत्तम सोनवले (रा.साखरी जि.धुळे). स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली डीवायएसपी डॉ.बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगड्डे, पोलीस नाईक ईश्वर दुधाळ, पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे, पोलीस हेडकॉनस्टेबल श्रीमंत पवार, चालक पोलीस हवालदार चौधरी आर्दीच्या पथकांद्वारे कोम्बिंग ऑपरेशन व नाकाबंदी करण्यात येत आहे. मरवडे ते डोणज मार्गावर शनिवार, दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी कोम्बिंग ऑपरेशनप्रसंगी चौधरी वस्ती जवळ समोरुन पांढऱ्या रंगाची चारचाकी स्कॉर्पिओ वाहन संशयितरित्या येत असल्याचे दिसून आले. तेव्हा, पोलिसांनी त्या वाहनास थांबवून चौकशी केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावल्याने वाहनाची कसून तपासणी केली असता तीत एक तलवार आढळून आले. पोलिसांनी सदर तिन्ही इसमांना ताब्यात घेवून २ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या गाडीसह मुद्देमाल जप्त केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

# राजा आणि त्याचा लाडका पोपट!

**दिनेश गुणे**

मौखिक किंवा लिखित साहित्य हे सहसा कालसुसंगत असते असे म्हणतात. त्या त्या सांगितल्या, लिहिल्या जाणाऱ्या साहित्यात त्या त्या काळातील वर्तमानाचे प्रतिबिंब असते, असे बहुधा दिसते. पण ते संपूर्ण खरे नाही. गेल्या अनेक दशकांपासून सांगितल्या गेलेल्या लोककथा, पुराणकथांमधील भाष्य कालातीत असते, असेही अनेकदा दिसून येते. हे साहित्य भूतकाळात जन्माला आलेले असले, तरी वर्तमानकाळाचेही प्रतिबिंब त्यामध्ये उमटलेले आढळते. इतकेच नव्हे, तर भविष्यकाळातही हे साहित्य तितकेच कालसुसंगत ठरेल याची साक्षदेखील पटून जाते. त्यामुळेच, वर्तमानकाळात जेव्हा काही घटना घडतात, तेव्हा भूतकाळात जन्माला आलेल्या त्या कालातीत साहित्यातील साम्यस्थळे जिवंत होतात, त्यातील ताजेपणा जसाच्या तसा जाणवू लागतो आणि हे साहित्य अजरामर का असते याची उत्तरेही सापडतात. उदाहरणादाखल, 'राजा आणि त्याचा लाडका पोपट' नावाच्या एका अजरामर गोष्टीकडे पाहता येईल. ती गोष्ट आपल्या पुढच्या पिढीला सांगितली नाही अशी पिढी सापडणार नाही आणि वडिलधाऱ्यांकडून ती गोष्ट ऐकली नाही, अशी नवी पिढीदेखील अभावानेच आढळेल. जसे लाकूडतोड्या आणि त्याची कुऱ्हाड ही गोष्ट कालातीत आहे, तितकीच राजा आणि त्याचा लाडका पोपट ही गोष्टदेखील कालातीत आहे. वर्तमानात या गोष्टीच्या कालातीततेचे दर्शन घडविणारे काही प्रसंग आसपास घडतात, तेव्हा ती गोष्ट प्रकर्षाने आठवते.

या गोष्टीतील एका राजाच्या पदरी अनेक सेवक होते, नोकर होते, चाकर होते, सरदार, मनसबदार होते, खबरे आणि हुजरे तसेच काही सल्लागारदेखील होते. त्यांच्या बळावरच राजा कारभार हाकत असे. त्यामुळे त्याला कदाचित स्वतःच्या बुद्धीमधील कमतरतेची जाणीवदेखील झाली नव्हती. हा राजा एकदा आपल्या लवाजम्यासह जंगलात शिकारीसाठी गेला असताना, त्याला एका झाडावरील घरट्यात पोपटाचे एक पिल्लू दिसले. घरट्यात एकटेच बसलेले ते पिल्लू कुतूहलाने राजाकडेच पाहात होते. राजा त्या पिल्लाजवळ गेला आणि त्याने त्यास पंजात पकडले. ते पिल्लूदेखील जराही न घाबरता राजाच्या पंजावर बसून राजाकडे पाहू लागले. त्या पिल्लास सोबत घेऊन तो राजवाड्यात आला. तेव्हापासून राजाच्या त्या लाडक्या पोपटाच्या सरबराईचे नवे काम त्याच्या नोकरचाकरांपासून सरदार, मनसबदारांपर्यंत सर्वांनी अंगावर घेतले. राजाच्या लाडक्या पोपटास काहीही कमी पडू नये, यासाठी सारेजण डोळ्यात तेल घालून त्याची काळजी घेऊ लागले. अशा, चहुबाजूंनी होणाऱ्या कोडकौतुकात तो पोपट दिवसागणिक वाढत होता. मात्र, एके दिवशी अचानक काहीतरी बिघडले. राजाचा तो लाडका पोपट आजारी पडला आणि राजसेवकांमध्ये घबराट पसरली. राजाच्या पोपटास काही झाले तर आपली धडगत नाही, या भीतीने राजाचे सारे दरबारी पोपटाच्या सेवेत दाखल झाले. त्याच्या उपचारासाठी नामांकित जाणकार वैद्यांचा ताफाही दाखल झाला. पण पोपटास गुण येत नव्हता. तो खंगतच चालला आणि एके दिवशी, त्याने मान टाकली. पंख पसरलेला, पाठीवर पहुडलेला आणि डोळे मात्र सताड उघडे असलेला तो निष्प्राण देह पिंजऱ्यात पाहून राजाला काळजी वाटू लागली. त्याने सेवकांस फैलावर घेण्यास सुरुवात केली, पण पोपट मेला आहे हे सांगण्याचे धैर्य कोणातच नव्हते. प्रत्येक गोष्टीसाठी अन्यांवर अवलंबून असलेल्या राजासही पोपटाच्या या अवस्थेस काय म्हणावे माहीत नव्हते. त्यामुळे, सेवकांनी वेगवेगळी कारणे सांगण्यास सुरुवात केली, पण पोपट मेला आहे हे सांगणे मात्र प्रत्येक जण टाळतच होता. अखेर त्याच गावातील एका लहान मुलाने पिंजऱ्यातल्या त्या निष्प्राण देहाकडे पाहिले आणि तो ओरडला, ''राजा, तुझा पोपट मेला आहे!''

बिहारमधील विधानसभा निवडणुकांचे ताजे निकाल आणि त्यानंतरचे राजकारण पाहता, मेलेल्या पोपटाची ती गोष्ट आठवणे अपरिहार्य ठरते. वारसा हक्कामुळे कौटुंबिक युवराजपद प्राप्त झालेला आपला नेता आता वेळ घालविण्याचे साधन म्हणून काँग्रेस नावाच्या कौटुंबिक पाळीव पोपटासोबत मन मानेल तसे, मनाला येईल तेव्हा खेळतो, त्याला आपल्या मर्जीनुसार खेळवतो हे आता त्याच्या मनसबदारांस जाणवू लागले आहे. अशा प्रत्येक खेळात त्या पोपटाची मात्र नाहक दमछाक होत आहे, हेही अनेकांनी ओळखले आहे. तरीही, पंख कापलेल्या, उडण्याची ताकद नसलेल्या आणि भरारी घेण्याचे विसरून गेलेल्या त्या पोपटाची सरबराई करण्यासाठी युवराजांचे सरदार, मनसबदार, खबरे, हुजरे, नोकरचाकर सदैव धडपडत असतात. युवराजांची मर्जी सांभाळण्यासाठी सारे जण पोपटाची काळजी घेत असतात. पण सततच्या खेळामुळे या पोपटाची प्रकृती दिवसेंदिवस बिघडतच आहे. सरदार, मनसबदारांस हे कळूनही, ते युवराजास सांगण्याचा धीर मात्र कोणासही होतच नव्हता. बिहारच्या निवडणूक निकालानंतर मात्र, युवराजाने खेळणे म्हणून वापरलेला त्याचा लाडका पोपट आता अंथरूणाला खिळला आहे, हे अनेक जाणत्यांना जाणवले. तरीही ते युवराजास स्पष्टपणे सांगण्याची हिंमत मात्र अजूनही कोणास झालेली नाही. युवराजाचा हा पोपट मेला आहे की मरणपंथास लागला आहे याविषयीही अनेकांच्या मनात शंका आहे. काही जणांस तो मरणपंथास लागल्यासारखे वाटते, तर पोपटाची सध्याची अवस्था मरणावस्थेहून वेगळी नाही, असे काहींना वाटू लागले आहे. यापैकी कोणत्याही अवस्थेविषयी युवराजास मात्र फारसे काही माहीतच नसल्याने, पोपटास काही झाले आहे यावर त्याचा विश्वास नाही. गेल्या काही महिन्यांपासून युवराज वेगळ्याच मोहिमेत गर्क होते. त्यांनी लवाजम्यासह प्रचाराच्या निमित्ताने पर्यटनाच्या मोहिमा आखल्या. गावोगावी जाऊन लोकांसोबत मौजमजाही केली. झोपडीत राहणाऱ्या कुटुंबाचे जगणे कसे असते ते युवराजांस कळावे याकरिता सरदार, मनसबदार, हुजऱ्यांनी



युवराजांसमवेत या कुटुंबांचे भोजन आयोजित केले. पायात बूट घालून जमिनीवर जेवायला बसलेल्या युवाराजांची छबी माध्यमांमध्ये झळकली आणि युवराजांचे सामान्यांच्या जगण्याशी कसे नाते आहे, हे लोकांसमोर मांडण्याची हुजऱ्यांची स्पर्धा सुरू झाली. एका नदीच्या पात्रात, आजूबाजूला कमरेएवढ्या खोल पाण्यात युवराजांनी पोहण्याचा आनंदही लुटला, मखाण्याची शेतीही पाहिली. बटाटे झाडावर लागतात की मुळाशी लागतात हे युवराजांस माहीत नव्हते. ते त्यांना प्रत्यक्ष पाहता यावे यासाठी हुजऱ्यांनी शेती पर्यटनाचा कार्यक्रमही आखला, याच प्रचार पर्यटनात युवराजांनी एका हलवायाच्या मुदपाकखान्यात जाऊन चक्क जिलेबीदेखील तळली. अशा तऱ्हेने, निवडणुकीच्या निमित्ताने युवराजांनी प्रचार पर्यटनाचा आनंद मनसोक्त लुटला आणि हा पोपट निवडणुकीच्या रिंगणात पणास लावला.

युवराजांनी मनसोक्त खेळविलेला हा पोपट आता मरणपंथास लागला असून वेळीच योग्य उपचार केले नाहीत तर तो तगदेखील धरणार नाही, हे आता निवडणुकीच्या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. बिहारच्या निवडणुकीत काँग्रेसची धूळधाण झाली आणि गेल्या दहा वर्षांत सातत्याने सुरू असलेल्या पराभवांच्या मालिकांमधील सर्वांत मोठ्या नामुष्कीची वेळ या पक्षावर आली. गांधी घराण्याचे युवराज म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्या राहुल गांधी यांनी या पक्षाला पोपटाप्रमाणे खेळणे म्हणून वापरले, याची जाणीव आता त्यांच्यासोबतच्या अनेकांस होऊ लागली आहे. बिहारच्या ताज्या निवडणुकीआधी राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारच्या विरोधात मतचोरीच्या आरोपावरून उघडलेली प्रतिमाभंजनाची मोहीम राबविण्यासाठी याच पोपटास खेळविले गेले होते. गेल्या दहा वर्षांत देशात झालेल्या प्रत्येक निवडणुकीत राहुल गांधींनी काँग्रेसचा हा पोपट आपल्या मर्जीनुसार खेळविला आणि त्या प्रत्येक खेळात पराभव पदरी पडल्यावर पोपटाची अवस्था दिवसागणिक केविलवाणी होऊ लागली. आजही काँग्रेस नावाच्या या पोपटावर प्रजेचे प्रेम आहे, अशा समजुतीतून बिहारमध्ये भाजपविरोधी पक्षांनी काँग्रेससोबत महागठबंधन नावाचा प्रयोग पुन्हा एकदा केला आणि त्यांना सत्तेची स्वप्नेदेखील पडू लागली. प्रत्यक्षात मात्र, मतदारांनी झिडकारल्यामुळे बिहारमध्ये काँग्रेसची वाताहत तर झालीच, पण त्यासोबत महागठबंधन या नावाने एकत्र बांधल्या गेलेल्या पक्षांचे तारूदेखील पुरते बुडून गेले आहे. निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर, काँग्रेस हा राहुल गांधींचा लाडका पोपट मरणपंथास लागल्याची जाणीव महागठबंधनास होऊ लागली आहे आणि तसे सांगण्याची हीच वेळ आहे, हेही जाणवू लागले आहे. राहुल गांधींच्या वोट चोरीच्या खेळात सहभागी होऊन फसगत झाल्याची जाणीवही महागठबंधनातील अनेक भागीदारांस झाली असेल, पण आता त्यातून माघार घेण्याची वेळ निघून गेली आहे. परतीचे सारे दोर कापल्यामुळे तलवारबाजी करत राहणे भाग आहे, पण ही तलवारबाजी हवेतच आहे, हेही आता या भागीदारांनी ओळखले आहे. जे मतदारास अगोदरच कळले आहे, ते कळण्यासाठी महागठबंधनाच्या भागीदारांस निवडणूक निकालांपर्यंत थांबावे लागले, हा बिहार निवडणुकांचा स्पष्ट अर्थ आहे. म्हणूनच, आता जेव्हा निकालांचे विश्लेषण केले जाईल, तेव्हा महागठबंधनातील भागीदारांमध्ये पराजयाचे खापर फोडण्याची स्पर्धा सुरू होईल. काँग्रेससोबत गेल्याने पराभव पाहावा लागला हे स्पष्ट असूनही, तसे उघडपणे मान्य करणे या भागीदारांस राजकीयदृष्ट्या सोयीचे नसल्याने, महागठबंधनातून काढता पाय घेण्याच्या संधीचा शोध आता सुरू होणार आहे. ज्या पक्षांना काँग्रेसच्या आधाराखेरीज तग धरण्याची शाश्वती नव्हती, असे पक्षदेखील आता भविष्यातील निवडणुकांत काँग्रेसचा हात धरण्यासाठी फारसे उत्सुक राहतील अशी शक्यता आता धूसर होत चालली आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता तोंडावर आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने राज्यात मजबूत संघटना बांधली आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसह सत्तेवर असलेल्या महायुतीला आव्हान देण्यासाठी महाविकास आघाडीला पर्याय नाही याची जाणीव झालेल्या विरोधकांमध्ये बिहारच्या निकालांनंतर चलबिचल सुरू झाली आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटासोबत युती करावी किंवा नाही याबाबत काँग्रेसची मनस्थिती द्विधा झाली आहे, तर राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेतल्याखेरीज निवडणुकीच्या रिंगणात उतरणे अवघड असल्याची जाणीव उद्धव ठाकरे गटास झाली आहे. शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडणुकांचे वारे पाहून कोणत्याही तडजोडीचे सारे मार्ग खुले ठेवण्याचे राजकारण करत असतो. तीच भूमिका या निवडणुकीत राहिली तर महाविकास आघाडीतील त्यांच्या भागीदारीचे भवितव्य अनिश्चितच राहील असे बोलले जाते. बिहारच्या निवडणुकीत काँग्रेसचे पानिपत झाल्यावर आता महाराष्ट्रात पुन्हा काँग्रेससोबत युतीची गाठ बांधण्यास आघाडीतील कोणतेच पक्ष फारसे उत्सुक नाहीत याचे संकेत आताच मिळू लागले आहेत. उद्धव ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी बिहार निवडणुकांच्या निकालानंतर लगेचच केलेल्या विश्लेषणातून काँग्रेसला थेट लक्ष्य केले आहे. बिहारच्या पराभवाचे सारे खापर काँग्रेसच्या माथ्यावर मारण्याचा पहिला मान त्यांनी मिळविला आहे. त्यामुळे, राहुल गांधींच्या व्होट चोरी मोहिमेचा कोणताच प्रभाव निवडणुकीच्या राजकारणावर राहणार नाही, हेही स्पष्ट झाले आहे. व्होट चोरी ही काल्पनिक बाब असून आजवर सादरीकरणातून ते सिद्ध करण्यात राहुल गांधीदेखील यशस्वी झालेले नाहीत, ही बाब जनतेने ओळखली आहे. त्यामुळेच, बिहार निवडणुकीतील रालोआच्या विजयावर प्रश्नचिन्ह उमटवून नवे फेक नॅरेटिव्ह निर्माण करण्याचा एक नवा प्रयत्न हताश विरोधकांकडून सुरू झाल्याचे दिसू लागले आहे. बिहारच्या निवडणुकीत तेजस्वी यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलास मिळालेल्या मतांची बेरीज एक कोटी १५ लाख ४६ हजार ५५ एवढी आहे. टक्केवारीच्या तुलनेत, या पक्षास राज्यात सर्वाधिक म्हणजे २३ टक्के मते मिळाली असतानाही केवळ २५ जागांवर विजय मिळाल्याने, याच मुद्याचे भांडवल करून जनतेमध्ये संभ्रम पसरविण्याचा प्रयत्न महागठबंधनच्या समर्थकांकडून सुरू असल्याचे दिसते. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे ८९ उमेदवार विजयी झाले, तर भाजपप्रणीत रालोआचा घटक पक्ष असलेल्या संयुक्त जनता दलाचे ८५ उमेदवार विजयी झाले आहेत. भाजपला मिळालेल्या मतांची एकत्रित संख्या एक कोटी ८१ हजार १४३ एवढी, म्हणजे २०.०८ टक्के एवढी, तर संयुक्त जनता दलास एकूण ९६.६७ लाख (१९.२५ टक्के) मते मिळूनही या पक्षाचे ८५ उमेदवार विजयी झाले आहेत.

नेमक्या याच आकडेवारीवर बोट ठेवून सर्वाधिक मते मिळविणाऱ्या राजदचा पराभव कसा झाला असा सवाल महागठबंधनच्या समर्थकांकडून उपस्थित केला जातो. प्रत्यक्षात, ही आकडेवारी आणि टक्केवारी संपूर्ण राज्यातील मतदानाची असून प्रत्येक मतदारसंघातील वास्तव वेगळे असते, हे लपवून मतदारांमध्ये संभ्रम पसरवण्याचा नवा प्रयत्न सुरू झाला आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदानाची एकत्रित टक्केवारी पाहिल्यास नेमके हेच चित्र पाहावयास मिळते. त्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक म्हणजे २६.१८ टक्के एकत्रित मते मिळाली होती व केवळ ९ जागांवर विजय मिळाला होता. याउलट, काँग्रेसला १६.९२ टक्के एकत्रित मते मिळूनही १३ जागांवर काँग्रेसचा विजय झाला होता. ठाकरे गटाच्या मतांची एकत्रित टक्केवारी १६.७२ असताना, या पक्षाने विजय मिळविलेल्या जागांची संख्या भाजपएवढीच म्हणजे नऊ इतकी होती, तर आठ जागांवर विजयी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटास केवळ १०.२७ टक्के एकत्रित मते मिळाली होती. त्यामुळे मतांच्या टक्केवारीवरून संभ्रम माजवून सुरू झालेल्या नव्या अपप्रचाराच्या गदारोळात पोपटाचा जीवच धोक्यात आहे, याचाच विसर पडला तर तीच गोष्ट भविष्यातही तितकीच ताजी राहील यात शंका नाही.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा

मानवी चंचल मनाची मोठी गंमत आहे. मनाला अगाध शक्ती असल्याने क्षणाचाही विलंब न लागता ते कुठेही भरकटते. भ्रम तर हा मनाचा भाव आहे. भौतिक सुखाच्या कल्पनेने परिसीमा गाठली असल्याने मनावर नियंत्रण ठेवणे हे महत् कठीण कर्म होत आहे. सद्बुद्धीचा अभाव असला तर भ्रमाचा प्रभाव वरचढ होऊन फलित निष्पन्न होत नाही पर्यायाने परिणाम विपरीतच होतात.

**ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा**
**काय भुललासी वरलिया रंगा**

उपरोक्त ओळीतून संत तुकाराम महाराज हाच उपदेश करीत आहेत. ऊस हा डोंगा म्हणजे, वाकडा-तिकडा, गाठी-गाठीचा, करड्या रंगाचा असतो. उसाचे बाह्यरूप इतर फळांसारखे रंगीत, आकर्षक नसल्याने माधुर्य आणि पौष्टिक असलेल्या उसाकडे लक्ष जात नाही. इतर फळांसारखे कोणी सहज घेत नाही. त्यापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांचा भरपूर वापर होतो. उसाच्या बाह्य रूपामुळे आकर्षित न झाल्याने त्यातील गुणांचा लाभ होत नसल्याने संतांनी या फळाची समर्पक उपमा दिली आहे. कारण मानवीय मनाची बैठक ही बाह्यरूप, रंग, आकार याकडे आकर्षित होणारी असते. भ्रम हा मनाच्या मदतीला येऊन त्यास अधिक गोंधळून टाकतो. परिणामी काळ, वेळ, श्रम आणि धननाश झाल्याने पश्चात्ताप होऊन मन भानावर येते.

प्रापंचिक जीवनात असे अनेक अनुभव येतात. मन चंचल असेल तर द्वंद्व स्थिती निर्माण होऊन पदरात निराशा पडते. साद्यंत स्थिती अशीच आहे. आधुनिक तंत्रज्ञानात होत असलेल्या संशोधनाने जगात भ्रम निर्माण होत आहे. माकडाच्या हाती कोलीतप्रमाणे समाज माध्यमातून नवनवीन दुष्परिणाम होत असून अनेक त्याचे बळी पडत आहेत. या मायाजालावर नियंत्रण प्राप्त करणे दुरापास्त आहे. वस्त्रे-प्रावरणे, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन क्षेत्रात भुरळ पाडणारे पावलागणिक प्रसंग येत आहेत.

आपल्या सर्व संतानी या भ्रम, मायाजालची सत्यता पडताळून उपदेश करून आपणास भानावर आणण्यासाठी आयुष्य खर्ची घातले. एखाद्या व्यक्तीच्या बाह्यरूपावरून (रंग, रूप, वेशभूषा, भाषा) त्याचे विश्लेषण करणे म्हणजे त्या व्यक्तीचे आकलन होऊ नये. त्याचे अंतर्मनातील भाव, सद्गुण कळण्यासाठी वरलिया रंग रुपी मायेचा पडदा दूर करून, विवेकबुद्धीने विश्लेषण होणे महत्त्वाचे ठरते. या विरुद्ध आकर्षक व्यक्तीच्या रंग, रूप, शिक्षण, बोली यावरून फसगत होण्याची संभावना अधिक असू शकते. यातून नैराश्य, बुद्धिभेद, अविश्वास, गैरसमज, धननाश इत्यादीचा सामना करावा लागतो म्हणून संत तुकाराम महाराज यांनी समर्पक ओळीत बोध केला आहे.

**संजय पाठक**/नागपूर

### हस्तलिखित : ज्ञान माध्यम



हस्तलिखित म्हणजे हाताने लिहिलेल्या कोणत्याही मजकुराला ही संज्ञा दिली जाते. पूर्वीच्या काळी टंकलेखन अस्तित्वात नव्हते. त्याचा शोध लागावयाचा होता. मुद्रण कलेचा शोध लागण्यापूर्वी ज्ञान आणि माहिती यांच्या संप्रेपणचे सर्व व्यवहार हस्तलिखिताद्वारे होत असत. हाताने लेखन करणे ही अनिवार्यता होती. हस्तलेखनासाठी भरपूर वेळ लागत असे. साधे-सोपे काम नव्हते, सहज साध्य लेखन होत नसे. हस्तलिखितासाठी प्रयास पडायचे. कागद अस्तित्वात नसताना, हस्तलिखिताचे कार्य प्रारंभ झालेले आहे. कागदाची उपलब्धी व्हावयाच्या पूर्वी ग्रंथकारांनी, लेखकांनी, साहित्य निर्मितीसाठी पपायरस चर्मपत्र, भूजपत्र, ताडपत्र व तत्सम माध्यम असणाऱ्या साधनांवर लेखन केलेले आढळते.

हस्तलिखितांमधून त्या काळच्या तत्कालीन संस्कृतीची विशेषत: व्यापार चालीरीती, कौटुंबिक जीवन, साहित्य, शासन व्यवस्था या सर्वांची सखोल, सविस्तर आणि इत्थंभूत माहिती मिळायची. हस्तलिखितांचा प्रारंभ कधी झाला हे निश्चितपणे सांगता येत नसले तरी तमिळ संघम साहित्याची हस्तलिखिते इ. स. पूर्व ४००, इ. स. पूर्व २०० या काळात लिहिली गेली असावीत असा अंदाज वर्तविला जातो. एकूण हस्तलिखितांपैकी काही साहित्यकृती नष्ट झाल्या असून काही भाग सुदैवाने उपलब्ध आहेत. उपलब्ध असलेल्या हस्तलिखित ग्रंथात धर्मशास्त्र, न्यायशास्त्र, वास्तुशास्त्र, शिल्पकला, तंत्रज्ञान इत्यादी विषयांवर विद्वानांनी लिहिलेली हस्तलिखिते उपलब्ध आहेत. त्यात अक्षर रूपातील हस्तलिखिते तर आहेतच. काही हस्तलिखितांमध्ये मात्र सचित्र पोथ्या उपलब्ध आहेत. काही हस्तलिखितांवर ग्रंथकारांचे नाव लिहिलेले असते. परंतु काही ग्रंथांवर त्या ग्रंथकाराचे नाव, रचनाकार यांचा निर्देश नसल्याचे दिसून येते. त्यांच्या साहित्याखाली रचनाकार अज्ञात म्हणून लिहिले जाते.

हस्तलिखितांमुळे त्या काळातील संस्कृतीचा परिचय होतो. प्राचीन संस्कृतीचे संदर्भ मिळतात. पूर्वी ऋषी, मुनी, संत यांनी अनेक विषयांवर लेखन केलेले आहे. जसे - धार्मिक, आध्यात्मिक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजनैतिक आदि समस्त प्रकारावर हस्तलिखितांद्वारे प्रकाश टाकला आहे. या हस्तलिखित साहित्याचा फार मोठा लाभ पुढील पिढीला प्राप्त होतो. हस्तलिखितांपासूनच साहित्य निर्मिती सुरुवात झालेली आढळते. गीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, दासबोध इत्यादी धर्मग्रंथ हस्तलिखित रूपात लिहिले गेले आहे.

मध्ययुगात तवारिखा, बखरी, सनदा, कैफियती तह इत्यादींची हस्तलिखित कागदपत्रे ही ऐतिहासिक साधने म्हणून उपयुक्त ठरली. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजा जयसिंह यामधील पुरंदरच्या तहाचा ताडपत्रावरील हस्तलिखित तहनामा सात किलोमीटर लांबीचा असून तो बिकानेरच्या पुरातत्त्व संग्रहालयात आहे. मुद्रण कलेचा शोध लागल्यावरही शेकडो वर्षे हस्तलिखिते नकलून घेण्याची पद्धत अव्याहत सुरू आहे. हस्तलिखिताचे धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक व राजकीय मूल्ये वादातीत आहे.

विज्ञान युगात सर्वच क्षेत्रात बदल झाला. इंटरनेट, मोबाईल, संगणक या सर्व माध्यमांद्वारे व्यवहार व्हावयास लागले. विनासायास, कमी वेळात काम करणारी यंत्रसामुग्री आली मुद्रणकलेतही परिवर्तन झाले. या सर्व पृष्ठभूमीवर हस्तलिखितांचा विचार केल्यास, हस्तलिखितांचे प्रमाण कमी झाले मात्र ते संपुष्टात आले नाही. हस्तलिखिते ही निरंतर चालणारी कला आहे. हस्तलिखिते म्हणजे साहित्य क्षेत्रातील अमूल्य ठेवा होय.

**मंजूषा शिनखेडे**/९०९६४९९७९७

### क्रांती की विकृती..!

आज एआयने प्रत्येकाच्या घरात आणि मनात प्रचंड धुमाकूळ घातला आहे. तरुणाई काय, महिला काय याचा गैरवापर करत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही एक क्रांती आहे की विकृती हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक आव्हान जगाच्या पातळीवर जाणवू लागल्यानंतर सत्य काय असत्य काय आणि ही विकृती कशी आहे यावर मानसशास्त्रीय संशोधन सुरू आहे. आज फेसबुकवर या एआयने धुमाकूळ घातला आहे. रील्सच्या माध्यमातून कधी दहशत वाढणारे तर कधी अत्यंत दुर्लक्षित करण्यायोग्य असणारे भाग घातले जातात जे अतिशय घातक आहे. सर्वसामान्य लोकांना या नव्या माध्यमातून चुकीच्या दिशेने मार्ग मिळतो हे वास्तव आहे. नुकताच वाघाने लहान मुलावर केलेला हल्ला या बनावट रीलने दहशत पसरवली आहे. बरेचदा यामुळे सत्य परिस्थिती डावलली जाते. माणसाची ही विकृती भयावह आहे. अशा प्रकारे रील्स तयार करणे हा एक खेळ झाला आहे. याला कुठेतरी आळा घालणं गरजेचं आहे. प्रगत विज्ञान हे प्रगतिपथावर घेऊन जाते, पण त्याचा गैरवापर मात्र अधोगतीला घेऊन जाते याचा विचार करण्याची वेळ आली आहे. दुष्ट मने एआयमुळे अकारण भीतीचे वातावरण समाजात निर्माण करत आहे. मानवी मेंदू अतिशय तल्लख आहे. त्याची निर्मिती हे एक आश्चर्य आहे हे मान्य करावेच लागेल पण याच मेंदूच्या आणि विज्ञानाच्या माध्यमातून अनुचित काही घडू नये इतकेच अपेक्षित आहे.

**संगीता वाईकर**/नागपूर

### छत्रपतीनगरवासीयांची सर्व बाजूंनी कोंडी

नागपूर शहरात गेल्या काही वर्षांपासून सर्वत्र विकासकामे होत आहे. विकासकामाला नागरिकांचा विरोध नाही पण ज्या प्रकारे ती होत आहे त्यामुळे लोक त्रस्त झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. सिमेंट रोड बनविले. त्याच्या बाजूला काँक्रिट ब्लॉक बसविले गेले पण हे करताना इतर विभागाचा समन्वय नसल्याने कधी इलेक्ट्रिक केबलकरिता रस्ते तोडले जातात तर कधी पाण्याची पाईप लाईन टाकण्यासाठी तर कधी पावसाचे पाणी वाहण्यासाठी पाईप टाकण्याकरिता रस्ते फोडले जातात. सर्वत्र धुळीचे साम्राज्य असते. या सर्व कामामुळे ट्रॅफिक ब्लॉकेज होते हे अजून तापदायक. छत्रपती नगरमधील विविध लेआऊटमध्ये वर्धा रोडकडून जाण्यासाठी ४ मार्ग आहेत. त्यापैकी मेट्रो स्टेशन बाजूचा रस्ता सदैव बस, कार, ऑटो, तिथे असल्यामुळे दिसतच नाही. जुन्या जनता हायस्कूलच्या बाजूचा रस्ता कित्येक दिवसापासून मोठे पाईप ठेवून बंद केला आहे. रेडिसनच्या अलिकडील रस्ता सुद्धा पाण्याच्या पाईपलाईनच्या कामामुळे खराब झाला आहे. त्या रस्त्याने रात्री जाणे धोकादायक झाले आहे. दक्षिण-पूर्व भागात जो श्रीनगरकडे रेल्वे ओव्हर ब्रिज आहे त्याच्या सर्व्हिस रोडने छत्रपती नगरकडे जो रस्ता आहे तो सुद्धा नवीन बनत असलेल्या पाण्याच्या टाकीकरिता टाकलेल्या पाईपलाईनने तुटला आहे. त्यामुळे तिथे सर्वत्र खड्डे पडले आहे. रिंग रोडवरून छत्रपती नगर मध्ये ३ रस्त्यांपैकी छत्रपती सभागृहाकडून एक रस्ता छत्रपतीनगरमध्ये येतो. तो सुद्धा आज पाईपलाईनचे काम असल्याने बंद केला आहे. एकूण सर्व बाजूंनी या नगरातील लोकांची गळचेपी करण्याचा विडाच प्रशासनाने उचलला आहे असे दिसत आहे.

**मोहन द. पांडे**/नागपूर

### चांदीला सोन्यासारखी चकाकी

गेल्या काही दशकांपासून दीर्घकाळ दुर्लक्षित असलेल्या चांदीने स्टॉक मार्केटमध्ये अद्वितीय कामगिरी केल्याने सोन्याहून अधिक परतावा गुंतवणूकदारांना दिला. आर्थिक वर्ष २०२५ मधील सर्वांत फायदेशीर गुंतवणूक म्हणून ती उदयास आली आहे. चांदीच्या ईटीएफने या कॅलेंडर वर्षात सरासरी १०२ टक्के परतावा देऊन गुंतवणूकदारांचे पैसे दुप्पट केले आहेत. मागणी आणि पुरवठ्याच्या कमतरतेच्या वादळात अडकलेल्या चांदीने सर्व विक्रम मोडले आहेत आणि अलिकडेच स्टॉक मार्केटमध्ये १.८ लाख रुपयांच्या जवळपास व्यवहार केला आहे. विश्लेषकांनी दीर्घकालीन लक्ष्य प्रतिकिलो दोन लाख रुपये इतके उच्च असल्याचे भाकीत केले आहे. विविध विश्लेषकांच्या अंदाजानुसार, भारतातील चांदीच्या एक्स्चेंज -ट्रेडेड फंड प्रचंड मोठा परतावा देणारे ठरले आहेत. ज्यामुळे इकर्मी गुंतवणूक झाली आहे आणि ते लक्षवेधी परतावा देतही आहेत. परंतु तज्ज्ञांचा असा इशारा आहे की ही वाढ स्वतःहून पुढे जात आहे.



जागतिक चांदीच्या किमती प्रति औंस ५० पर्यंत वेगाने वाढल्या आहेत. चार दशकांहून अधिक काळातील सर्वोच्च पातळीवर भारतातील चांदी पोहोचली असून चांदीच्या गुंतवणूकदारांना ईटीएफसाठी परतावा वाढवत आहेत. एका प्रकाशनातील अहवालानुसार, भारतातील अनेक चांदीच्या ईटीएफ आता त्यांच्या सूचक निव्वळ मालमत्तेच्या मूल्यापेक्षा लक्षणीय प्रीमियमवर व्यवहार करत आहेत. म्हणजेच गुंतवणूकदार मूळ चांदीच्या वास्तविक मूल्यापेक्षा जास्त पैसे देत आहेत. हे एक लक्षण आहे की मागणी पुरवठ्यापेक्षा खूपच जास्त आहे. विशेषतः चांदीच्या ईटीएफ त्यांच्या युनिट्सना भौतिक चांदीने परत करतात, जे घट्ट जागतिक पुरवठा साखळींमध्ये मिळवणे कठीण झाले आहे. एका आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांनी दिलेल्या चांदीच्या ईटीएफमध्ये ८६०३ कोटी रुपयांचा ओघ आला होता. जो गेल्या वर्षीच्या एकूण ओघापेक्षा जास्त आहे. आणखी एका प्रसारमाध्यमाने दिलेल्या माहितीनुसार काही चांदीच्या ईटीएफने या वर्षी आतापर्यंत पन्नास ते पंचावन्न टक्के एवढा परतावा दिला आहे, जो सोने आणि इक्विटी बेंचमार्कपेक्षा खूपच जास्त आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### मोदी नाम केवलम

''मोदी नाम केवलम'' ही घोषणा बिहार निवडणुकीच्या निकालांनी पुन्हा एकदा प्रतिध्वनित केली आहे. जनतेच्या मनात विश्वास, विकासाची आकांक्षा आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना यांचे प्रतीक म्हणून नरेंद्र मोदींचे नाव उभे राहिले आहे. निवडणुकीच्या निकालात रालोआला २४३ पैकी २०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या. ज्यात भाजप ८९ जागांसह सर्वांत मोठा पक्ष ठरला. विरोधकांचे गड कोसळले, महागठबंधनाला अपेक्षित पाठिंबा मिळाला नाही. बिहारमध्ये पुन्हा एकदा नितीश कुमार मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेणार असले तरी, विजयाचा मुख्य आधार मोदींचे नेतृत्व आणि रालोआची एकजूट ठरली आहे. ''मोदी नाम केवलम'' ही घोषणा केवळ राजकीय विजयाची नाही, तर जनतेच्या मनातील श्रद्धेची अभिव्यक्ती आहे. विकास, स्थैर्य आणि राष्ट्रीय अभिमान यांचे प्रतीक म्हणून मोदींचे नाव बिहारच्या जनादेशातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

### इंडिया आघाडीचा बिहारमध्ये सुपडा साफ

बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी मोठे राजकीय ध्रुवीकरण आणि सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बाजूने स्पष्ट कौल दर्शवला आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड बहुमत मिळवत पुन्हा एकदा बिहारमध्ये सत्ता स्थापन केली आहे. या निवडणुकीतील सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीचा झालेला दारुण पराभव, ज्याला सुपडा साफ असे संबोधले जात आहे.

मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा मुख्यमंत्री म्हणून मोठा कार्यकाळ आहे. यावेळी बिहारचे मुख्यमंत्री म्हणून ते दहाव्यांदा शपथ घेतील, जो एक विक्रम असेल. जितनराम मांझी यांचा २७४ दिवसांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ वगळता, गेल्या २० वर्षांपासून ते मुख्यमंत्री आहेत. या निवडणुकीत रालोआने एकहाती सत्ता मिळवली असून, महाआघाडीला (ज्यात काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि डावे पक्ष यांचा समावेश होता) फार कमी जागांवर समाधान मानावे लागले. भाजप हा रालोआमधील सर्वांत मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे, तर जेडीयूनेही आपली ताकद कायम राखली आहे. या निकालांनी हे सिद्ध केले की बिहारच्या मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा करिष्मा आणि नितीश कुमार यांच्या प्रशासनावर पुन्हा एकदा विश्वास दर्शवला आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

### लाडू प्रसादातील भेसळ, भक्तांच्या श्रद्धेचा अपमान

तिरुमला तिरुपती देवस्थानातील लाडू प्रसादात भेसळयुक्त तुपाचा मोठा घोटाळा उघडकीस आल्याची बातमी अतिशय धक्कादायक आहे. मंदिरांकडे केवळ पैसा कमावण्याचे साधन म्हणून पाहण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे, ही अत्यंत चिंतेची बाब आहे. श्रद्धाळू भक्तांच्या आरोग्याशी असा खेळ करणारे कोणतेही आस्थापन असो, त्यांनी केलेली ही कृती क्षमायोग्य नाही. गेल्या पाच वर्षांपासून लाखो किलो बनावट तूप लाडूंसाठी वापरले गेले आणि ते भक्तांच्या पोटात गेले आहे. यामुळे भक्तांच्या आरोग्यावर काही गंभीर परिणाम झाले असतील, तर त्याला जबाबदार कोण? जिथे प्रसाद हा भक्तांच्या धार्मिक भावना आणि जिव्हाळ्याचा विषय असतो, तिथेच भेसळ करून श्रद्धेचा व्यापार करणाऱ्यांना कधीच माफी नसावी. हा फक्त आर्थिक घोटाळा नसून धर्माची हानी आहे.

देवस्थान व्यवस्थापनाने अशा प्रकारच्या भेसळीविरोधात कठोर पावले उचलून भविष्यातील सर्व प्रक्रिया पारदर्शक करणे गरजेचे आहे. श्रद्धा आणि आरोग्य यांचा असा अपमान कधीही सहन केला जाऊ नये.

**अनिकेत शेटे**/पुणे

## आजचे संघगीत-४४

रविवार, १६ नोव्हेंबर २०२५

### नमन करें इस मातृभूमि को

नमन करें इस मातृभूमि को, नमन करें आकाश को
बलिदानों की पृष्ठभूमि पर, निर्मित इस इतिहास को ॥धृ॥

इस धरती का कण-कण पावन, यह धरती अवतारों की है।
ऋषि-मुनियों से वन्दित धरती, धरती वेद-पुराणों की है।
मौर्यगुप्त सम्राटों की यह, विक्रम के अभियानों की है।
महावीर गौतम की धरती, धरती चैत्य विहारों की है।
नमन करें झेलम के तट को, हिममंडित कैलाश को ॥१॥

याद करें सन सत्तावन की, उस तलवार पुरानी को हम।
रोटी और कमल ने लिख दी, युग की अमिट कहानी को हम।
माय मेरा रंग दे बसंती चोला, भगतसिंह बलिदानी को हम।
खून मुझे दो आज़ादी लो, इस सुभाष की वाणी को हम।
गुरु गोविन्दसिंह की कलियों के उस, अजर अमर बलिदान को ॥२॥

आओ हम सब मिल-जुल कर यह, संगठना का मंत्र जगायें।
व्यक्ति-व्यक्ति के हृदय में, राष्ट्रभक्ति के दीप जलायें।
हिन्दू-हिन्दू सब एक संग हो, भारत माँ का मान बढ़ायें।
अन्नपूर्णा भारतमाता, जग के सब दुख दैन्य मिटाये।
अर्पित कर दें मातृभूमि हित, तन मन धन और प्राण को ॥३॥

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### दारुच्या नशेत आजीला मारहाण, नातवाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**
दारूच्या नशेत आजीला मारहाण करणाऱ्या नातवाविरूध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रूक्मिणी मारुती क्षिरसागर (वय ८०, रा. आदर्श नगर, शेळगी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अभिषेक धनाजी पात्रे (रा. आदर्श नगर, शेळगी, सोलापूर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी आदर्श नगर येथे मिना धनाजी पात्रे हिच्या घरी परडा भरण्या असल्याने रुक्मिणी क्षिरसागर व त्यांची मुलगी या पात्रे यांच्या घरी गेल्या होत्या. त्यावेळी रुक्मिणी क्षिरसागर यांचा नातू अभिषेक पात्रे याने दारू पिऊन नशेत रुक्मिणी यांना तु येथे का आली म्हणून शिवीगाळ करून तु चाड्या लावते म्हणून रुक्मिणी यांना लाकडी बांबूने डाव्या पायास, गुडघ्याला मारहाण करून तुला बघून घेतो अशी धमकी दिली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

### कासेगाव येथे तरुणाचा गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**
कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे तरुणाने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.सोमनाथ लहू काळे (वय २४, रा. कासेगाव) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. सोमनाथ काळे याने १५ नोव्हेंबर रोजी साडेबाराच्या सुमारास राहत्या घरात पत्र्याच्या लोखंडी अँगलला अज्ञात कारणावरून गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी सोमनाथ यास गळफासातून सोडवून उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### वीजेच्या धक्क्याने बांधकाम मजूर जखमी

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**
पंढरपूर येथे घराचे बांधकाम करताना वीजेचा धक्का लागून काम गार जखमी झाला. यशपाल मल्हार बनसोडे (वय २६, रा. पंढरपूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या कामगाराचे नाव आहे. १० नोव्हेंबर रोजी दुपारी तीनच्या सुमारास पंढरपूर येथील चव्हाण यांच्या घराचे बांधकाम करीत असता असताना एमएसईबीच्या इलेक्ट्रिक वायरला खोचून घेतल्याने विजेचा धक्का लागून बनसोडे हा पत्र्यावर पडून जखमी झाला. यामध्ये बनसोडे यांचे सर्वांग भाजून जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी भाऊ सौरभ याने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातील रस्ते की मृत्युचा सापळा?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर -**
पुण्यातील नवले पुलाजवळ गुरुवारी (दि. १३) भयंकर अपघात घडला. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. हा अपघात इतका भीषण होता, की प्रवाशांना बाहेर पडायलाही वेळ मिळाला नाही. याआधी जळगाव येथे एक कार दुभाजकाला आदळल्याने गर्भवती महिलेचा गाडीतच जळून मृत्यू झाला. असे अपघात महाराष्ट्रात रोज घडत असतात. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात रस्ते अपघातांचे प्रमाण वाढले आहे. जानेवारी २०१९ ते सप्टेंबर २०२५ या सहा वर्षात राज्यात तब्बल ९५,७२२ लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे.

वाहतूक विभागाच्या आकडेवारीनुसार याच काळात २,१९,०३९ अपघात घडले असून ज्यात १,२९,६७० लोक गंभीर जखमी झाले आणि ५३,०३६ जणांना

## ६ वर्षांत अपघातात ९५,७२२ जणांनी गमावला जीव




किरकोळ दुखापत झाली आहे. हा आकडा फारच भयावह आहे. वाहतूक विभागाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत २६,९२२ अपघात घडले असून ११,५३२ लोकांचा मृत्यू झाला आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत २६,७१९ अपघातांमध्ये ११,५७३ जणांचा मृत्यू नोंदवण्यात आला होता. या सहा वर्षांमध्ये २०२० मध्ये रस्ते अपघातांची संख्या कमी झाली. कारण या काळात कोरोनाच्या साथीमुळे वाहतुकीवर निर्बंध होते. मात्र, नंतरचे आकडे सातत्याने वाढत आहेत.

राष्ट्रीय पातळीवर २०२३ मध्ये भारतात

### सोलापूर शहरात २६ टक्के वाढ...

यावर्षी जानेवारी ते सप्टेंबर दरम्यान सोलापूर जिल्ह्यात अपघातांमध्ये २६ टक्के वाढ झाली आहे. त्यानंतर धाराशिव (२७ टक्के), वाशिम (३७ टक्के) आणि सांगली (२५ टक्के) यांचा क्रमांक आहे. मृत्यूच्या दृष्टीने बुलढाणा जिल्हात ५९ टक्के वाढ झाली आहे. सांगली (५४ टक्के), सोलापूर शहर (५० टक्के), लातूर (३३ टक्के), भंडारा (३३ टक्के), छत्रपती संभाजीनगर ग्रामीण (२९ टक्के) आणि अमरावती (२५ टक्के) यांचा उल्लेखनीय सहभाग आहे.


रस्ते अपघातांत १,७२,८९० लोकांचा मृत्यू झाला. त्यात १५,३६६ मृत्यूंसह महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर होता, तर तामिळनाडू पहिल्या आणि उत्तर प्रदेश दुसऱ्या क्रमांकावर होता. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये मुंबईत सर्वाधिक १, ८७८ अपघात घडले, तर नाशिक ग्रामीण जिल्हा मृत्यूच्या दृष्टीने आघाडीवर आहे, जिथे ६५६ अपघातात अनेक मृत्यू नोंदवले गेले.

तज्ज्ञांच्या मते, महामार्गावरील अपघातांचे मुख्य कारण म्हणजे कमकुवत रस्ते, रस्त्यावरील खड्डे, बेजबाबदारपणे वाहन चालवणे, चालकाचे अपुरे प्रशिक्षण आणि ओव्हरलोड वाहनांची वाहतूक. वाहतूक विभागाने अपघात कमी करण्यासाठी अनेक उपाय राबवले तरी, अपघातांचे प्रमाण अजूनही चिंताजनक आहे, त्यामुळे नागरिकांनी वाहन चालवताना अधिक सतर्क राहण्याची गरज आहे.

# मुंबई-चेन्नई सुपरफास्ट मेलला एलएचबी डबे जोडले जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**
रेल्वेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा लांब पल्ल्याचा रेल्वे प्रवास आता अधिक सुरक्षित आणि आरामदायी होणार आहे. मुंबई सीएसएमटी चेन्नई एग्मोर - मुंबई सीएसएमटी सुपरफास्ट मेल २२१९५ ७ / २२१९५ ८ या गाडीला नवीन एलएचबी अधिक डबे जोडण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे.

हे एलएचबी डबे हलके सुरक्षित आणि उच्च वेगाने स्थिर चालणारे असल्याने प्रवाशांना अधिक सुखद धक्का रहित व शांत प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. याशिवाय या डब्यांची



सुरक्षा तंत्रज्ञान आधारित असल्यामुळे अपघातांमध्ये धोका कमी होतो. या बदलामुळे मुंबई - चेन्नई मार्गावर प्रवास करणाऱ्या सोलापूरकरांना अधिक आधुनिक आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

या डब्यांमध्ये एलएजीबी डबे हे स्टेनलेस स्टील पासून तयार केलेले आहेत. यात अँटी क्लाइंबिंग यंत्रणा, अग्निरोधक साहित्य, एलईडी प्रकाश व्यवस्था, पाच पिन चार्जिंग सर्किट्स, डिस्क ब्रेक, एसी टू टीअर वाढवण्यात आले. स्लीपर कोचेस घटले. दिव्यांगजन अनुकूल कोच यथावत, नवीन लगेज कम ब्रेक व्हॅन मुंबई सीएसएमटी वरून दि. १४ जानेवारी २०२६ पासून तर चेन्नई एग्मोर वरून १७ जानेवारी २०२६ पासून अंमलबजावणी होणार आहे.

# बल्करने दाबल्याने कार डिव्हायडरला धडकली; तीन लाखांचे नुकसान

## बल्करचालकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ नोव्हेंबर-**
जुना पूना नाका येथील घाण पाण्याच्या पुलावर बल्करचालकाने कारचालकास दाबल्याने कार डिव्हायडरला धडकून कारचे ३ लाख रुपयांचे नुकसान झाले. याप्रकरणी बल्करचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोमनाथ शहाजी गायकवाड (वय ३९, रा. शेळगाव, ता. बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इरण्णा मल्लिकार्जुन चिंचोळे (रा. माशाळ, ता. अफजलपूर, जि. गुलबर्गा, कर्नाटक) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ नोव्हेंबर रोजी रात्री सोमनाथ गायकवाड हे एमएच १३ डीएम ४४१५ क्रमांकाची कार चालवित बार्शीकडून सोलापूरकडे येत होते. जुना पूना नाका येथील घाण पाण्याच्या पुलावर गायकवाड यांची कार आली असता केए ३२ एबी ६८२६ क्रमांकाच्या बल्कराचा चालक इरण्णा चिंचोळे याने त्याच्या ताब्यातील बल्करने गायकवाड यांच्या कारला समोरून डाव्या बाजूस दाबल्याने गायकवाड यांची कार ही डिव्हायडरला धडकून जागेवरच थांबली.

या अपघातात गायकवाड यांच्या कारचे ३ लाख रुपयांचे नुकसान झाले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

# राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उद्या पुण्यात मोर्चा

## आश्वासित प्रगती योजनेसह अन्य मागण्या मंजूर करा : सोलापूर जिल्ह्यातून हजारो कर्मचाऱ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर -**
राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या मागण्या तत्काळ मान्य कराव्या या मागणीसाठी १७ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाड्यापासुन शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील शाळांमधील शिक्षकेतर कर्मचारी न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे नवीन सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा १०/२०/३० वर्षानंतरचा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा या प्रमुख मागण्यासह अन्य मागण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार असून सोलापूर जिल्ह्यातून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा अध्यक्ष रविकांत सुर्वे, सचिव मुस्ताक शेतसंदी आणि संघटनेचे मार्गदर्शक श्रीशैल तळवार यांनी केले आहे.

**या आहेत कर्मचाऱ्यांच्या मागण्या**

माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण पदासाठी पात्र असणारे शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतनश्रेणी संरक्षणासह शिक्षक पदावर विनाअट पदोन्नती देण्यात यावी. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची २४ वर्षानंतर वेतन निश्चिती एस फोर मध्ये न करता पूर्वीप्रम णे एस फाईव्ह मध्येच केली पाहिजे. माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला २४ वर्षाचा दुसरा लाभ हा राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमा णे पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावा. गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेली पदभरती तात्काळ सुरू करण्यात यावी. महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शाळांम ध्ये चतुर्थश्रेणी कर्मचारी यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने न करता पूर्वीप्रमाणे नियमित वेतनश्रेणीत करण्यात यावी. माध्यमिक शाळातील वरिष्ठ लिपिक, मुख्य लिपीक, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल अतिरिक्त झाल्यास सेवानिवृत्त होईपर्यंत वेतनास व वेतनश्रेणीस संरक्षण मिळावे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या लिपिक, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल, शिपाई यांच्या वेतनातील त्रुटी तात्काळ दूर करण्यात याव्यात. शिक्षकेतर कर्मचारी यांची अर्जित रजा साठवण्याची मर्यादा काढून टाकावी.

दैनिक तरुण भारतमध्ये दि. ११/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर समन्समध्ये केस नं. ७९०/२५-२६ हे चुकीने प्रसिध्द करण्यात आले नव्हते. त्या चुकीची दुरुस्ती खालीलप्रमाणे

**जाहीर समन्स**
**मा. उपबिंधक, सहाकरी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी वॅक्स को. ऑप असोसिएशन लि. सोलापूर**
१३३ (अ) सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**शरद नागरी सहकारी बँक लि., सोलापूर** - अर्जदार
२१८/२१९ ब, गोल्ड फिंच पेठ, लकी चौक सोलापूर
विरूद्ध
(खालील तपशिलातील नमूद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार

| अ. क्र. | केस नं. | दावा रक्कम | नाव देणार क्र. | नाव देणार नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ७९०/२५-२६ | १,००,६०४ | ४ | भडकुंबे शिलाबाई कुमार रा. ३७/३७, कल्याण नगर, जुळे सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.
**उपनिर्दीष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि. २५/११/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर राहावे.**
या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनवणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**सही-**
**उपनिबंधक**
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को. ऑ. असोसिएशन लि. सोलापूर

**जाहीर प्रगटन**
सोलापुर जिल्हयातील व धाराशिव जिल्हयातील तसेच तुळजापुर तालुक्यातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की , आमचे अशील १. रकान अब्दुल करीम शेख रा . खाजा नगर , गाझी मैदान , खातुन मंजील , धाराशिव ( उस्मानाबाद ) ता . जि . धाराशिव २. सुरेद्र गोविंदरराव हौसलमल रा . धाराशिव यांनी दिलेल्या माहिती व अधिकारपत्रावरून तसेच दाखवलेल्या कागदपत्रावरून खालीलप्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात येत आहे. आमचे अशील रकान अब्दुल करीम शेख यांनी सुजीतसिंह उदयसिंह दिखखत रा. अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड यांचे स्वसंपादीत मालकी व कब्जेवहिवाटीची मौजे होनसळ ता . उ . सोलापुर जि . सोलापुर खरेदी प्रमाणे शेतजमीन गट नं.३३ /२/ ब पैकी दक्षिणेची जमीन ऑनलाईन ७/१२ प्रमाणे शेतजमीन गट नं.३३/५ मधील जमीन क्षेत्र ०० हे ८०.२५ आर, आकर ०० रु ६ ९ पैसे ज्याच्या चतुर्सिमा पुर्वेस- शिव रस्ता , पश्चिमेस गट नंबर ३३/२ अ ( ३३/२ ) , दक्षिणेस रस्ता, उत्तरेस - गट नंबर ३३/४ . येणेप्रमाणे चतु : सिमेच्या आतील जमीन मिळकत खरेदी घेण्याचा आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचा तोंडी ठराव केलेला आहे. सदर वर नमुद जमीन मिळकतीवरती , राष्ट्रीयकृत किंवा खाजगी बँक , पतसंस्था , सोसायटी व इतर कोणत्याही शासकीय व निमशासकीय संस्थेचा कर्ज बोजा , दान , गहाण , तारण , साठेखत , करारनामा अथवा इतर कुठलाही लेखी दस्तवेज संदर्भात व मिळकतीच्या हक्क व मालकी संबंधी जर कोणाची काही हरकत किंवा तकार असेल आमचे अशिलासी आठ दिवसाच्या आत संपर्क साधावा . मुदतीत कोणाची हरकत किंवा आक्षेप आला नाही तर सदर वर नमुद जमीनीचा खरेदी व्यवहार आमचे अशील सुजीतसिंह उदयसिंह दिखखत यांच्याकडून खरेदीदस्त नोंदवुन दुय्यम निबंधक कार्यालय धाराशिव येथे पुर्ण करतील परत येणाऱ्या हरकतीचा किंवा तक्रारीचा कसलाही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी . सबब हे जाहीर प्रगटन कोणाची फसगत होवु नये करिता देण्यात येत आहे.
दिनांक- १३/११/२०२५

**जाहिर प्रगटन देणार**
**अब्दुल करीम शेख**

**सही/-**
**तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. प्रविण बन्सीलाल सुतार, धाराशिव**
**बी. एलएल.बी. जिल्हा व सत्र न्यायालय, धाराशिव**
**मो.नं. ९४२०२०१२५२**

# रेल्वेतून विनातिकीट प्रवास करणाऱ्यांकडून ६ कोटी ७२ लाखांची वसुली

## सात महिन्यांच्या काळात १ लाख ४१ हजारांचा दंड वसूल



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर -**
रेल्वे प्रवास सुरक्षित, सुगम आणि आरामदायी बनवण्यासाठी रेल्वे प्रशासनाने विनातिकीट प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्या प्रयत्नांना अधिक वेग दिला आहे. याच अनुषंगाने, रेल्वे विभागाने विनातिकीट प्रवास करणाऱ्या फुकट्या प्रवाशांना मोठा चाप दिला आहे. यामध्ये सोलापूर विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षातील एप्रिल ते ऑक्टोबर २०२५ या सात महिन्यांच्या काळात, १ लाख ४१ हजार अनधिकृत आणि विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून दंड म्हणून तब्बल ६ कोटी ७२ लाखाची विक्रमी वसुली करण्यात आली आहे.

प्रवाशांच्या तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी रेल्वे विभागाने २४७ कार्यरत असलेले एक विशेष पथक नेमले आहे. या पथकाशी संपर्क साधण्यासाठी व्हॉट्सॲप तक्रार क्रमांक ७२०८८१९९८७ उपलब्ध करून देण्यात आला आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना त्यांच्या समस्यांवर तातडीने उपाय मिळण्यास मदत होणार आहे. सोलापूर विभागाने सुव्यवस्थित आणि सखोल तिकीट तपासणी मोहिमेद्वारे हे यश मिळवले आहे. ही कारवाई रेल्वे नेटवर्कमध्ये सुव्यवस्था राखण्यासाठी आणि महसूल वाढवण्यासाठी रेल्वे प्रशासन कटिबद्ध असल्याचे पहायला मिळत आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**यांत्रिक काम**
**निविदा सूचना क्रमांक ११-२०२५**
**दिनांक १४.११.२०२५**
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने डीआरएम(एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. कामाचे नाव त्याच्या परिसरासह : सोलापूर विभागातील (LHB) AC कोचमध्ये आरएमपीयूच्या खाली FRP ट्रफच्या जागी मेटल ट्रफ (SS Drip Tray) अंमलबजावणीचे कंत्राटी काम. निविदा प्रणाली सिंगल पॅकेट सिस्टम., कामाची अंदाजे किंमत-रु.50,85,715.95/-, निविदा फॉर्मची किंमत-शून्य, निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता - डीआरएम (एम) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, जमा करावयाची रक्कम -रु.1,01,800/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी - काम सुरू झाल्यापासून सहा महिने. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ 08.12.2025 रोजी दुपारी 3.00 वाजता, निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ 08.12.2025 रोजी दुपारी 3.30 वाजता. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक ठिकाण जिथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल - www.ireps.gov.in
SUN 91 **Sr. DME/Solapur**
टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**
तमाम लोकांस विशेषतः मौजे हिंगणगाव (बु.) व ता. परंडा, जि. धाराशिव (उस्मानाबाद) येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, अ) मिळकतीचे वर्णन डी. धाराशिव (उस्मानाबाद) सब. डी. व ता. परंडा पैकी मौजे हिंगणगाव (बु.) येथील, ता. पं. समिती परंडा व ग्राम पंचायत हिंगणगाव (बु.) हद्दीतील जमीन याचा गट नं. १५०/क, याचे एकूण क्षेत्र हे. १०- २५ आर., याचा आकार रुपये ०२ १४ पैसे आहे, यापैकी पूर्व बाजूकडील बार्शी शिव रस्त्यास लगत जिरायत जमीन याचे क्षेत्र हे. ०१- ९८ आर याचा आकार रु. ००-४२ पैसे अशी जिरायत जमीन.. यासी चतुःसीमा पूर्वेसः शिव रस्ता बार्शी.. दक्षिणेस गट नं. १५०/क पैकी उर्वरित जमीन.. पश्चिमेस : गट नं. १५०/ब जमीन, उत्तरेसः राहुल खारवणे यांची जमीन, येणे प्रमाणे चतुःसीमा पूर्वक जमीन, सदर जमीनीत जाणेयेणे साठी गटाच्या पूर्व बाजूच्या रस्त्याने जाणेयेणेसाठी रस्ता याच्या वापराच्या हक्कासह. येणे प्रमाणे तदंगभूत वस्तू हक्कासह जमीन.
ब) मिळकतीचे वर्णन डी. धाराशिव (उस्मानाबाद) सब. डी. व ता. परंडा पैकी मौजे हिंगणगाव (बु.) येथील, ता. पं. समिती परंडा व ग्राम पंचायत हिंगणगाव (बु.) हद्दीतील जमीन याचा गट नं. १५०/ब, याचे एकूण क्षेत्र हे. १९८० आर., याचा आकार रुपये ०४७२ पैसे आहे, यापैकी जिरायत जमीन याचे क्षेत्र हे. ०७ ९० आर याचा आकार रु. ०१- ९२ पैसे अशी जिरायत जमीन.. यासी चतुः सीमा पूर्वेस गट नं. १५०/क पैकी जमीन., दक्षिणेसः गट नं. १५०/ब पैकी उर्वरित जमीन., पश्चिमेस गट नं. १५०/ब पैकी उर्वरित जमीन, उत्तरेसः गट नं. १६६ ची जमीन, येणे प्रमाणे चतुःसीमा पूर्वक जमीन.
सदर वर नमूद जमीनी या श्री. नागेश हरिभाऊ अक्कलकोटे यांच्या खरेदी मालकीच्या व कब्जे वाहिवाटीच्या असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरच्या जमीनी श्री. नागेश हरिभाऊ अक्कलकोटे विक्री करू इच्छितात. सदर जिरायत शेत जमीन विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने श्री. नागेश हरिभाऊ अक्कलकोटे यांनी सदरच्या जिरायत शेत जमीनी विक्री करणे बाबतचा करार आमच्या अशीलाशी केला त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रककम स्वीकारली आहे. व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.
सदर मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही, असे गृहीत धरून मिळकत बिनबोजाची, क्लेअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. १५/११/२०२५.

**सही -**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
**पत्ता. ऑफिस - कुलदिप लिगल अस्सोसिएट,**
**गाळा नं. ५१, बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर,**
**भाजी मांडी जवळ, बार्शी, ता. बार्शी,**
**जि. सोलापूर (अशिला तर्फे ॲडव्होकेट)**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**
तमाम लोकांस कळविण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन** - डि. व सब डि. सोलापूर, ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्यवाढ भागातील कसबे सोलापूर येथील नवीन सर्व्हे नं. १८९/१/१ यांसी ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे नवीन सर्व्हे नं. १८०/१/२ खरेदी दस्तानुसार सर्व्हे नं. १८०/१/१ पैकी **'नियोजीत म्हेत्रे नगर'** या नावाने ओळखले जाणारे नगर मधील प्लॉट नं. ५१ पैकी पुर्वेकडील यांसी हद्द पुर्वपश्चिम २० फुट व दक्षिणोत्तर ४० फुट असे एकुण क्षेत्र ८००.०० चौ. फुट अथवा ७४.३४ चौ. मी. अथवा ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे ०.००.७४ आर.चौ.मी. असून, यांसी चतुःसिमा पुर्वेस- रस्ता, पश्चिमेस-सदर प्लॉट जागापैकी राहिलेली जागा, दक्षिणेस-प्लॉट नं.५२, उत्तरेस-रस्ता, येणेप्रमाणे वर नमुद वर्णनातील प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभूत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.
वर नमूद प्लॉट जागा **श्री मल्लिनाथ चंद्रशेखर हिरेमठ** रा. सोलापुर, यांचे मालकीचे व कब्जेवहिवाटीचे असुन, त्यांनी **१) उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक सोलापुर २) श्री अरुणोदय मल्टी स्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. सोलापुर** यांचेकडुन वर नमुद मिळकत तारण ठेवून कर्ज घेतलेले होते. सदर कर्ज थकीत असल्यामुळे, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने सोलापुर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी सोलापुर यांचे न्यायालयात डठऋएडख लीं-२००२ कलम १४ अन्वये क्रि.कि. अर्ज क्रं.६४४/२०२४ चा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मे. न्यायालयाने वर नमुद मिळकतीचे जप्तीचे आदेश दिलेले आहे. सदर आदेशांतर्गत वर नमुद मिळकत जप्त केलेली आहे. त्यानुसार वर नमुद मिळकत जप्त केलेली उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक व श्री अरूणोदय मल्टी स्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. सोलापुर यांनी कायदेशीररित्या लिलावात विक्रीस काढले असता, आमचे अशिलांनी वर नमुद मिळकत त्याचे नांवे मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून सदर बँकेत कर्जाची थकीत रक्कम भरलेली आहे.
तरीपरंतु वर नमूद मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती, बोजा, कोर्ट केस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क वा हितसंबंध वा वाद असल्यास त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे लेखी कळवावे, मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची अगर यावर कोणाचाही कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर मात्र कुणाचेही कसलीही तक्रार व हरकत चालणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.
ही जाहिर नोटीस दिली ता. १५/११/२०२५

**सही -**
**श्रीधर गोविंद मागनूर**
**ॲडव्होकेट**
**नोटरी (भारत सरकार)**
**पत्ता- प्लॉट नं.३०, बालाजी विला सोसायटी, गांधी नगर, विडी घरकूल रोड सोलापूर मो.-९९२३५९२८५१**
**अशिल श्री विजयकुमार शिवशरण गुजले तर्फे ॲडव्होकेट**

**जाहीर प्रसिध्दीकरण**
दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४६/२०२५
**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे. कोर्टात**
१) रजिया गुलाब माशाळे
वयः ४९, वर्षे, धंदा:- घरकाम
रा.मु.पो. लिंबी चिंचोळी, उत्तर सोलापूर, वळसंग, सोलापूर
२) रियाना अब्बास अली हुन्नूटगी
वयः ६५ वर्षे, धंदा:- घरकाम,
रा. नागधान, व्ही.टि.सि. बिजापूर, कर्नाटक
३) रुबीना फिरोज माशाळे
वयः- ४१ वर्षे, धंदाः- अंगणवाडी सेविका
४) नसिमा सलीम मुल्ला -- **अर्जदार**
वयः- ४३ वर्षे, धंदाः- घरकाम
अर्जदार नं.३ व ४ रा. ५११, डीसीसी बँक जवळ, मु. पो. जेऊर, तालुकाः- अक्कलकोट, जिल्हा सोलापूर
५) कौसर सलीम मुल्ला
वयः- २५ वर्षे, धंदाः घरकाम
रा. रेवणसिद्ध नगर, होटगी रोड, सोलापूर
६) पैगंबर सलीम मुल्ला
वयः- २३ वर्षे, धंदाः- शिक्षण
रा. ५११, डीसीसी बँक जवळ, मु.पो. जेऊर,
तालुकाः- अक्कलकोट, जिल्हा सोलापूर
विरुद्ध
कोणी नाही -- **सामनेवाला**
ज्याअर्थी यातील अर्जदार नं. ४ हि मयत सलीम म. हनिफ मुल्ला यांची पत्नी तर अर्जदार नंबर ५ हि मुलगी तर अर्जदार नंबर ६ मुलगा हे आहेत. तर हसन म. हनिफ मुल्ला विना विवाह विना अपत्य मयत झालेले असून, त्यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार नंबर १ ते ३ बहिणी या नात्याने तर अर्जदार नंबर ४ वहिनी या नात्याने तर अर्जदार नंबर ५ व ६ हे भावाची मुले या नात्याने कायदेशीर वारसदार झालेले आहेत. सदरची मिळकत हि मयत हसन व सलीम यांचे वडील होती. ते मयत झाले असून, त्यांना अर्जदार नंबर १ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. मयत्त सलीम म. हनिफ मुल्ला व हसन म. हनिफ मुल्ला यांचे नावावर सोलापूर डि।। व सब डि।। पैकी ता. अक्कलकोट पैकी मौजे जेऊर येथील नगर परिषद हद्दीतील सी.टी.एस. नंबर ३७७ यांसी क्षेत्र १५३.८० चौ.मी. हि घरजागा मिळकत आतील तदंगभूत वस्तुसह व एजमेंटच्या सर्व हक्कासह आहे. या मिळकतीस अर्जदार नं १ ते ६ यांचे नावाची नोंद होऊन मिळणेसाठी वारसा दाखला मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.
त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार व्यक्तीरिक्त इतर कोणी वारसदार असल्यास व त्याप्रमाणे कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही जाहीर प्रसिध्दकरण प्रसिध्द झाल्यापासून में कोर्टानी नेमलेली तारीख.०९/१२/२०२५ रोजी स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणं माडावे मुदतीत काहीही हरकत नाही अस समजून या अर्जाची चौकशी होऊन में. कोर्ट पूढील योग्य ते आदेश करतील.
आज दि. १५ केलं असे माहे. ११/२०२५ रोजी आमचं सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्द केले आहे.

**सही/-**
**क. लिपीक**

शिक्का

**हुकूमावरुन**
**सही/-**
**सहा अधिक्षक दिवाणी न्यायालय, सोलापूर**



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - ३१

## जगातील रनिंग रेसचे प्रकार

रनिंग स्पर्धा मुख्यतः अंतर, पृष्ठभाग, फॉर्मॅट आणि कालावधी यावर आधारित असतात. यातील ठराविक स्पर्धा ऑलिम्पिकमध्ये अधिकृतरीत्या नोंदवलेल्या आहेत.

● **ट्रॅक रेस**

यात १००मी २००मी आणि ४००मी या स्प्रिंट रेसशुद्ध वेगाची परीक्षा.पुढे ८००मी व १५००मी. या मिडल-डिस्टन्स रेस येतात, ज्यात वेग आणि स्टॅमिनाची एकत्रित गरज असते.ट्रॅकवरील लांब पल्ल्याच्या रेसमध्ये ३०००मी, ५०००मी आणि १०,०००मी या प्रमुख स्पर्धा घेतल्या जातात.

● **रोड रेस**

सर्वात लोकप्रिय प्रकार. यात ५किमी, १०किमी, हाफ मॅरेथॉन (२१.१की) आणि फुल मॅरेथॉन (४२.२की) या स्पर्धा घेतल्या जातात.रोडचा पृष्ठभाग सपाट किंवा सौम्य उतारचढाव असू शकतो. टायमिंग मॅटमुळे वेळ आणि अंतर अचूकपणे मोजले जाते.

● **अल्ट्रा मॅरेथॉन**

फुल मॅरेथॉनपेक्षा जास्त अंतर असलेल्या सर्व स्पर्धा. यात ५०की, ८०की, १००की, १०० माईल तसेच २, ३ किंवा ६ दिवसांच्या मल्टी-डे अल्ट्रा स्पर्धा घेतल्या जातात.याचबरोबर टाइम-बेस्ड रेस ६ तास, १२ तास, २४ तास, ४८ तास आणि ७२ तास अत्यंत कठीण मानल्या जातात. यापैकी काही स्पर्धा स्टेडियममध्येही होतात, ज्यांना स्टेडियम रन म्हणतात.

● **ट्रेल रन**

नैसर्गिक भूभागावर आधारित रेस जंगलातील रस्ते, दगड, मातीचे मार्ग, टेकड्या अशा कच्च्या पथांवर घेतल्या जातात.माउंटन रनमध्ये सतत चढउतार असतात; स्काय रनिंग ही अतिशय उंच, तांत्रिक पर्वतरांगांवरील रेस आहे.याशिवाय डेजर्ट रन, स्नो रन, बीच रन या हवामानाशी झुंज देणाऱ्या स्पर्धा आहेत.

● **बॅकयार्ड अल्ट्रा**

अल्ट्रा मॅरेथॉनमधील वेगळा व लोकप्रिय फॉर्मॅट. प्रत्येक तासाला ६.७ किमी धावून पूर्ण करावे लागते. प्रत्येक तासाला नवीन ''लॅप'' सुरू होते. शेवटपर्यंत उभा राहिलेला एकच धावपटू विजेता ठरतो.

● **स्टेज रेस**

या फॉर्मॅटमध्ये धावपटू अनेक दिवस विविध टप्प्यांमध्ये धावतात. उदा.: ६२ दिवसांत ६२ मॅरेथॉन पूर्ण करण्यासारखे जागतिक विक्रम.

● **टीम-आधारित स्पर्धा**

यात ४१००मी रिले ४४००मी रिले आणि मॅरेथॉन रिले यांचा समावेश होतो.

● **स्टीपलचेस रेस**

ही अडथळ्यांसह चालणारी ट्रॅक रेस. लोकप्रिय अंतर ३००० मीटर. रेसमध्ये एकूण २८ अडथळे (बारियर्स) आणि ७ वॉटर जंप पार करावे लागतात.

● **ऑब्स्टॅकल रेस**

भारतात वेगाने लोकप्रिय होत असलेली रेस. साधारण ५ अंतर आणि त्यात १५ कठीण अडथळे पार करावे लागतात. तांत्रिक कौशल्य व ताकद आवश्यक.

● **फन रन**

मनोरंजनासाठी घेतल्या जाणाऱ्या २३५ किमी रन/वॉक स्पर्धा.यात टाइमिंगपेक्षा उत्साह, अनुभव आणि सहभागाला अधिक महत्व दिले जाते.

अशा प्रकारे अंतर, भूगोल आणि आवडीनुसार रनिंग जगात असंख्य स्पर्धा उपलब्ध आहेत. प्रत्येक प्रकार वेगळा अनुभव देतो आणि धावपटूला नवीन शारिरीक व मानसिक आव्हान स्वीकारण्यास प्रेरित करतो.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
मो. ९१७५८२८२०३

# दुसरा दिवसही गोलंदाजांनी गाजविला

**खेळपट्टीची धूळधाण, एकाच दिवशी १५ बळी**

**सायमन हार्मर, रवींद्र जडेजाचे प्रत्येकी ४ बळी**

**भारताला विजयाची आशा**



रवींद्र जडेजाचे (मध्य भागी) अभिनंदन करताना भारतीय खेळाडू

◆ **कोलकाता, १५ नोव्हेंबर**

ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यानच्या पहिल्या कसोटी सामन्याचा दुसरा दिवस गोलंदाजांनी गाजविला. पहिल्या दिवशी ११ बळी गेल्यानंतर आज दुसऱ्या दिवशी १५ फलंदाज बाद झालेत. पहिल्या दिवशी वेगवान गोलंदाज पूर्ण प्रदर्शनात असताना, फिरकी गोलंदाजांनी फलंदाजांना आपल्या तालावर नाचायला लावले. दुसऱ्या दिवशी खेळ संपला तेव्हा दक्षिण आफ्रिकेची दुसऱ्या डावांत ७ बाद ९३ धावा अशी स्थिती झाली होती, त्यांची आघाडी केवळ ६३ धावांवर होती. त्यामुळे भारताच्या विजयाच्या आशा पल्लवीत झाल्या आहे.

पहिल्या दिवशी दक्षिण आफ्रिकेचा संघ पहिला डाव केवळ १५९ धावांवर आटोपला.भारताने १ बाद ३७ धावांवरून पुढे दुसऱ्या दिवसाच्या खेळास सुरुवात केली आणि संपूर्ण संघ १८९ धावांत बाद झाला. पहिल्या डावात भारताला केवळ ३० धावांची आघाडी मिळविता आली. आतापर्यंत सामन्यात एकही फलंदाज ४० धावांपर्यंत पोहोचू शकलेला नाही.

**जखमी निवृत्त गिल फलंदाजीसाठी परतला नाही**

१८ धावांवर यशस्वी जयस्वाल (१२) बाद झाल्यानंतर टीम इंडिया अडचणीत आली. दरम्यान, केएल राहुलने वॉशिंग्टनसोबत दुसऱ्या गड्यासाठी ५७ धावांची भागीदारी करत संघाला सावरले. दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात वॉशिंग्टन सुंदरने ८२ चेंडूत २९ धावा केल्या, तर केएल राहुलने ३९ धावा केल्या. कर्णधार गिल चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आला. पहिले दोन डॉट बॉल खेळल्यानंतर गिलने पुढच्या चेंडूवर चौकार मारला, परंतु दरम्यान, त्याच्या मानेमध्ये वेदना जाणवू लागल्या, त्यानंतर गिल जखमी निवृत्त झाला.

हार्मरने चार फलंदाजांना बाद केले. उपकर्णधार ऋषभ पंत पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने २४ चेंडूत २७ धावा केल्या, ज्यात दोन षट्कार व दोन चौकारांचा समावेश होता. रवींद्र जडेजानेही २७ धावा केल्या. भारताने १८९ धावांवर नववा फलंदाज गमावला, परंतु गिल फलंदाजीला परतला नाही. यामुळे भारतीय डावाचा शेवट झाला. दक्षिण आफ्रिकेकडून सायमन हार्मरने सर्वाधिक ३० धावांत ४ बळी, तर मार्को जॅन्सनने ३५ धावांत ३ बळी घेतले.केशव महाराज, बॉशने प्रत्येकी १ बळी टिपला.

**दक्षिण आफ्रिकेची दुसऱ्या डावाची वाईट सुरुवात**

अष्टपैलू रवींद्र जडेजाच्या नेतृत्वाखालील फिरकी गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले. दक्षिण आफ्रिकेच्या दुसऱ्या डावाची पुन्हा एकदा वाईट सुरुवात झाली. कुलदीप यादवने रायन रिकेलटनला बाद करून दक्षिण आफ्रिकेला पहिला धक्का दिला, तो पायचित झाला. त्यानंतर रवींद्र जडेजा मैदानात आला. पहिल्या डावात एकही बळी न मिळालेल्या जडेजाने एकामागून एक दक्षिण आफ्रिकेच्या चार फलंदाजांना बाद केले. एडेन मार्कराम ४, विआन मुल्डर ११, टोनी झोर्झी २ आणि ट्रिस्टन स्टब्स ५ धावा काढून तंबूत परतले.

यानंतर अक्षर पटेलने काईल व्हेरेनला त्रिफळाचित केले. त्याने केवळ ९ धावा केल्या. मार्को जॅन्सनने मोठा शॉट खेळण्याचा प्रयत्न केला आणि १३ चेंडूत १३ धावा काढल्यानंतर कुलदीप यादवने त्याला बाद केले.

दुसऱ्या दिवसाचा खेळ आटोपला, तेव्हा कर्णधार टेम्बा बावुमाने ७८ चेंडूत नाबाद २९ धावाची खेळी केली, तर कॉर्बिन बोर्श एका धावेवर नाबाद राहिला.

रवींद्र जडेजाने आतापर्यंत ४ बळी घेतले आहेत तर कुलदीप यादवने २ बळी घेतले आहेत. अक्षर पटेलला एक यश मिळाले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# महिलांच्या करारांच्या मूल्यात वाढ होणार : हरमनप्रीत कौर

◆ **नवी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या एकदिवसीय विश्वचषक विजयानंतर बीसीसीआयच्या पुरुष आणि महिलांच्या केंद्रीय करारांचे मूल्य आता जवळ येईल, पुरुषांप्रमाणे महिला खेळाडूंचेही मानधन वाढेल, असा विश्वास भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने व्यक्त केला.

बीसीसीआयने २०२२ मध्ये महिला क्रिकेटपटूंचे सामना शुल्क पुरुषांच्या बरोबरीने आणले होते, परंतु जेव्हा केंद्रीय करारांचा विचार केला जातो तेव्हा संख्या तुलना करण्यासारखी नाही. मानधनाची रक्कम रचना बाजारातील शक्तींमुळे चालते, असे स्मृती मंधानाचा विश्वास आहे आणि कर्णधार त्या मताशी सहमत दर्शविली आहे.

पुरुषांच्या सर्वोच्च श्रेणीतील क्रिकेटपटूंना दरवर्षी ७ कोटी रुपये, तर महिलांना ५० लाख रुपये दिले जातात.

आता केंद्रीय करारांचे मूल्य बदलेल असे मला वाटते. २०१७ नंतर (भारत अंतिम फेरीत पोहोचला तेव्हा) बरेच बदल झाले. त्याआधी, आमचा केंद्रीय करार १५ लाख रुपयांचा होता, असे भारतीय कर्णधार हरमनप्रीतने वृत्तसंस्थेच्या मुख्यालयाला भेट देताना सांगितले. तिथे तिने एका विशेष मुलाखतीत तिच्या प्रवासाबद्दल आणि भारतीय महिला क्रिकेटच्या वाढीबद्दल सांगितले.



हरमनप्रीत कौर

पुरुषांच्या क्रिकेटमधून बहुतेक उत्पन्न मिळते, हे हरमनप्रीतने मान्य केले परंतु या महिन्याच्या सुरुवातीला महिलांच्या एकदिवसीय विश्वचषक विजयानंतर, तिने सांगितले की बदल आधीच सुरू आहे.

२ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईत झालेल्या अंतिम सामन्यानंतर महिला क्रिकेटपटूंचे बाजार मूल्य आधीच वाढले आहे. जर आपण ती ट्रॉफी जिंकली नसती, तर आपण अजूनही तिथेच अडकलो असतो. जर आपल्याला बदल घडवायचा असेल, तर आपल्याला देशासाठी तितक्याच ट्रॉफी जिंकण्याची वेळ आली पाहिजे. मग लोक आपोआप आपल्याला पुरुषांइतकेच मूल्य देऊ लागतील, असे भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर म्हणाली. २०२६ च्या इंग्लंडमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकात हरमनप्रीत संघाचे नेतृत्व करेल अशी अपेक्षा आहे, पण पुढील एकदिवसीय विश्वचषक चार वर्षांनी होईल तेव्हा ३६ वर्षीय खेळाडू तिथे असेल का? हे बघणेउत्सुकतेचे ठरणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

## इव्हेरेव्हला नमवून फेलिक्स ऑगर एटीपी फायनल्सच्या उपांत्य फेरीत

◆ **ट्यूरिन (इटली), १५ नोव्हेंबर**

फेलिक्स ऑगर-अलियासिमने दोन वेळा विजेता अॅलेक्झांडर इव्हेरेव्हला हरवून एटीपी फायनल्सच्या उपांत्य फेरीत शेवटचे स्थान पटकावले.

आठव्या मानांकित ऑगर-अलियासिमने ६-४, ७-६ (४) असा विजय मिळवत ब्योर्न बोर्ग गटातून जॅनिक सिनरसोबत आघाडी घेतली. तत्पूर्वी, सिनरने आधीच बाहेर पडलेल्या बेन शेल्टनला ६-३, ७-६ (३) असे हरवून राऊंड-रॉबिन सामन्यांमध्ये एकहाती विजय मिळवला. सिनरचा पुढचा सामना सातव्या मानांकित अॅलेक्स डी मिनौरशी होईल. अंतिम सामना रविवारी होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# संगमेश्वर कॉलेजच्या मुले व मुलींना उपविजेतेपद

**शालेय क्रिकेट स्पर्धेतील कामगिरी**

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

शालेय शहर क्रिकेट स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजने १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात उपविजेतेपद संपादिले.

संघास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.



**संघ : मुले :** कर्णधार रत्नपारखे शुभम नागनाथ, अर्श शकील पटेल, प्रविण हणमंत आयवळे, प्रथम प्रभाकर मिस्कीन, यज्ञेश रमेश जोशी, निहाल नौशाद शेख, भाग्योदय संतोष कोटे, दिग्विजय मारुती गवळी, रोहित राजकुमार उपासे, ओम पांडुरंग पवार, श्रावण राहुल म्हेत्रे, शिवचरण सत्यनारायण कट्टा, सुगुर महमदसाबीर उस्मान, थोरात सुरज राजकुमार, घुगे अतुल शैलेंद्र, झंपले अथर्व भारत.

**मुली :** कर्णधार पाटील गौरी प्रशांत, केतकी नागेश चौगुले, अनन्या संतोष दुबे, गायत्री रमेश काकडे, देशमुख पालक संजय, अनुष्का प्रताप सगर, शेख अरफा अन्वरूल हक, संजना धोंडप्पा बिराजदार, स्नेहा अनिल व्हनमने, सुरवसे तृप्ती मारुती, राधिका नागनाथ माळी, भाग्यश्री राजकुमार माळी, वैभवी सचिन पवार, आद्रशिवे स्नेहा कल्याणी, ऐमन सैपन बिराजदार, बनसोडे समृद्धी गणेश.

## न्यू इरा पब्लिक स्कूल चिखलठाणच्या दोघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**जेऊर दि.१५ नोव्हेंबर-**

न्यू इरा पब्लिक स्कूल चिखलठाणच्या दोघांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. शालेय जिल्हा कुस्ती स्पर्धेत अनुष्का महेंद्र शिंदे हिने १७ वर्षे वयोगटात ४६ किलो वजनीगटातून प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच श्रद्धा उमेश बोराडे हिने जिल्हा धनुर्विद्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. दोघांची या कामगिरीवर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.



# उमाबाई श्राविका विद्यालयास दुहेरी मुकुट

**शालेय टेनिक्काईट स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर झालेल्या शालेय टेनिक्काईट (रिंग टेनिस) स्पर्धेत उमाबाई श्राविका विद्यालयाने १७ व १९ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. १९ वर्षांखालील मुलींना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. १४ व १७ मुलींनी तृतीय स्थान मिळविले.

त्यांचे श्राविका संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त देवई शहा, विश्वस्त करण शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, वरिष्ठ दिप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले. त्यांना क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

**यशस्वी संघ : १७ वर्षांखालील** : संभाजी शिंदे, तपन दास ,आदित्य मुळकुटकर, यश बळ्ळे, राजवर्धन घोडके, कृष्णा दराडे.

**१९ वर्षांखालील : मुले :** हर्ष गायकवाड, विराट कसबे, सुदर्शन खर्डे कर, आदित्य होनपारखे, शुभम पोळ, हर्षवर्धन घोडके. **मुली :** समृद्धी जगताप, अनुष्का टोणपे, कार्तिकी चुंगे, श्रेया इंगळे, आदिती गजरे, विशाखा गुमटे.



**१४ वर्षे मुली :** उन्नती काटकर, श्रद्धा कांबळे, भाग्यश्री पाटील, धनश्री मुद्दे, आर्या कोष्टी, पियुषा हंचे.

**१७ वषे मुली :** अनुष्का केत कृष्णाली पेंडकर दिव्या कसबे, प्रिया शिंदे, धनश्री होनपारखे, अंकिता फडतरे

# राज्य शालेय मैदानी स्पर्धेत विराट अकॅडमीला सहा पदके

**पूजा राठोड व स्वरा जाधवची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

राज्य शालेय मैदानी स्पर्धेत नेहरूनगर शासकीय मैदानावरील विराट करिअर अकॅडमीच्या खेळाडूंनी सहा पदकांची कमाई केली.

रत्नागिरी येथे झालेल्या या स्पर्धेत पूजा राठोड व स्वरा जाधव यांची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धेत पूजाने १००. व २००मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. स्वरा जाधवने तिहेरी उडीमध्ये द्वितीय स्थान मिळविले. भक्ती थोरातने लांब उडी व १०० मीटर अडथळा शर्यतील तृतीय स्थान संपादिले. अथर्व पाटोळेने ४ बाय १०० मीटर रिलेमध्ये तृतीय स्थान मिळविले. या सर्व खेळाडूंना भारती सूर्याजी लिंगडे यांचे मार्गदर्शन लाभले.







सोलापूर : मार्कंडेय तलावावर शनिवारी झालेल्या राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेतील पदकविजेते खेळाडू. दुसऱ्या छायाचित्रात उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

# सोलापूरच्या डायव्हरचे वर्चस्व; श्रावणी सुर्यवंशी, अपुर्वा अंधारेला दुहेरी मुकुट

**राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धा : एसव्हीसीएसच्या मनस्वी मानेला सुवर्ण**

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेत सोलापूरच्या डायव्हर्सनी वर्चस्व प्राप्त केले. १९ वर्षांखालील गटात देगाव आश्रमशाळेच्या श्रावणी सुर्यवंशीने तर १७ वर्षांखालील गटात इंडियन मॉडेल स्टेट बोर्डाच्या अपुर्वा अंधारने हायबोर्ड व तीन मीटर स्प्रींग बोर्डमध्ये प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. हायबोर्डमध्येच १४ वर्षांखालील गटात एसव्हीसीएस हायस्कूलच्या मनस्वी माने हिने प्रथम क्रमांक पटकाविला.


अशोक चौकातील मार्कंडेय जलतरण तलावावर या स्पर्धांचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचे हस्ते झाले. जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्ता वरकड, तांत्रिक समिती सदस्य राजेंद्र अतनूर, श्रीकांत शेटे, मनीष भावसार, सोलापूर जिल्हा शिक्षण संस्था संघटनेचे दशरथ गुरव, स्पर्धा प्रमुख भारत श्रीराम हे उपस्थित होते. स्पर्धा पार पडण्यासाठी पंच म्हणून श्रीकांत दोरनाल, श्रीशैल जेवरे, विजयकुमार गुल्लापल्ली, खंडेराव शिंदे, सचिन गाडेकर, विठ्ठल कुंभार हे काम पाहत आहेत.

**अंतिम निकाल (कंसात विभागाचे नाव) : ३ मीटर स्प्रिंग बोर्ड : १९ वर्षांखालील : मुले:** स्वराज लाड(मुंबई), विपुल कुडक्याल (पुणे, संगमेश्वर कॉलेज सोलापूर), रितेश लिगाडे (पुणे, एस.आर. चंडक बाळे). **मुली :** श्रावणी सुर्यवंशी (पुणे, आश्रमशाळा देगाव), हर्षदा गोली (पुणे, वालचंद कॉलेज सोलापूर), नेहा पास्ते(मुंबई).

**१७ वर्षांखालील : मुले :** संकेत लिगाडे (पुणे, ज.रा. चंडक, बाळे), रणवीर खाडे (पुणे, बी.एफ. दमाणी सोलापूर), श्रेयश सपकाळ (मुंबई). **मुली :** अपुर्वा अंधारे (पुणे, इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्ड, सोलापूर), जानवी परसवाणी (मुंबई), श्रेया गुरव (पुणे, एस.आर.चंडक सोलापूर).

**हायबोर्ड : १९ वर्षांखालील : मुले :** स्वराज लाड, रितेश लिगाडे, युवराज अंजीखाने (दोघे पुणे). **मुली :** श्रावणी सुर्यवंशी, हर्षदा गोली,नेहा पास्ते.

**१७ वर्षांखालील : मुले :** श्रेयश सपकाळ, रणवीर खाडे, संकेत लिगाडे. **मुली :** अपुर्वा अंधारे, श्रेया गुरव, जानवी परसवाणी.



विपुल कुडक्याल याचा डायव्हिंग करतानाचा टिपलेला क्षण : (छायाचित्र : केवल तिवारी)

**१४ वर्षांखालील : मुले :** मीत वलंत्रा, (मुंबई), आयुश केजरीवाल, सिद्धय्या राजकडे (पुणे, महेश स्कूल, सोलापूर). **मुली :** मनस्वी माने (पुणे, एसव्हीसीएस सोलापूर ), गीतिका सालियन(मुंबई), कणक शंकु (पुणे).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# तब्बल आठ वर्षांनंतर राऊत-वाणी यांच्यात झाले मनोमिलन

## बार्शी नगरपरिषदेच्या राजकीय समीकरणात होणार बदल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, १५ नोव्हेंबर -**

बार्शी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज शहराच्या राजकारणात मोठा राजकीय भूकंप घडला आहे. अनेक दिवस गुप्तपणे सुरु असलेल्या बैठका, पडद्यामागील चर्चा आणि विविध गटांची रणनीती अखेर उघड झाले आहे. बार्शीतील प्रभावशाली आणि निर्णायक मतदार असलेल्या वाणी कुटुंबाने विनोदनाना वाणी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.



यानिमित्ताने माजी आमदार राजेंद्र राऊत आणि वाणी परिवार यांच्यात तब्बल आठ वर्षांनंतर मनोमिलन झाल्याचे पहावयास मिळाले. माजी आमदार राजेंद्र राऊत व वाणी परिवार यांच्यात मोठा दुरावा निर्माण झाला होता. मात्र, या प्रवेश सोहळ्याप्रसंगी माजी आमदार राजेंद्र राऊत आणि विनोदनाना वाणी हे दोघे एकाच व्यासपीठावर आले होते.

या प्रवेशामुळे भाजपात नवा जोश निर्माण झाला आहे. वाणी कुटुंबाची तीन प्रभागांवरील पकड, त्यांचा समाजातील प्रभाव आणि युवा वर्गातील वाढती लोकप्रियता लक्षात घेता, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार तेजस्विनी प्रशांत कथले यांच्या प्रचाराला मोठा लाभ होणार असल्याचे सांगण्यात येते. विनोदनाना वाणी हे शिवसेना उबाठा गटाचे तालुका प्रमुख म्हणून काम पाहत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली वाणी कुटुंबातील विशाल वाणी, बंडू वाणी, पांडुरंग वाणी, त्र्यंबक बापू वाणी, श्रीकांत वाणी आणि अनिलअण्णा वाणी भाजपात दाखल झाले.

वाणी कुटुंबातील भैया वाणी यांची युवकांमधील पकड, संघटनशक्ती आणि मोठ्या प्रमाणातील युवा संपर्क हे महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे युवा वर्ग भाजपाच्या पाठीशी येईल, असा राजकीय अंदाज व्यक्त केला जात आहे.

> **गुप्त बैठकींच्या चर्चेने हादरली होती बार्शी**
> गेल्या काही आठवड्यांपासून माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या गुप्त बैठकींच्या चर्चेने संपूर्ण बार्शी हादरली होती. त्या बैठकींचे पहिले मोठे फलित आजच्या या पक्षप्रवेशाच्या रुपाने समोर आले आहे. अजून कोणाचा भाजपा प्रवेश होणार? याकडे बार्शीवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे.

## सांगोला नगरपरिषद निवडणूक

# शनिवारी अध्यक्षपदासाठी ५ तर सदस्यपदासाठी २५ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. १५ नोव्हेंबर -**

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत शनिवार, दि.१५ नोव्हेंबर अखेर अध्यक्षपदासाठी ५ नामनिर्देशन पत्र तर सदस्यपदासाठी ९ प्रभागातून २५ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली.

सदस्यपदासाठी प्रभाग क्र.२ अ-(अनू.जाती) १ अर्ज, प्रभाग क्र.३ ब-(सर्वसाधारण) ४ अर्ज, प्रभाग क्र.४ अ-(सर्वसाधारण महिला) २ अर्ज, प्रभाग क्र.५ अ-(ना.मा.प्र.) ५ अर्ज, ५ ब-(सर्वसाधारण महिला) २ अर्ज, प्रभाग क्र.६ अ-(ना.मा.प्र.महिला) २ अर्ज, ६ ब-(सर्वसाधारण) २ अर्ज, प्रभाग क्र.७ अ -(ना.मा.प्र.) १ अर्ज, प्रभाग क्र.८ अ-(अनू. जाती महिला) १ अर्ज, प्रभाग क्र.१० अ-(सर्वसाधारण महिला) १ अर्ज, १० ब-(सर्वसाधारण) २ अर्ज, प्रभाग क्र.११ अ-(ना.मा.प्र.महिला) १ अर्ज, ११ क-(सर्वसाधारण) १ अर्ज असे एकूण २५ अर्ज दाखल करण्यात आले. यामध्ये १५ पुरुष व १० महिला उमेदवारांचा समावेश आहे, असे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी सांगितले.

# बार्शी नगरपालिका निवडणूक; नगराध्यक्ष पदासाठी एकही अर्ज नाही

- सहाव्या दिवशी अठरा अर्ज दाखल
- दाखल झालेले बहुतांश अर्ज भाजपाचे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सहाव्या दिवशी नगरसेवक पदासाठी १८ उमेदवारी अर्ज दाखल झाले. यापूर्वी दाखल झालेल्या तीन अर्जासह एकूण २१ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

नगराध्यक्ष पदासाठी अद्याप एकही अर्ज दाखल झाला नसल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तैमुर मुलाणी यांनी दिली. नगरपालिका निवडणुकीसाठी १० डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्या चार दिवसात एकही अर्ज दाखल झाला नव्हता. मात्र शुक्रवारी तीन उमेदवारांनी तर शनिवारी १८ जणांनी ऑफलाइन पद्धतीने प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले. दाखल झालेले सर्व अर्ज हे भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांचे आहेत. आज रविवार (दि.१६ नोव्हेंबर) सुट्टीचा दिवस असला तरी निवडणूक आयोगाने अर्ज दाखल करण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यामुळे नगरसेवक पदासाठी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होतील अशी शक्यता वर्तविली जात आहे. सोमवार, १७ नोव्हेंबर रोजी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असून यादिवशी बहुतांश उमेदवार आपला अर्ज दाखल करतील. शनिवारी प्रामुख्याने भाजपकडील संभाव्य उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. अर्ज दाखल केल्यानंतर नगरपालिकेच्या आवारात सामूहिकरित्या विजय राऊत यांच्या उपस्थितीत फोटो काढत असल्याचे चित्र दिसून आले. आज दिवसभरात भाजपकडून विद्यमान नगरसेवक संदेश काकडे, रोहित लाखाळ, महेश जगताप, दीपक राऊत, विजय चव्हाण, मदनलाल गव्हाणे यांच्यासह रोहित पाटील, संतोष पाटील, कांता मोहिते, नम्रता हगरे, राजेंद्र मांगडे, चंद्रकला कांबळे, पंकज ठाकरे, दिलशाद शेख, सुशीला डिसले, शमा रिकीबे, सादिक मुल्ला, फरजना जलसे तर सुरज मुल्ला आणि ओमकार गायकवाड यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे.

> ऑनलाइन अर्ज दाखल केले तरी ऑफलाईन अर्ज दाखल करणे गरजेचे आहे. जोपर्यंत ऑनलाइन अर्ज दाखल होत नाही तोपर्यंत तो गृहीत धरला जात नसल्याचे तैमुर मुलाणी यांनी सांगितले.




# न.पा.निवडणूक : अक्कलकोट ३४ तर दुधनीमध्ये ४ अर्ज दाखल

**अक्कलकोट, दि. १५ नोव्हेंबर**

अक्कलकोट नगरपालिकेच्या नगरसेवक पदासाठी सहाव्या दिवशी ३४ तर दुधनी नगरपालिकेच्या नगरसेवक पदासाठी ४ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अक्कलकोटच्या नगराध्यक्षपदासाठी कटारे सुनील अप्पाराव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

दुधनी नगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेनेकडून प्रभावती सातलिंगप्पा हौदे-८ ब, बसवराज रायप्पा हौदे-१० ब, ढगे पल्लवी गुरुशांत-८ अ, भांडारी रेखा तिमान्ना-३ ब या प्रभागासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अक्कलकोट नगरपालिकेच्या नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केलेले उमेदवार याप्रमाणे; ताराबाई रुद्रेश कुंभार-१२ ब, लवटे निलेश मालेश-६, आकाश अशोक शिंदे-८ ब, रामेश्वर रेवाप्पा पाटील-१० ब, वैशाली रामेश्वर पाटील-१० अ, गगनगौडा श्रीशैल आनंदप्पा-२ ब, पाटील हर्षदा गणेश-१० अ, आळगी सिद्धाराम कल्लाप्पा-६ ब, कापसे रमेश पंचप्पा-५ ब, शेख जहिराबी शकूर ३-ब, शेख शबाना बरकत-३ ब, सोमवंशी अक्षय अनिल-१० ब, भकरे राहुल सुभाष-१० ब, शिंदे सोनाली विक्रम-१० अ, अलविकर विजयालक्ष्मी कल्लप्पा-२ अ, इंगळे महेश कल्याणराव-११ ब, अल्लोळी सुश्मिता श्रीशैल-५ अ, पिरजादे सय्यद महोद्दीनपाशा-५ ब, राठोड शैलेश चंद्रसेन-५ ब, राठोड रेणुका शैलेश-५ अ, राठोड नवनीत चंद्रसेन-५ ब, सिद्धलिंग हणमंत लाळशेरी-१० ब, मानसी मंगेश जाधव-२, चौगुले स्वामिनाथ शिवाजी-२ ब, मडिखांबे संदीप नागनाथ-११ब, जमगे लक्ष्मण कल्याणी-१० ब, शिंदे गिताबाई सुरेश-७ ब, मंगरूळे रविकांत सिद्धाराम-१० ब, डांगे नविद रफिक-७ अ, गायकवाड पूनम इंद्रजीत-९ अ, सरिता अनिल कुर्ले-११अ, कोरबू मबारक रज्जाक-११ ब, सद्दामहुसेन नूरअहमद शेरीकर-९ ब, राठोड ऋतुराज टोपू-१२.

# पंढरपूर नगरपरिषदेसाठी शनिवारी २० अर्ज

- एकूण दाखल अर्जांची संख्या ३६
- नगराध्यक्षपदासाठी एकही अर्ज नाही

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ नोव्हेंबर-**

पंढरपूर नगरपरिषदेसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या सहाव्या दिवशी अर्थात शनिवार, दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी २० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. आजअखेर दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची संख्या ३६ इतकी झाली आहे. मात्र नगराध्यक्षपदासाठी अद्यापपर्यंत एकही नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले नाही. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ ही अंतिम तारीख आहे, अशी माहिती पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

शनिवारी दाखल झालेले प्रभागनिहाय उमेदवारांची नावे याप्रमाणे; प्रभाग १४-शरद मोहन बंदपट्टे, प्रभाग ६-निलेश बजरंग जाधव, अमृत अर्जुन माळवदे, प्रभाग १७-लोकेश नागनाथ यादव, प्रभावती दिगंबर मुडके, उमेश भगवान सर्वगोड, प्रभाग १२-शांताबाई माणिक काळे, प्रभाग १-संतोष गोरख धोत्रे, स्वाती दत्तात्रय काळे, दत्तात्रय तुकाराम काळे, प्रभाग ५-सुमित संभाजी शिंदे, प्रभाग १६-मोनिका निलेश शिंदे, प्रमिला अरुण कबाडे, प्रभाग १३-रंजना दिलीप हजारे, प्रभाग १०-साधना सुधीर धोत्रे, संजय जवाहरलाल बंदपट्टे, प्रभाग २-शुभम संतोष महाजन, प्रणिता किरण घाडगे, मयुर भारत भिंगे.

या अगोदर दाखल झालेले अर्ज-पहिल्या दिवशी आदित्य चंद्रकलेश्वर फत्तेपूरकर यांचा अर्ज दाखल करण्यात आला. दुसऱ्या दिवशी नगरसेवक व नगराध्यक्ष पदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही. तिसऱ्या दिवशी रुक्मिणी धनाजी धोत्रे यांचा अर्ज दाखल झाला आहे. चौथ्या दिवशी अमित अशोक डोंबे, अदिती अमित डोंबे, गौतम काशिनाथ गाजरे, प्रशांत शिवाजी मलपे यांनी अर्ज दाखल केला. शुक्रवारी आरती बळीराम बनसोडे, नितीन पद्मकुमार गांधी, प्रमिला अरुण कबाडे, वैभव शहाजी भोसले, शाम प्रभु गोगाव, अर्जुन संतोष धोत्रे, सुरेखा भारत धोत्रे, प्रिती विशाल कदम, संदीप अशोक शिंदे असे अर्ज दाखल झालेले आहेत.

# मंगळवेढा नगरसेवक पदासाठी शनिवारी २४ उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा, दि.१५ नोव्हेंबर-**

मंगळवेढा नगरपरिषद पंचवार्षिक निवडणूक उमेदवारी अर्ज भरण्याच्या सहाव्या दिवशी नगरसेवक पदासाठी २४ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. सर्वाधिक प्रभाग क्र.९ मध्ये ७ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. सोमवार दि.१७ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने त्या दिवशी उमेदवारी अर्ज भरण्याचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.



**मंगळवेढा : नगरपालिका निवडणूक नगरसेवक पदासाठी निवडणूक निर्णय अधिकारी मदन जाधवांकडे उमेदवारी अर्ज दाखल करताना.**

**निवडणूक उमेदवारी आलेले अर्ज याप्रमाणे - प्रभाग :** क्र.१ सय्यद अंजूम इरफान(अपक्ष). क्र. ३ रेखा खंदारे (अपक्ष), निकिता खंदारे (अपक्ष), क्र.५ हणमंतराव कोष्टी (भाजपा), अनिल बोदाडे (अपक्ष), निलेश सुर्यवंशी (अपक्ष), निलेश सुर्यवंशी (भाजपा), सोनम मुढे (अपक्ष), क्र.६ संजय नलवडे (भाजपा), सुहास मुदगूल (अपक्ष), क्र.७ अश्विनी धोत्रे (अपक्ष), क्र.८ सोमनाथ हुशारे (भाजपा), राजामती कोंडुभैरी (अपक्ष), शरयू हजारे (अपक्ष), क्र.९ अनिता भोसले (अपक्ष), नंदा नाईकवाडी (शिवसेना उबाठा), शोभा हजारे (अपक्ष), रुबीनाबी इनामदार (अपक्ष), सुदर्शन यादव (भाजपा), प्रशांत यादव (नॅशनल कॉंग्रेस पार्टी (शरद पवार), मझम्मील काझी (अपक्ष), क्र.१० विक्रम शेंबडे (अपक्ष)

# मोहोळ : सहाव्या दिवसअखेर ३९ जणांचे अर्ज

**तभा वृतसेवा,**
**मोहोळ, दि. १५ नोव्हेंबर-**

नगरपालिका निवडणुकीच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्यानंतर ६व्या दिवसाअखेर ३९ जणांनी अर्ज दाखल केले आहेत. शनिवार अखेर नगराध्यक्ष पदासाठी वर्षा गौतम क्षीरसागर (भाजप) आणि गायत्री रविकांत अष्टूळ (शिवसेना शिंदे) यांनी अर्ज दाखल केले. शनिवार अखेर अर्ज दाखल करणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये भाजपचे तालुका अध्यक्ष सतीश काळे आणि शिवसेना उबाठाचे शहर प्रमुख विकी देशमुख यांचा समावेश आहे.




**दाखल अर्ज याप्रमाणे :** प्रभाग : क्र.१ उत्तर मंडलाध्यक्ष सतीशकाळे (भाजपा), क्रं. २: रणजीत रामकिसन देशमुख (उबाठा), अजय अनिल कुर्डे (शिवसेना). क्र. ३ : नूरजहा नसरुद्दीन मोमीन (अपक्ष), क्रं ८ : प्रमोद मोहन डोके (भाजपा). क्रं. ७ : विक्रम पंडितराव देशमुख (शिवसेना उबाठा)

क्र. १० : सीना दिनकर गडदे (शिवसेना), कुरेशी अझरुद्दीन अनिस आणि भारती भारत बरे ( दोघे भाजपा), कुरेशी अझरुद्दीन अनिस आणि बरे भारती भारत. चैतन्य पद्माकर देशमुख (शिवसेना शिंदे).



# हॉटेल कामगाराला नग्न करून लोखंडी पाईपने मारहाण

## मालकाविरुध्द गुन्हा


**टेंभुर्णी, दि.१५ नोव्हेंबर-**

एका हॉटेल कामगारास नग्न करुन लोखंडी पाईपने मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना टेंभुर्णी येथील हॉटेल ७७७७ मध्ये घडली. याप्रकरणी हॉटेल मालक लखन हरिदास माने यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

ऑगस्ट महिन्यातील एका रात्री ११ वाजण्याच्या सुमारास हॉटेल ७७७७ च्या मालकाने आप्पासाहेब नकाते (वय-४४) या कामगाराच्या अंगावरील कपडे जबरदस्तीने काढले व त्याच्याकडे असलेली २ हजार रुपये घेतली. आणि त्यास नग्नावस्थेत हॉटेलच्या बाहेर असलेल्या इतर कामगारांसमोर उभा करुन शिवीगाळ करत अपमानित केले. तसेच लोखंडी पाईपने पाठीवर जबर मारहाण केली. 'तू तक्रार दिलीस किंवा काम सोडलेस तर तुला जिवे ठार मारीन', अशा धमकी दिली. या घटनेदरम्यान आरोपीने त्या कामगाराचा नग्नावस्थेतील व्हिडिओ शूट करुन तो सोशल मीडियावर व्हायरल केला.

सदर प्रकरण उघडकीस येताच १५ नोव्हेंबर २०२५ रोजी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी हॉटेल ७७७७ चा मालक लखन माने यास तातडीने अटक करण्याचे आदेश दिले. टेंभुर्णी बीटचे तांबोळी यांनी गुन्हा दाखल केला. पुढील तपास सपोनि चौधरी यांच्या देखरेखीत सुरु आहे.

# आप्पाशा गायकवाड यांचे निधन



**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

मजरेवाडी भागातील गजानन नगर मधील रहिवाशी आप्पाशा सदाशिव गायकवाड (मिस्त्री) यांचे शनिवारी पहाटे ४:३० वाजता दु:खद निधन झाले. ते ७६ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार विजय गायकवाड यांचे ते वडील होत.

# ट्रम्प टेरीफमुळे भारतीय अर्थव्यवस्था धोक्यात नाही

## डॉ. शैलेश देवळणकर; पंढरपूर अर्बन बँक व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ नोव्हेंबर-**

भारताचा विकास हा न टाळता येण्याजोगा विषय आहे येत्या काही दिवसांत भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था आर्थिक महासत्ता असलेला देश असेल, ट्रम्प टेरीफमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला धोका नाही. आपल्या देशाचे भवितव्य अतिशय उज्वल आहे असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक डॉ. शैलेंद्र देवळणकर यांनी केले.

ते पंढरपूर अर्बन बँक आयोजित देशभक्त बाबुराव जोशी बौद्धिक व्याख्यानमालेत पहिले पुष्प ट्रम्प टेरिफ आणि भारत, या विषयावर बोलत असताना केले, यावेळी व्यासपीठावर माजी आमदार प्रशांत परिचारक, बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, उपाध्यक्षा सौ माधुरी जोशी, हरीश ताठे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ शैलेंद्र देवळणकर म्हणाले, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १०वर्षात ८२देशांना भेटी दिल्या म्हणून टीका केली जाते. पण देशाचे आर्थिक हितसंबंध, व्यापार वाढवायचा असेल तर यापेक्षा जास्त देशांना भेटी दिल्या पाहिजेत, जागतिक पातळीवर प्रभाव वाढविण्यासाठी विदेश दौरे आवश्यक आहेत. जगाच्या आर्थिक बाजारपेठेत भारतीय नागरिकांचे महत्वाचे योगदान आहे, अमेरिकेत ५२लाख भारतीय राहतात, एकूण विद्यार्थ्यांपैकी एक तृतीयांश विद्यार्थी हे भारतीय असून भारतामुळे मोठ्या प्रमाणात कररूपी उत्पन्न अमेरिकेस मिळत आहे.




संपूर्ण जग हे आता एक कुटुंब बनले असून प्रत्येक घटकावर जागतिक राजकारणाचा परिणाम जाणवणार आहे, रशिया युक्रेन युद्धाच्या झळा भारतासह ईतर देशांना सोसाव्या लागत आहेत. दहशतवादी हल्ले हे आता केवळ जम्मू काश्मीर आणि दिल्लीपर्यंतच मर्यादित राहिलेले नसून ते आपल्या पर्यंत येणार आहेत. रशियाकडून भारताने पस्तीस अब्ज डॉलर चे कच्चे तेल घेतल्याने आज पेट्रोल च्या किंमती स्थिर आहेत, अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशिया कडून तेल घेतल्याने डोनाल्ड ट्रम्प चिडला असून इगो दुखावला आहे यामुळे टेरिफ वाढविले असून याचा फटका सोलापूर कापड उद्योगाला बसला आहे. अमेरिकेचे सफरचंद किंवा बदाम जेनेटिकली मॉडी फाईड असल्याने त्यातील पोषणमूल्ये कमी आहेत, त्यामुळे ती स्वस्त आहेत. याउलट भारतातील फळे, भाजीपाला आहेत. कृषी, दुग्धोत्पादन आणि मत्स्योद्योग यावरील आयात कर शून्य करा अशी ट्रम्प यांनी मागणी केली होती मात्र भारताने त्या स्पष्ट नकार दिल्याने डोनाल्ड ट्रम्प यांचा हर्ट झाला असून त्यामुळे त्यांनी भारताविरोधात कुरघोडी करण्यास सुरुवात केली आहे. भारत अमेरिकेत रत्न, दागिने, चामड्याच्या वस्तू, ऑटोपार्ट, गारमेंट्स, बासमती तांदूळ, मासे, दूध निर्यात करतो. ट्रम्प टेरीफमुळे केवळ ३२ अब्ज डॉलर निर्यात थंडावली आहे. मात्र आपण भारतीय बचत करत असल्याने आपल्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत आहे ही मोठी जमेची बाजू आहे. मध्यमवर्गीय भारतीय ग्राहक हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहे या देशाला हलवणे इतके सोपे नाही दबाव टाकणं हा ट्रम्प यांचा स्वभाव आहे.भारताला ते टारगेट करण्यासाठी पाकिस्तानला जवळ करीत आहेत. मात्र ट्रम्प यांच्या दबावाला आपण बळी पडता कामा नये.

भारताचा जीडीपी ७टक्के असून जगात भारतीय तरुणांची मागणी वाढते भारताविषयी सकारात्मक असणे गरजेचे आहे. यावेळी पंढरपूर अर्बन बँकेच्या ११३वर्षांच्या यशस्वी वाटचालीसाठी हळदणकर यांनी आश्चर्य व्यक्त करून कौतुक केले. सुरुवातीला माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पुष्पहार घालून स्वागत केले. माधुरी जोशी यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन एस.पी. कुलकर्णी यांनी केले तर आभार हरीश ताठे यांनी मानले.

> **अमेरिकेला भारताची दुप्पट गरज**
> प्रत्येकाने आपले युद्ध आपणच लढावे लागणार असून कोणतीही जागतिक संघटना मदतीस येणार नाही. अधिक टेरीफ लावले तरी भारत झुकत नाही हा ट्रम्प यांचा पराभव असून भारतीय अर्थव्यवस्था अजिबात धोक्यात आलेली नाही.

# चिमूट आणि मूठ

काल आपण सगळे आपल्या साठे बाईंच्या स्मृतिप्रीत्यर्थ अनौपचारीक रित्या जमलो होतो. आमच्या सगळ्यांच्या आग्रहास्तव तू ऐनवेळी ठरून आपल्या साठे बाईंच्या अतिशय लाडक्या कवितेवर बोललास थोडा वेळ समर्पक आणि समायोचित. मला त्या भाषणातले सगळ्यात जास्त काय आवडले असेल तर तू वंदे मातरम्ची दीडशे वर्षे आणि बालकवींची औदुंबर ही कविता यांची घातलेली सांगड बालकवींची ही कविता आपल्या साठे बाईंची अतिशय आवडती आकाराने अतिशय चिमूटभर अशी ही कविता आशयाने अक्षरशः मूठभर अशीही ही कविता तोच प्रकार वंदे मातरम्‌चा. तू सुरुवात केलीस आपल्या साठे बाईंच्या स्मरणाने आणि मग ऐलतटावर पैलतटावर हिरवाळी घेऊन या पहिल्या ओळीची सांगड तू सुजलाम, सुफलाम शी घातलीस आणि मग एक एक ओळ घेत तू पुढे पुढे गेलाससगळ्यात कळस म्हणजे बालकवींच्या या कवितेतील शेवटची ओळ ... पाय टाकूनी जळात बसला असला औदुंबर ... म्हणे ... या कवितेची ही ओळ म्हणजे वंदे मातरम् या आपल्या राष्ट्रगीतात अभिप्रेत असलेली सामर्थ्यवानांची सावध स्थिती.

नक्की सांगतो. काल हे ऐकायलाआपल्या साठे बाई असत्या ना तर खूप खुश झाल्या असता. तसाही तू त्यांचा आवडता ... हे ऐकून त्या तुला नेहमी जो आशीर्वाद देत असत तो त्यांनी तुला काल पुन्हा दिला असता चिमटी चिमटीने सतत विद्या मिळवत राहा ; आणि त्याचे मनन , चिंतन करून इतरांना मुठी मुठीने आनंद देत राहा तूही मग त्यांना अनेकदा आधी विचारायच्या तसे पुन्हा विचारले असतेस देताना मूठ , मूठ आणि घेताना चिमूट आणि मग साठे बाईही म्हणाल्या असत्या. विद्या मिळवावी लागते आणि मिळालेली विद्या आधी टिकवावी आणि मग ती सातत्याने वाढवावी लागते.

ही प्रक्रिया सतत चालणारी आणि म्हणून संथ असते . म्हणून घेताना चिमूट चिमूट पण देताना कंजुषी करू नये म्हणून मूठ मूठ . हे तुझ्याही डोक्यात असणार. नक्की असणार अगदी जरूर असणार. म्हणून कदाचित ... हा संदर्भ न देता तू म्हणालास ... राष्ट्रांकडून घेताना चिमूट चिमूट .. पण वारंवार आणि राष्ट्राला देताना मूठ मूठ. असे मूठभर नागरिक चिमूटभर जरी करत राहिले तरी राष्ट्रपुरुष समर्थ बनतो आणि स्वस्थ बसू शकतो. तुझ्या कालच्या भाषणातले शेवटचे वाक्य होते.

आपल्या राष्ट्रपुरुषाला पाय टाकूनी जळात बसला असला औदुंबर असे बसण्याची संधी कधीतरी आपण आपल्या परीने देणार का ? असे स्वतः स्वतःला विचारणे म्हणजे वंदे मातरम् ची १५० वी जयंती सादर करणे. आणि हे औदुंबर कविता व वंदे मातरम् यांचे नाते आहे. Knowledge based Economy असे स्वतःचे वर्णन करायचे तर शिक्षकांची आठवण करताना हे आठवावे लागेल. साठे बाईंचा चिमूटभर उंचीचा लाडका विद्यार्थी काल मूठभर तत्व.

**- चन्द्रशेखर टिळक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सोलापूर महापालिकेच्या सर्व जागा लढण्यासाठी सर्वार्थाने ताकद उभी करणार

**सोलापूर, दि.१५ नोव्हेंबर**

सोलापूर शहराचा आढावा घेत सहसंपर्क मंत्री बनसोडे यांनी येत्या काळामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसाठी जास्तीत जास्त वेळ देणार असून सोलापुरातील २६ प्रभागांमध्ये १०२ उमेदवार सक्षमपणे लढण्यासाठी सर्वांनी जोमाने प्रयत्न करावेत असे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेस सोलापूर शहर जिल्ह्याचे नूतन सहसंपर्कमंत्री तथा महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पिंपरी चिंचवड येथील जनसंपर्क कार्यालयात सोलापूर शहरातील प्रमुख पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी सोलापूर शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आढावा सादर केला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार साहेब प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेब संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे साहेब आणि स्वतः मी प्रत्येक असे आम्ही सर्वजण प्रत्येक उमेदवाराला सर्वार्थाने ताकद देण्याचे काम करणार आहोत,आपण निर्धास्तपणे ही निवडणूक लढवून ऐतिहासिक विजय मिळवावा असेही ते म्हणाले. सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नूतन सहसंपर्कमंत्री ना.अण्णा बनसोडे यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सर्वांच्या वतीने सोलापूर दौऱ्यावर येण्याचे निमंत्रण दिले.प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव,प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे,ज्येष्ठ नेते तोफिक शेख,प्रदेश चिटणीस आनंद मुस्तारे,प्रदेश ओबीसी सरचिटणीस डॉ.बसवराज बगले, नगरसेवक सिद्धेश्वर आनंदकर, नगरसेवक गणेश पुजारी,ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बैठकीत प्रमुख पदाधिकारी जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, प्रदेश सचिव इरफान शेख,नजीब शेख, शहर उत्तर विधानसभा अध्यक्ष प्रकाश जाधव,सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष अनिल बनसोडे,विद्यार्थी अध्यक्ष अनिकेत व्हसुरे,शहर उपाध्यक्ष उमेश जाधव आदि उपस्थित होते.

**विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची ग्वाही!**

**सोलापूर शहराच्या पदाधिकाऱ्यांची झाली पुण्यात बैठक**

# ‘लोकमंगल’चा आज सर्वधर्मीय सामुहिक विवाह सोहळा

### ५२ जोडपी होणार विवाहबध्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

लोकमंगल फाउंडेशनतर्फे दरवर्षी परंपरेप्रमाणे होणारा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे यंदाही आयोजन करण्यात आले आहे. हा ४६ वा सामूहिक विवाह सोहळा रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०८ वाजता, गोरज मुहूर्तावर विजापूर रोड येथील शिवाजी अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात पार पडणार आहे. यंदाचे विवाह सोहळ्याचे २० वे वर्ष असून, यावेळी ५२ जोडपी विवाहबद्ध होणार आहेत.




दरम्यान, या लग्नसोहळ्यासाठी गेल्या आठवड्यापासूनच लगीनघाई सुरू झाली असून, सर्व परिवार या सोहळ्यासाठी सज्ज झाल्याची माहिती युवा नेते मनिष देशमुख यांनी दिली. याबाबत मनिष देशमुख पुढे म्हणाले की, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व नववधू-वरांच्या कुटुंबांना दिलासा मिळावा हा उद्देश असून, विवाहासाठी आवश्यक सर्व खर्च लोकमंगल फाउंडेशन मार्फत करण्यात येणार आहे. वधू-वरांना आयुष्यभर उपयोगी पडणाऱ्या गृहउपयोगी साहित्याची भेटवस्तू म्हणून देण्यात येणार आहे. भोजन व्यवस्थेपासून ते नववधू-वरांचे कपडे व सर्व सुविधा फाउंडेशनतर्फे पुरवल्या जाणार आहेत. याशिवाय वधू वरांची शहरातील प्रमुख मार्गाने रथामधून मिरवणूकही काढण्यात येणार आहे. शिवाय प्रत्येकाच्या धर्माप्रमाणे विवाह लावून दिले जाणार आहेत. यंदा ४९ जोडप्यांमध्ये ३ बौद्ध जोडपे तसेच ४६ हिंदू जोडपे आहेत. सोहळ्याचे संपूर्ण स्थळ २५० बाय २०० फूट क्षेत्रफळामध्ये तयार करण्यात येणार असून, भोजन व्यवस्था ९० बाय १५० फूट जागेत असेल. संपूर्ण कार्यक्रम स्थळावर आकर्षक सजावट करण्यात आली आहे. या विवाह सोहळ्यात दोन्हीकडील सुमारे २५-३० हजार वऱ्हाडी मंडळींना भोजनाची सोय करण्यात आले आहे. या नवविवाहात जोडप्यांना संसार सुखाचा करण्याबाबत सूचना देणारा समुपदेशनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे.

### जिल्हा पर्यटनाची थीम ठरणार आकर्षण



यंदाच्या विवाह सोहळ्याला विशेष आकर्षण मिळणार आहे. आमदार सुभाष देशमुख यांनी सुरू केलेल्या ‘जिल्हा पर्यटन महोत्सवा’च्या धर्तीवर या विवाह सोहळ्यातही जिल्हा पर्यटन थीम राबविण्यात येत आहे. विवाह सोहळा आयोजित करण्यात येणाऱ्या ग्राउंडवर जिल्ह्यातील विविध गावांची वैशिष्ट्ये आणि पर्यटनस्थळांची माहिती आकर्षक पद्धतीने प्रदर्शित केली जाणार आहे. पर्यटनदृष्ट्या महत्वाची असणारी ठिकाणे, सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा दर्शविणारे पॅनेल्स, माहिती फलक आणि मांडणी याचा समावेश असेल. विशेष म्हणजे, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांची मूर्ती सोहळा स्थळी ठेवण्यात येणार असून भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे हा प्रेरणादायी संदेशही झळकविण्यात येणार आहे.

**- मनिष देशमुख, युवा नेते भाजपा**

# दुचाकीस्वाराच्या मृत्युप्रकरणी सिटी बसचालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

शहरातील अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी परिसरातील विजयनगर रस्त्यावर सिटी बसच्या धडकेने दुचाकी स्वराचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास घडली. याप्रकरणी सिटी बस चालकाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

देविदास लिंगय्या दासरी (वय ४०, रा. चंद्रोदय नगर, जे बी बार जवळ, कुंभारी रोड, सोलापूर) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत लक्ष्मी देविदास दासरी (वय ३७, रा. चंद्रोदय नगर, जे बी बार जवळ, कुंभारी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिटी बस क्र. एमएच १३ बी ९६८० चा चालक कृष्णा विठ्ठल इरकल यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास देविदास दासरी हे त्यांच्या एमएच १३ बीटी ५.२५०२ क्रमांकाच्या दुचाकीवरून एम आयडीसी ते विजयनगर असे जात होते. त्यावेळी विनायक नगर येथील देशी दारू दुकानाच्या पुढे मनपा बस क्रमांक एम एच १३ बी ९६ ८० चा चालक कृष्णा इरकल यांने सिटी बस दुचाकीला ओव्हरटेक करताना दुचाकीला धक्का दिला. त्यामुळे दुचाकी वरील देविदास दासरी हे खाली पडून त्यांच्या डोक्यास मार लागून गंभीर जखमी होऊन बेशुद्ध झाले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टर पूजा लवटे यांनी बासरी यांना मृत घोषित केले.

दासरी यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बंडगर पुढील तपास करीत आहेत.



### जननायक बिरसा मुंडा यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

नवी पेठ येथील महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळात जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ,महेश वालावलकर, सारंगा अंजीखाने, अमोल गायकवाड, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, भालचंद्र साखरे, सचिन साखरे आदी उपस्थित होते.

# नगरपालिका निवडणूक : अर्ज दाखलसाठी उद्या शेवटचा दिवस

### शनिवारपर्यंत अध्यक्षासाठी ४८ तर सदस्यासाठी ८२० अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

राज्यातील २४६ नगर पालिका व ४२ नगरपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून, या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केले जात आहेत. सोलापुरात ११ नगरपालिका आणि १ नगरपरिषदेसाठी ही निवडणूक घेण्यात येत असून, या निवडणुकीसाठी जिल्ह्यातून आजतागायत अध्यक्षपदासाठी ४८ तर सदस्यपदासाठी ८२० अर्ज दाखल झाले आहेत. तर ऑफलाईनद्वारे अध्यक्षासाठी २ तर सदस्य पदासाठी ५४ अर्ज दाखल झाले आहेत. तर ऑफलाईनद्वारे अध्यक्षपदासाठी ६ आणि सदस्यासाठी ११४ अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, सोमवार, दि. १७ नोव्हेंबर ही अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे.

राज्यातच एकीकडे राजकिय पक्षांकडून उमेदवार जाहीर करून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या हालचाली सुरु आहेत तर दुसरीकडे उमेदवारी अर्ज दाखल करून घेणे, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, निवडणूक प्रक्रिया व प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया राबविणे यासाठी प्रशासनाकडून युध्दपातळीवर तयारी केली जात आहे.

आज शनिवार, दि. १५ रोजी जिल्ह्यातून अध्यक्षपदासाठी १५ आणि सदस्यासाठी ३७८ जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तर आज ऑफलाईनद्वारे अध्यक्षपदासाठी ५ आणि ६३ अर्ज सदस्यपदासाठी दाखल झाले आहेत. गेल्या ६ दिवसात अध्यक्षपदासाठी ४८ तर सदस्यपदासाठी ८२० अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता सोमवारचा एकच दिवस बाकी आहे. तर ता. १८ नोव्हेंबर रोजी छाननी, ता. २१ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेता येणार असल्याचे जाहिर करण्यात आले. यानंतर किती उमेदवार निवडणूक रिंगणात राहणार हे येणारा काळच सांगणार आहे.

# अतिवृष्टीमुळे उजनीसह इतर प्रकल्पांतही १०० टक्के पाणीसाठा

### उन्हाळ्यात पाणी जपून वापरण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

येथील उजनी धरणाच्या इतिहासात यंदा प्रथमच धरण मे महिन्यातच जिवंत साठ्यात आले होते; गेल्या वर्षीही हे धरण एकशे दहा टक्के भरल्यानंतर जिवंत साठा संपून वजा २३ टक्केपर्यंत धरणाची पातळी खालावली होती; म्हणजेच पाण्याच्या वापराचा अतिरेक झाला होता. सध्याही या धरणात १०० टक्के पाणीसाठा आहे म्हणजेच ११० टीएमसीच्यावर पाणीसाठा आहे. उजनी धरणक्षेत्रातच नाहीतर अवघ्या जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने आणि महापूर आल्याने जवळपास सर्वच तलावात आजही १०० टक्के पाणीसाठा आहे. तरीही शेतकरी बांधव आणि इतर नागरिकांनी आगामी उन्हाळ्यात पाण्याचा वापर जरा जपूनच करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि उजनीच्या संबंधित यंत्रणेकडून करण्यात येत आहे.

उजनी हे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या धरणांपैकी एक आहे. या धरणाची पाणी क्षमता ही ११७ टीएमसी आहे. यंदा या धरणक्षेत्रात अतिवृष्टी झाल्याने मोठा विसर्ग येत होता; यामुळे लाखो क्युसेसने पाणी नदीपात्रात सोडण्यात आले. यामुळे खालील गावांना पुराचा तडाकाही बसला. सध्या धरणाखालील नदीपात्रात आणि शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरीत, शेततळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा असल्याने अद्यापपावेतो पाणी मागणी होत नाही. शेतकऱ्यांच्या आसपासचे साठवण तलाव, पाझर तलावातही मोठ्या प्रमाणात पाणी आहे; यातूनच शेतकरी आपल्या पिकांची तहान सध्या भागवत आहेत. पिण्याच्या पाण्याचीही नागरिकांची सोय असल्याने धरणातून सोडण्यात येणारे पहिले पाणी आवर्तनही लांबणार आहे. मागील वर्षी देखील चांगला पाऊस झाला होता. त्यामुळं धरण पूर्ण क्षमतेनं भरलं होतं. या धरण क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर बागायती शेती अवलंबून आहे. विशेषत ऊस शेती मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचबरोबर केळी, डाळिंब, द्राक्षांच्या बागांचं क्षेत्र देखील मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळं उजनी धरण भरणे, ही शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारी बाब ठरते. एकंदरीत, उजनी धरण ओव्हरफ्लो झाले की, जिल्ह्यातील शेतकरी बांधव बिनधास्त असतात.



पुणे, सोलापूर आणि नगरकरांसाठी जीवनदायिनी ठरलेल्या उजनी धरणात यंदा अपेक्षेपेक्षा जास्तच पाणीसाठा झाला आहे. यंदा पुणे जिल्ह्याच्या घाटामाथ्यावर आणि उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला होता.

उजनी धरणाची एकूण पाणी साठवण क्षमता १२३ टीएमसी इतकी असून, जेव्हा धरण ११७ टीएमसी इतकं भरलं जातं तेव्हा ते १०० टक्के क्षमतेने भरतं. आजतागायत तरी उजनीत १०० टक्के पाणीसाठा आहे आणि याचा फायदा उन्हाळ्यात तीन जिल्ह्यातील शेतकरीबांधव, नागरिकांना होणार आहे. यामुळे गतवर्षीप्रमाणे पाणी वापराचा अतिरेक न करता यंदा पाणी जपूनच वापरावे, असे आवाहन संबंधित यंत्रणेकडून करण्यात येत आहे.


# मंद्रुपचे तहसीलदार बनले हिंगोलीचे सहजिल्हा निबंधक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

मंद्रूप अप्पर तहसीलचे तहसीलदार सुजित नरहरे यांना पदोन्नती मिळाली असून त्यांची हिंगोली येथे सह जिल्हा निबंधक या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तहसीलदार नरहरे यांनी दीड वर्षापूर्वी मंद्रूप अप्पर तहसीलचा पदभार घेतला होता.



या काळात शेतकरी नुकसानभरपाई, शेतरस्ते, अवैद्य मुरूम व वाळू उपसा या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी दोन वर्षापासून ते पदोन्नतीच्या प्रतीक्षेत होते. अखेर शासनाने उपजिल्हाधिकारी पदाचे पदोन्नती दिली आहे. दीड वर्षाच्या काळात मंद्रूप परीसरातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. तसेच या काळात शाळेच्या विद्यार्थ्यांना विनाविलंब व विनाझंझट दाखले मिळवून देण्यासाठी काम केल्याचे तहसीलदार नरहरे यांनी सांगितले. निवडीनिमित्त तलाठी संघटनेचे अध्यक्ष महेश शेड्याळ, माजी अध्यक्ष रावसाहेब कोकरे, आदींनी अभिनंदन केले.



# स्थानिक निवडणुकांसाठी पुणे विभागातून पाच उपजिल्हाधिकारी आले सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सध्या नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. पुढील आठवड्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणुकीच्या कामाचा अतिरिक्त भार महसूल खात्यावर वाढला आहे. महसूल खात्यात मुळातच अधिकारी व कर्मचारी यांची वाणवा असल्याने प्रशासनावर कामाचा ताण वाढला होता. मात्र पुणे विभागीय कार्यालयाकडून सोलापूरसाठी पाच उपजिल्हाधिकारी यांची खास निवडणुकीसाठी नियुक्ती करण्यात आली असल्याने हे अधिकारी प्रशासनाच्या मदतीला धावून आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिली.

नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी तहसीलदार व प्रांताधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. अशातच काही तहसीलदारांची पदोन्नती झाली आहे. मात्र निवडणूक कामकाज संपल्याशिवाय या तहसीलदारांना कार्यमुक्त न करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व महापालिका निवडणुकीच्यावेळी महसूल खात्याची यंत्रणा निवडणूक कामात व्यस्त असणार आहे. मतदार यादी प्रसिध्द करण्यापासून ते मतदान व मतमोजणीची सर्व प्रक्रिया ही प्रामुख्याने महसूल खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अवलंबित आहे. मात्र जिल्हा प्रशासनात अनेक अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याने पुणे विभागीय आयुक्तांनी सोलापूर महसूल खात्याकडे पाच विशेष उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती निवडणूक कालावधीसाठी केली असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिली. पुढील आठवडयात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे.

यासाठी समन्वय अधिकारी यांच्या नेमणुकाही करणे आवश्यक आहे. विभागीय आयुक्त यांच्याकडून देण्यात आलेल्या उपजिल्हाधिकाऱ्यांमुळे या कामात अधिक नियंत्रण व गती येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाकडून निवडणूक कामासाठी उपजिल्हाधिकारी अनिल कारंडे, किरण काकडे, नितीन गवळी, राधिका बारटक्के, सुनिता आस्वदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार हे अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयात रुजू झाल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी पाटील यांनी दिली.






हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पैशासाठी विवाहितेचा छळ; पतीसह सातजणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सदर बझार पोलिस ठाण्यात सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पायल चंद्रकांत भैरे (वय २४, रा. बापूजी नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती चंद्रकांत, सासरे लक्ष्मण, नंदनी, मिना, गौरी, अंबू, मल्लू (रा. बापूजी नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ जुलै २०२३ ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पायल ही सासरी बापूजी नगर येथे नांदण्यास होती. त्यावेळी पती चंद्रकांत व त्याच्या घरातील लोकांनी मिळून पायल हिस मारहाण व शिवीगाळ करून मानसिक व शारीरीक त्रास देऊन माहेरून नवीन मोटारसायकल घेण्यासाठी १ लाख रूपये घेऊन ये म्हणून मानसिक त्रास दिला. तसेच तुझ्यामुळेच आमचा चंद्रकांत आजारी पडला, तु चांगल्या पायाची नाही असे अपशब्द वापरून शिवीगाळ करून मारहाण करून माहेरी हाकलून दिले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.



### महत्वाचे...

### दुचाकी नावावर करून महिलेची फसवणुक; कामतीच्या एकाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

दुचाकी नावावर करून महिलेची फसवणुक केल्याप्रकरणी कामतीच्या व्यक्तीविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अलका चंद्रकांत राठोड (वय ४८, रा. केदारनाथ रेसीडेन्सी अपार्टमेंट, मुरारजी पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन हसन साहेबलाल शेख (रा. कामती बु, ता. मोहोळ) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये अलका राठोड यांची मुलगी राजश्री पवार हिच्या संमतीवाचून तिच्या परस्पर एमएच १३ डीपी १४१३ क्रमांकाची ॲक्टीव्हा दुचाकी हसन शेख याने ट्रान्सफर करून घेण्यासाठी राजश्री पवार हिच्या कागदपत्रावर बनावट सह्या करून दुचाकी स्वतःच्या नावावर करून घेतली. ही दुचाकी बाळे येथील खडक गल्लीतील जिल्हा परिषद शाळेतून चोरून नेली आहे. म्हणून याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

### घरगुती कारणावरून पतीकडून पत्नीस लाकडाने मारहाण


**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

घरगुती कारणावरून पतीकडून पत्नीस लाकडाने मारहाण करण्यात आली.सपना तुकाराम उबाळे (वय ३५, रा. ढोक बाभूळगाव, ता. मोहोळ) असे जखमी पत्नीचे नाव असून त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मोहोळ येथील होळकर हॉस्पीटलजवळ सपना उबाळे हिस घरगुती भांडणाच्या कारणावरून पती तुकाराम उबाळे याने लाकडाने, हाताने मारहाण केली. यामध्ये सपना हिच्या सर्वांगास मुका मार लागल्याने तिला उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# एका हाताने मार्केट कमिटी द्या, दुसऱ्या हाताने भाजप प्रवेश करा

- माजी आमदार दिलीप माने पेचात?
- राष्ट्रवादीचा ठेवला हुकमी एक्का
- अजित पवारांच्या दौऱ्याची लागली प्रतीक्षा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ नोव्हेंबर-**

सोलापूर शहराच्या राजकारणात बरेच उलथापालथ होताना दिसत आहे. अनेक मातब्बर नेते मंडळी भाजपच्या पक्षात डेरे दाखल झाले. नोव्हेंबर महिन्यातच मोहोळ तालुक्यातील राजकीय भूकंपाने याची सुरुवात झाली. हे लोण हळूहळू शहरात पसरले. माने मालकांच्या पक्षातील एन्ट्रीला दक्षिणेच्या नाराज झालेल्या कार्यकर्त्यांनी ब्रेक लावला. परंतु आता दिलीप माने यांच्या भाजप प्रवेशाला ग्रीन सिग्नल मिळत असल्याची आरोळी ऐकू येत आहे. मात्र त्यासाठीची ''डील'' फायनल करावी लागणार असल्याची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. ती अशी 'एका हाताने मार्केट कमिटी द्या; अन् दुसऱ्या हाताने भाजप एन्ट्री पास' मिळावा. या नव्या फॉर्मुल्यामुळे माने मालक ''वेट अँड वॉच''च्या भूमिकेत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, दुसरीकडे सत्ताधारी भाजप किंवा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्यासाठी त्यांची भूमिका जग जाहीर न करता पडद्या आड असल्याची दिसून येत आहे. तसे संकेत ही राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून मिळत आहेत. मात्र, अजित पवार यांच्या सोलापूर दौऱ्यावेळी यावर शिक्कामोर्तब होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. उद्धवसेना, काँग्रेस पक्ष बदलून कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार कोणत्याही सत्ताधारी पक्षात दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कार्यकर्त्यांची कामे, व्हावीत यासाठीच आपण पक्ष प्रवेश करणार असल्याचे माने यांनी म्हटले होते. त्यामुळे या प्रकरणात वाटाघाटी होणार असल्याचे दबक्या आवाजात ऐकण्यास मिळत आहे.

दरम्यान, कोठे अँड कंपनीने तुतारी सोडून भाजपचे कमळ हाती घेतले. मात्र ओव्हरलोड इन्कमिंगमुळे मूळचे भाजपवासीय नाराज होत आपल्याच पक्ष कार्यालयासमोर एकदा नव्हे दोनदा उघडपणे नाराजी व्यक्त केली. त्यामुळे शिस्तबध्द असणाऱ्या भाजपची घडी विस्कटत आहे. पहिल्यांदा दक्षिणेच्या बाजूने मोर्चा आला, की माने मालकांना पक्षात घ्यायचे नाही. तर दुसरीकडे उत्तरेच्या काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आयात केलेल्या नेत्यांवर आगपाखड केली. दक्षिणच्या वाटाघाटीत बाजार समितीवर माने यांची बोळवण होत असल्याची जोरदार चर्चा मार्केट कमिटीच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. बाजार समितीच्या सभापती पदासाठी अडवणूक होत असेल तर चुकीचे, मालक दरिया दिल, असेच देतील. अशी प्रतिक्रिया काही दिवसांपूर्वी माजी उपमहापौर राजेश काळे यांच्याकडून आली होती. मात्र, यावर दिलीप माने हे चुप्पी साधून आहेत. त्यांनी अद्याप आपली भूमिका जाहीररित्या मांडली नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या राजकीय मोर्चे बांधणीत कार्यकर्त्यांसह नेते मंडळी देखील लक्ष घालू लागल्याने सर्व सामान्य कार्यकर्ता केवळ सतरंजी उचलण्यासाठी आहे का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

**धावत्याच्या मागे पाळण्यापेक्षा आहे त्या ठिकाणी बरे :** गत विधानसभा निवडणुकीत दिलीप माने यांनी बाजार समितीचे सभापती पदावर पाणी सोडून आमदार विजयकुमार देशमुख यांना सभापती विराजमान केले होते. शिवसेनेचे धनुष्यबाण घेऊन निवडणूक लढवली. मात्र, यामध्ये त्यांचा पराभव झाला. यंदाच्या निवडणुकीत देखील त्यांना काँग्रेसने उमेदवारी न दिल्याने आम दारकी सुटली. अशा घडामोडीनंतर दुधाचे चटके बसल्याने ताक ही फुकून पिण्याची वेळ आता माने मालकांवर आल्याने, माने मालक सावध भूमिका घेत ''धावत्याच्या मागे पाळण्यापेक्षा आहे; त्या ठिकाणी बरे'' असे म्हणत सभापतीची खुर्ची धरून आहेत.

# शरद पवार आज सोलापूर दौऱ्यावर

- राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ नोव्हेंबर**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे सर्वेसर्वा खा. शरद पवार हे आज रविवारी सोलापूर येणार आहेत. माजी महापौर यु एन बेरिया यांच्या राजकीय जीवनावर आधारित ग्रंथ प्रकाशन सोहळा तसेच संध्याकाळी नूतन शहराध्यक्ष महेश गादेकर यांच्या मुलाच्या लग्नाला उपस्थित राहणार आहेत. त्यांचा अधिकृत दौरा जाहीर झाला असून रविवारी संपूर्ण दिवस ते सोलापूर शहरात असणार आहेत. दुपारी तीन वाजता ते बारामती येथून विमानाने सोलापूरला येतील. चार ते सहा वाजेपर्यंत यु एन बेरिया यांच्या ग्रंथ अनावरण सोहळ्याच्या कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर संध्याकाळी सहा वाजता नूतन शहराध्यक्ष महेश गादेकर यांच्या मुलाच्या लग्नाला उपस्थित राहून नूतन वधू वरास शुभ आशीर्वाद देतील.



त्यानंतर संध्याकाळी बाय रोड प्रसाद लाड यांच्या मुलाच्या साखरपुड्यासाठी उपस्थित राहतील. दरम्यान, या खाजगी दौऱ्यात राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आगामी सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंबंधी तसेच सुशीलकुमार शिंदे यांच्याशी देखील ते भेट घेणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे पवार यांच्या दौऱ्याकडे शहर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

## अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर :** होटगी ते साखर कारखाना रस्त्यावर अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. नितीन सिद्राम अकाडे (वय ३५, रा. तोडकर वस्ती, बाळे, सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. नितीन आकाडे हे १४ नोव्हेंबर रोजी रात्री पावणे दहाच्या सुमारास मोटारसायकलवरून जात असताना होटगी ते सिध्देश्वर साखर कारखाना रोडवर धडक झाल्याने त्यात जखमी झाल्याने अकाडे यास वळसंग पोलिस ठाण्यातील हवालदार शेख यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. श्रीकृष्ण बागल यांनी अकाडे यास उपचारापूर्वीच मृत झाल्याचे घोषित केले.

# ई-केवायसी करून देण्यासाठी 'भाऊसाहेबांकडून' शेतकऱ्यांचा शोध सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि महापुराने बाधित असलेले अजून १० ते १२ टक्के शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅक झाले नसल्याने आणि ई-केवायसी अभावी त्यांच्या खात्यावर शासनाकडून येणारी नुकसान भरपाईची रक्कम मिळाली नाही. या शेतकऱ्यांना लवकर पैसे मिळावे यासाठी जिल्हा प्रशासनाकडून गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅक करून घेतले जात आहे. ई-केवायसी प्रक्रिया सुरु केली आहे. यामुळे आता राहिलेल्या लोकांचेही पैसे शासनाकडून लवकरच मिळणार आहेत. यासाठी आजपासून (दि.१५) जिल्ह्यातील सर्व तलाठी काम करीत असून, ई-केवायसी न केलेल्या शेतकऱ्यांचा ते शोध घेवून जागेवरच ई-केवायसी करून देतील, अशी माहिती आरडीसी अभिजित पाटील यांनी दिली.

अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड केल्या आणि या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आहे. यातील सर्वच रक्कम मंजूर झाली असून, यातील




५ लाख ३७ हजार ७०८ शेतकऱ्यांना आजतागायत ६६३ कोटी ४९ लाख ०७ हजार ६८० रूपये मंजूर झाले आहेत. त्यापैकी ३ लाख ४१ हजार ०९५ शेतकऱ्यांच्या खात्यावर आजतागायत ४०९ कोटी १९ लाख ८४ हजार ०५२ रूपये झाले जमा झाले आणि ईकेवायसीअभावी १ लाख ४७ हजार ४४० शेतकऱ्यांचे १८१ कोटी १२ लाख ८३ हजार ८८२ रूपये पेंडिंग पडले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावरही लवकरच पैसे पडतील, अशी माहितीही आरडीसी पाटील यांनी दिली. दरम्यान, ॲग्रीस्टॅक आणि ई-केवायसी अभावी ज्या शेतकऱ्यांचे पैसे अडकले आहेत; अशा शेतकऱ्यांचा शोध तलाठी बांधव घेत आहेत आणि अशा शेतकऱ्यांची जागेवरच ई-केवायसी करण्यात येत आहे.

## सुशील नगरात तरूणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

विजापूर रोडवरील सुशिल नगरात तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. योगेश अशोक प्यागे (वय १८, रा. सुशिल नगर, विजापूर रोड, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेनऊच्या पूर्वी राहत्या घरी योगेश याने पंख्याला ओढणीच्या सहाय्याने अज्ञात कारणावरून गळफास घेतला.

ही बाब नातेवाईकांच्या निदर्शनास आल्याने योगेश यास गळफासातून सोडवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी भाऊ रवी याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. पुजा लवटे यांनी योगेश यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




# प्रथमेश कोठेंच्या भाजप प्रवेशाचा आगामी निवडणुकीत होणार पक्षाला फायदा

- आ. देवेंद्र कोठेंचा वाढला राजकारणात दबदबा
- पालकमंत्री गोरे यांच्याही प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

शुक्रवारी भारतीय जनता पार्टीने बिहार विधानसभेमध्ये घवघवीत यश मिळविल्याने सोलापुरात त्या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष साजरा झाला तर दुसरीकडे भाजपमध्ये प्रवेश केलेल्या युवा नेता प्रथमेश कोठे आणि त्यांच्या समर्थकांचे सोलापुरात जंगी स्वागत करण्यात आले. प्रथमेश कोठे यांच्या भाजप प्रवेशामुळे निश्चितच पक्षाची ताकद सोलापुरात वाढली असून, आगामी निवडणुकीत त्यांचा पक्षाला नक्कीच फायदा होणार आहे. तर यामुळे आ. देवेंद्र कोठे यांनाही हत्तीचे बळ लाभले असून, त्यांचे हायटेक नेत्यांजवळ राजकीय वजन वाढले आहे.

दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही प्रथमेशला भाजपात आणण्यासाठी प्रयत्न केले होते आणि त्यांच्या या प्रयत्नाला यश



आल्याचेही बोलले जात आहे. विधानसभा निवडणुकीनंतर काही महिन्याने माजी महापौर महेश कोठे यांचे निधन झाले. अण्णांचे वारस प्रथमेश कोठे आता काय करणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अण्णा हे शरद पवारांच्या राष्ट्रवादित होते पण एकूणच विधानसभेचा निकाल आणि सोलापूर शहर उत्तर विधानसभा निवडणुकीत तयार झालेले वातावरण पाहता प्रथमेश हे निश्चित दुसऱ्या पक्षात जातील, अशी चर्चा होती. ते भाजप नको म्हणून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सुद्धा प्रवेश करतील अशा चर्चा रंगू लागल्या होत्या. पण आपले चुलत बंधू देवेंद्र कोठे हे भाजपचे आमदार असल्याने त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करावा, असा सल्ला सोलापुरातील जाणकार राजकीय नेत्यांनी त्यांना दिला. पण त्याच भाजपमुळे अण्णा निवडणुकीत पडले असेही काहीजण बोलत होते. पालकमंत्री जयकुमार गोरे हे सुद्धा काही वेळा प्रथमेश यांना भेटले होते. अखेर प्रथमेश यांनी देवेंद्र कोठे यांना सोबत घेऊन भाजपात प्रवेश केला.

विडी घरकुल परिसरात आजही स्व. महेश कोठे यांची ताकद आहे. किमान बारा नगरसेवक त्यांचे दरवेळी निवडून यायचे. त्यामुळे भाजप आणखी प्लस झाली आहे. प्रथमेश कोठे यांच्यामुळे आमदार देवेंद्र कोठे यांचेही वजन भाजपमध्ये वाढल्याचे दिसून येते. यामुळे आता महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप अधिकच मजबूत झाली असून महानगरपालिकेत पुन्हा एक हाती सत्ता भाजपची येईल, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. इतकेच कायतर आ. कोठेंकडून विविध प्रभागासाठी नवीन उमेदवारांची चाचणीपणीही सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२६८

**कारे नागवसी आयुष्य खातो काळ ।**
**दिसेंदिस बळ क्षीण होतें ।।**

निसर्गाचा नियमानुसार जन्म आहे तिथे मृत्यु हा ठरलेलाच असतो. कोणत्याही नियमात एखाद्यावेळी बदल होउ शकतो. मात्र निसर्गाच्या या नियमात कोणताही बदल होत नाही. जे निर्माण झाले आहे किंवा जे जन्माला आले आहे ते एके दिवशी निश्चीतच नाश पावणार किंवा मरणार असते. हे प्रत्येकाला माहिती आहे. तरीपण या याच्याकडे दूर्लक्ष करुन आपणाला जणू मृत्युच नाही,अशा समजुतीने लोक आयुष्यभर नको ते करीत रहातात. रिक्त हाताने येउन रिक्त हाताने जाणारा हा माणुस आयूष्यभर या हाताने जमवाजमव करीत राहातो. ही जमवाजमव करतांना अनेकांवर अन्याय करण्यातही तो मागेपुढे पाहात नाही. ज्या हृदयात मनात प्रेम, आपुलकीचा स्थान द्यायला पाहिजे. त्या हृदयात तो इर्षा, द्वेश, मत्सर, अहंकार आदीला स्थान देतो. त्याचा परिणाम तो कोणाच्याही हृदयात स्थान न मिळविण्यावर होतो. तो



स्वत:चाही रहात नाही किंवा इतरांचाही राहात नाही. आपली वृत्तीच आपणाला स्वत:पासुन दूर नेते याचीही माणसाला आठवण रहात नाही. एखाद्याने चांगला सल्ला दिला तर तो उद्यापासून मी पाळणार असल्याचे म्हणतो. खरे म्हणजे क्षणाक्षणाला आयुष्य संपत असल्याने आपणाला जे काही सुकृत करायचे आहे ते याच क्षणी करायला हवे. याची जाणीव करुन देतांना तुकाराम महाराज म्हणतात, **कारे नागवसी आयुष्य खातो काळ । दिसेंदिस बळ क्षीण होतें ।।**

एक तारखेपासून, उद्यापासुन, सोमवारपासुन किंवा विशिष्ट अशा मूहुर्तापासून चांगल्या कार्याची सूरुवात करतो, असे म्हणने चूकीचे आहे. कारण त्या मूहूर्तापर्यंत आपण जगणारच आहोत, हे कशावरुन? बरेच लोक तारूण्यात किंवा अचानकपणे मृत झालेले आपण पाहातो. आपला क्रमांक केंव्हा आणि कसा लागेल हे कोणालाही सांगता येत नाही. अर्थात पुढचा क्षण आपल्या मालकीचा नसल्याने माणसाने प्रत्येक क्षणाला माणुस म्हणुन जगले पाहिजे.माणुस म्हणजे मातृत्वाने, नुकसान न करता,त्याचबरोबर सद्सद्विवेक बुध्दीने जगले पाहिजे. माणसाची ही परिभाषा आपण क्षणाक्षणाला प्रत्येक कृतीत उतरवली पाहिजे. आई-वडीलांची सेवा असो किंवा समाजसेवा असो. ती प्रत्येक क्षणाला आपल्याकडुन घडली पाहिजे. पुढचा क्षण आपल्या मालकीचा नाही. म्हणुन प्रत्येक क्षणी वाटेल तसा आनंद उपभोगू अशी वृत्ती ठेवु नये. कोणत्याही क्षणी मृत्यु आला तरीही त्याची भिती वाटली नाही पाहिजे. अशी भिती न वाटण्यासाठी माणसाने स्वत:च्या कार्याचा स्वत: साक्षीदार बनले पाहिजे. निती-नियमाचे तंतोतंत पालन करुन वागणा-याला मृत्यु हा काळ न वाटता मित्र वाटू लागतो. मृत्युची आठवण ही मानवात सुपरीवर्तन करणारी असते.मृत्यु आपणाला इथले सर्व इथेच टाकायला लावतो याची जाण झाली म्हणजे नको त्या गोष्टी कराव्या वाटत नाहीत. नको त्या गोष्टी आपल्या हातून न घडणे म्हणजेच आपण माणुस म्हणुन जगणे होय. माणसाकडून माणूसकीची अपेक्षा करु नये तर कोणाकडुन करावी. नको ते उपदव्याप करणाऱ्यांना किंवा दुष्कृत्य करणाऱ्याला जरा माणसासारखे वाग, असे म्हणावे लागते. याचा अर्थ असा आहे की, अनेक लोक माणसाच्या पोटी जन्माला येउनही माणसासारखे वागत नाहीत. असो आपण ज्ञानोबा-तुकोबांचे भक्त असल्याने आपणाला मृत्युची किंवा मानवतेची वेगळी आठवण देण्याची गरज पडू नये, असे वाटते. जय जय राम कृष्ण हरी. संत तुकाराम महाराजांचा फोटो घ्यावा.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिवस. |
| दि. ९ नोव्हेंबर २०२५ | २000: कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे संस्कृत रचना पुरस्कार डॉ. गजानन बाळकृष्ण पळसुले जाहीर. |
| विक्रम संवत् २०८२ | २००९: स्पेस शटल प्रोग्राम: स्पेस शटल अटलांटिस मिशन STS-१२९ वर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर प्रक्षेपित करण्यात आले. |
| शके - १९४७ | |
| संवत्सर - विश्वावसु | |
| मास - कार्तिक कृ. द्वादशी | |
| ऋतु - हेमंत | |
| नक्षत्र- हस्त (२६.१०) | |
| योग - प्रिती (अहोरात्र) | |
| करण - कौलव (१५.३९) | |
| ....राहू काल.... | |
| रविवार : दु.४.३० ते ६.०० | |


# रेल्वेच्या चाकांवर आता सीसीटीव्हीची नजर

## सोलापूर रेल्वे स्टेशन येथील आठ हटमध्ये बसविले प्रत्येकी दोन कॅमेरे

### प्रवास होणार अधिक सुखकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

रेल्वे प्रवासादरम्यान जर कुठली गंभीर घटना घडली. जसे की हॉट एक्सेलमुळे लागलेली आग, ब्रेक बिघाडी किंवा चाकामध्ये ठिणगी पडल्या तर त्याचे चित्रीकरण सीसीटीव्ही कॅमेरामध्ये टिपले जाईल. हे फुटेज पुढील चौकशीत महत्त्वाचा पुरावा म्हणून वापरले जाणार आहे रेल्वेच्या प्रत्येक फेरीत सुरक्षेचा दर्जा वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरतोय असे रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.




सोलापूरातून रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवासांचा प्रवास आणखीन सुरक्षित होण्यासाठी स्थानकावरील आठ हटमध्ये प्रत्येकी दोन असे सोळा सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या माध्यमातून रेल्वेच्या चाकांपासून ते ब्रेक सिस्टीम पर्यंत प्रत्येक हालचालीवर सीसीटीव्ही मधून बारकाईने लक्ष असणार आहे.

> **२४ तास नियंत्रण रेल्वे गाड्यांवर लक्ष असेल**
> सोलापूर रेल्वे स्थानकात आठ ठिकाणी असणाऱ्या हटमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. यामुळे कोणतीही आपत्कालीन परिस्थिती वेळेवर समजणार आहे. तसेच कर्मचाऱ्यांनी सीसीटीव्हीच्या माध्यमातून २४ तास नियंत्रण रेल्वे गाड्यांवर लक्ष असेल. यामुळे संभाव्य होणारा अपघात कळतील.
> **- योगेश पाटील, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक सोलापूर**

रेल्वे गाडी स्थानकात येताना किंवा बाहेर जाताना हटमध्ये बसलेले कर्मचारी या कॅमेराद्वारे गाडीच्या खालील भागावर सतत नजर ठेवतात. चाकामध्ये काही तुटलेले पार्ट ब्रेक बाइंडिंग, हँगिंग पार्ट किंवा हॉट एक्सेलमुळे निर्माण होणारी आग अशा घटकांवर तत्काळ लक्ष जाण्याची सोय या कॅमेरा मुळे झाली आहे. यामुळे रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित आधुनिक आणि विश्वासार्ह होणार आहे.

यासोबतच हटमध्ये तैनात कर्मचाऱ्यांना थर्मामीटर गण देण्यात आली आहे. या उपकरणाद्वारे ते रेल्वेच्या एक्सेल बॉक्सचे तापमान मोजतात. ज्यामुळे चाकणमध्ये असामान्य उष्णता निर्माण होत असल्यास ती त्वरित ओळखता येते. ही अगोदरच दिलेली चेतावणी असल्याने मोठ्या दुर्घटना टाळता येण्यास मदत होणार आहे.



# नूतन सरपंच भाऊराजे जाधव यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

बक्षीहिप्परगे गावाचे नूतन सरपंच भाऊराजे जाधव यांचा माजी सरपंच बाबुराव चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. परमेश्वर हटकर, हनुमंत पवार, लक्ष्मण महाडिक यांनी सरपंच चव्हाण यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी पंचायत समिती सदस्य तुकाराम कोळेकर, सरपंच शेखुंबर शेख, संतोष चव्हाण, दिगंबर जाधव, बालाजी यादव, शिवाजी राठोड, महादेव खाडेकर, अकबर शेख, रतन राठोड, नामदेव माळी, हरिदास जाधव, सुरेश सिद्धे, सौदागर शिंदे, हुसेन शेख, पैगंबर शेख, अमीर शेख, शिवाजी चव्हाण, बाळासाहेब जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण महाडिक यांनी केले तर आभार बालाजी यादव यांनी मानले.

# फोमरा मूकबधिर शाळेत बालदिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

येथील रोटरी नॉर्थ राधाकिसन फोमरा मूकबधिर शाळेत देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती, म्हणजेच बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी सहायक पोलीस आयुक्त दिलीप पवार यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

सहायक पोलीस आयुक्त दिलीप पवार यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. बालदिनाचे महत्त्व, बालकांचे हक्क आणि त्यांना सुरक्षित व पोषक वातावरण याविषयीची माहितीही दिली. शाळेच्या मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी दिलीप पवार यांचे स्वागत केले. शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी पवार यांचा शाल आणि स्मृती चिन्ह देऊन सत्कार केला.

याप्रसंगी बळीराम पावडे, दौलत सीताफळे, संजय चौगुले, विजया पिटाळकर, संध्या चंदनशिवे, योगिता बोधले, दिनेश ताटे, बेनुरे, साहेबगौडा पाटील आदी उपस्थित होते. अजित पाटील यांनी सूत्रसंचालन केले.



# मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया, चष्मे वाटप शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त, देसाई हॉस्पिटल पुणे अंतर्गत शंकरशेठ साबळे हॉस्पिटल सोलापूर व सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष तथा उळे उपसरपंच नेताजी खंडागळे यांच्या संयुक्त विद्यमाने तांदुळवाडी, मुस्ती आणि बोरामणी येथे मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

या तीनही ठिकाणच्या शिबीरातंर्गत एकूण ६०० जणांची नेत्र तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी १५० रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान झाले आहे. तसेच ३६५ रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. मोतीबिंदूग्रस्त रुग्णांवर शंकरशेठ साबळे हॉस्पिटल येथे शस्त्रक्रिया करण्यात आले.

दरम्यान, सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष तथा उळेचे उपसरपंच नेताजी खंडागळे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, या उद्देशाने या शिबीरांचे आयोजन करण्यात आले. याकामी वैद्यकीय अधिकारी, ग्रामपंचायती, स्वयंसेवक, सह्याद्री फाउंडेशनचे कार्यकर्ते आदींचे सहकार्य लाभले.

# पत्रकारांनी दाखवला मानवतेचा मार्ग

## वांगी शाळेत पाझरला पाण्याचा झरा

### मुंबई मराठी पत्रकार संघ आणि सहा संस्थांची अनोखी समाजसेवा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर -**

पत्रकारितेचा अर्थ फक्त बातम्या सांगणे नाही; तर समाजातील वेदना ऐकून त्या कमी करण्यासाठी उभे राहणे आहे. याचे जिवंत उदाहरण ठरला दक्षिण सोलापूर तालुक्यातील वांगी गावातील जिल्हा परिषद शाळेतील पाण्याचा झरा.

मुंबई मराठी पत्रकार संघ आणि विहंग प्रतिष्ठान यांच्या पुढाकाराने शाळेच्या आवारात बोअरवेल मारण्यात आली. १३० फुटांवर लागलेल्या दोन इंच पाण्यामुळे शाळेला अखेर जीवनदायी आधार मिळाला आहे. या कार्यात बालमोहन विद्यामंदिर पालक



विद्यार्थी उत्कर्ष समिती, जीएसबी टेंपल ट्रस्ट, संत गाडगेबाबा धर्मशाळा आणि पल्लवी फाऊंडेशन यांचाही मोलाचा सहभाग होता.

निधी संकलन, प्रत्यक्ष भेट, परिसराची पाहणी आणि शेवटी पाण्याची सोय; हा उपक्रम संवेदनशील पत्रकारितेचा आणि सामाजिक बांधिलकीचा सर्वोत्तम संगम ठरला आहे.

कार्यक्रमास मुंबई मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र हुंजे, विहंग प्रतिष्ठानचे प्रसाद मोकाशी, राजेंद्र साळस्कर आणि काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब कुलकर्णी उपस्थित होते. शाळेत बोअरवेलला लागलेले पाणी पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद लपून राहत नव्हता. पाणी पाहून विद्यार्थ्यांनी शाळेच्या मैदानात एकच जल्लोष केला. ग्राम शाळा समिती, शाळेच्या मुख्याधिपिका आणि सर्व शिक्षकांनी या कार्यात सहभागी संस्थांचे आभार मानले.

# केस माघारी घेण्याच्या कारणावरुन तरुणावर कोयत्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर -**

केस माघारी घेण्याच्या कारणावरून तरूणाच्या डोक्यात कोयत्याने मारहाण करून दहशत निर्माण करणाऱ्या चौघांवर सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रोहित बसप्पा आण्णारेड्डी (वय २६, रा. मौलाली चौक, कुंचीकोरवी गल्ली, हरिजन वस्ती, दुर्गा मंदीरसमोर, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन सुरेश कृष्णा श्रीराम, प्रदीप गायकवाड, विशाल श्रीराम, प्रज्वल गायकवाड (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ नोव्हेंबर रोजी रोहित आण्णारेड्डी याचा वाढदिवस असल्याने त्याचा भाऊ राहुल आण्णारेड्डी (वय २४) व भाचा रवि संगड हे दोघेजण लिमयेवाडी येथील काका महा चिकन सेंटर येथे चिकन घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी सुरेश श्रीराम व त्याचे साथीदार हे त्याठिकाणी गेले. त्यांनी मागील केस माघारी घेतो का नाही असे म्हणून प्रदीप गायकवाड याने हातातील कोयता काढून राहुल अण्णारेड्डी याच्या डोक्यात मारून त्यास जखमी केले. यावेळी श्रीराम व त्याच्या साथीदारांनी हाताने मारहाण करून सार्वजनिक ठिकाणी हातात कोयते घेऊन कोणी मध्ये आले तर त्यालापण खल्लास करतो असे म्हणून आरडाओरड करीत दहशत निर्माण केली. त्यामुळे लोंकांनी त्यांची दुकाने बंद करून शटर लावून घेतले. याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक कुतवळ पुढील तपास करीत आहेत.

# अतिवृष्टी अन् महापुराने ग्रासलेल्या शेतकऱ्यांना हमीभाव मिळणार का?




न भूतो: न भविष्यती: असा पावसाचा जोरदार तडाखा दुसऱ्या पट्ट्यात असलेल्या सोलापूर शहर जिल्ह्यास बसला. नवरात्रीचे ते दिवस आजही शेतकऱ्यांच्या आठवणीत आहेत. कधी नव्हे ते वरूनराजाने सोलापूरवासियांवर अवकृपा करत पावसाची दमदार हजेरी लावली. भयानक कोसळलेल्या अक्राळ विक्राळ पावसाने शेतकऱ्यांचे पुरते कंबरडे मोडले. शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेला घास यामुळे हिरावून घेतला गेला. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने मदत जाहीर केली. परंतु ही मदत शेतकऱ्यांना तुटपुंजी स्वरूपाची ठरली. खरीपाचे सोयाबीन, उडीद, मूग, हरभरा पावसात भिजल्याने कडधान्याचे अतोनात नुकसान झाले. पावसाने खराब झालेल्या धान्याची विक्री कशी करायची असा प्रश्न ? शेतकऱ्यांसमोर आव वासून उभा ठाकला असताना, हमीभावाने सोयाबीन, उडीद, मुगाची खरेदी करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

त्यानुसार राज्यातील २८ जिल्ह्यांमध्ये हमीभाव खरेदी केंद्र सुरू होणार आहेत. तर ठिकाणी केंद्रे सुरू झालेली आहेत. सोलापूर जिल्ह्यात देखील सात हमीभाव खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार बार्शी, करमाळा, पंढरपूर, मंगळवेढा, अक्कलकोट, माळशिरस, माढा या तालुक्यांचा समावेश आहे. पाच तालुक्यात केंद्रे सुरू करण्यात आली आहेत तर दोन केंद्रांमध्ये खरेदीची यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. राज्यातील २८ जिल्ह्यांमध्ये हमीभाव खरेदी प्रक्रिया राबवली जात आहे, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाने सांगितले आहे. पणन महासंघाच्या माध्यमातून राज्यात नाफेड आणि एनसीसीएफसाठी सोयाबीन खरेदी करण्यात येणार आहे. सोयाबीनचा हमीभाव केंद्र सरकारने यंदा प्रति क्विंटल ५३२८ रुपये जाहीर केला. तसेच मुगाचा व उडदाचा हमीभाव प्रत्येकी ७७६८ रुपये व ७८०० रुपये जाहीर केला आहे. शेतकऱ्यांची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने पॉस मशिनद्वारे करण्यात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधारकार्ड, बँक पासबुक, चालू वर्षाचा ७/१२ उतारा, पीकपेरा इ. कागदपत्रांसह नोंदणीकरिता प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहणे गरजेचे आहे.

दरम्यान, अतिवृष्टीमध्ये अनेक शेतकऱ्यांची पिके उध्वस्त झाली. एकेएकांच्या जमिनी खरडून वाहून गेल्या. त्यामानाने सरकारची मदत तोकडी आहे. हमीभावाने खरेदी केंद्र सुरू केले. परंतु त्याला देखील मोठा उशीर झाला. केंद्र सुरू होण्यापूर्वीच शेतकऱ्यांनी मिळेल, त्या भावाने यापूर्वीच सोयाबीन, उडीद आणि मुगाची विक्री केली. कारण शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने शेतकऱ्यांनी येईल, त्या दामावर कडधान्याची विक्री केली. विविध शेतकरी संघटनेच्या निवेदनानंतर आक्रमक भूमिकेनंतर राज्य शासनाने वरिष्ठ स्तरावर हालचाली करत हमीभाव खरेदी केंद्र सुरू केले. परंतु राज्यातील कित्येक शेतकऱ्यांनी अडत व्यापाऱ्याच्या दुकानात यापूर्वीच आपल्या शेतमालाची गोणी टाकल्यानंतर हमीभाव खरेदी केंद्र सुरू केल्याचा काय उपयोग? असा सवाल काही संतप्त शेतकऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे. एकंदर, राज्य शासनाने नैसर्गिक आपत्ती लक्षात घेऊन तात्काळ यासंबंधी निर्णय घेणे अपेक्षित होते. परंतु पाटाखालून बरच पाणी गेल्यानंतर बांध बांधण्याचा काय उपयोग अशी आता प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे. राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाच्या धोरणात्मक निर्णयावर दिरंगाई केल्याने शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.त्यामुळे हमीभाव खरेदी केंद्राचा शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने दिलासा मिळणार का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

# 'दुर्गोत्सव २०२५'ने रचला इतिहास!

### 'अमृत' संस्थेच्या विक्रमी मोहिमेची गिनीज बुकात नोंद!

### सोलापुरातील ३ हजाराहून अधिक शिवप्रेमींचा यामध्ये सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्ग परंपरेला मानवंदना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या 'अमृत' संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'दुर्गोत्सव २०२५' या अभूतपूर्व उपक्रमाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आपले नाव कोरले आहे. या उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ३००० हून अधिक शिवप्रेमींनी यामध्ये सहभाग नोंदविला असल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक श्रेयस कुलकर्णी यांनी दिली आणि सोलापूरवासियांचे मनः पूर्वक आभार मानले.

'दुर्गोत्सव २०२५' अंतर्गत, दिवाळीदरम्यान महाराष्ट्रातील लाखो नागरिकांनी, शाळांनी, सोसायट्यांनी आणि कुटुंबांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या प्रतिकृती (किल्ल्यांचे हुबेहूब मॉडेल) मोठ्या उत्साहात तयार केले. सर्वाधिक किल्ल्यांच्या प्रतिकृती या श्रेणीत 'अमृत' संस्थेने हा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे.

या मोहिमेत महाराष्ट्रभर (आणि महाराष्ट्राबाहेरही) विक्रमी संख्येने किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या आणि त्यांच्या छायाचित्रांची नोंदणी दुर्गोत्सवाच्या अधिकृत संकेतस्थळावर करण्यात आली. या विक्रमी सहभागाने महाराष्ट्राच्या दुर्ग संस्कृती आणि वारशाबद्दलच्या लोकांच्या प्रेमाची जागतिक स्तरावर नोंद घेतली गेली.

या उपक्रमातून युनेस्कोने वर्ल्ड हेरिटेज साइट म्हणून प्रमाणित केलेल्या महाराजांच्या १२ किल्ल्यांबद्दल जागरूकता वाढवण्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य झाले. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या प्रतिनिधींनी या विक्रमाची अधिकृत घोषणा करत 'अमृत' संस्थेचे आणि सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील तमाम नागरिकांचे अभिनंदन केले. हा विक्रम केवळ संख्येचा नसून,

शिवछत्रपतींच्या वारशाप्रती असलेल्या निष्ठेचा आणि सामुदायिक एकजुटीचा आहे,' असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'अमृत' संस्थेने या विक्रमाचे श्रेय महाराष्ट्रातील प्रत्येक 'दुर्गप्रेमी' नागरिकाला दिले आहे. या विक्रमामुळे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि इतिहासाचा गौरव जगभर पोहोचला आहे.

अफजलखानाचा वध केलेला दिवस 'शिवपराक्रम दिन' (१० नोव्हेंबर) साजरा करत 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'चे निर्णय अधिकारी प्रवीण पटेल यांनी विश्वविक्रम झाल्याचे प्रमाणपत्र राज्य सरकारची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीचे (अमृत) व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना प्रदान केले. 'जाणता राजा'चे व्यवस्थापक डॉ. अजित आपटे, इतिहास लेखक सुधीर थोरात, ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ पांडुरंग बलकवडे, दुर्गतज्ज्ञ प्रा. प्र. के. घाणेकर, सह्याद्री प्रतिष्ठानचे श्रमिक गोजमगुंडे, 'अमृत'चे प्र. संचालक सिद्धेश्वर वरणगावकर, विशेष कार्यकारी अधिकारी प्रवीण पांडे, श्रीराम बेंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश वाघचौरे,विभागीय व्यवस्थापक श्री थमेश कुलकर्णी, अधीक्षक चंद्रकांत बोबडे या वेळी उपस्थित होते.

छत्रपती शिवरायांच्या दुर्गांना मानवंदना देण्यासाठी, तसेच दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये दुर्ग तयार करण्याची मराठमोळी परंपरा जतन करावी यासाठी 'अमृत'ने राज्यातील सर्व नागरिकांना या १२ दुर्गांपैकी कोणत्याही एका दुर्गाची प्रतिकृती स्वतः तयार करून त्यासोबत त्यांचा फोटो अपलोड करण्याचे आवाहन केले होते.

यात सहभागी झालेल्यांना गौरविण्यात आले. सिद्धेश्वर वरणगावकर यांनी सूत्रसंचालन केले, तर सुधीर थोरात यांनी आभार मानले.

# दुकानासमोर स्क्रॅप ठेऊन वायर जाळणाऱ्या विरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर -**

विमानतळ परिसरामधील मजरेवाडीतील कस्तुरबा नगरात दुकानासमोर स्क्रॅपचे साहित्य ठेऊन प्लास्टीक वायर जाळून मानवी जिवितास हानी पोहोचविणाऱ्या विरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस कर्मचारी नितीन कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अब्दुल रहिम इरफान शेख (वय ४३, रा. सिध्देश्वर पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मजरेवाडी येथील कस्तुरबा नगरात अब्दुल रहिम शेख याचे प्लास्टीक दुकाना आहे. १४ नोव्हेंबर रोजी पोलिस कर्मचारी नितीन कांबळे यांनी शेख यास स्क्रॅपचे साहित्य काढून घेण्यास सांगितले होते. तरीही शेख याने दुकानासमोरील स्क्रॅपचे साहित्य काढून न घेता मानवी जिवितास धोकादायक रोगाचा संसर्ग होईल अथवा संसर्ग पसरण्याचा संभव आहे अशा पध्दतीने ठेऊन प्लास्टीक वायर जाळताना मिळून आला. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## महत्वाचे...



### श्री वर्धमान जैन तालुका वाचनालयात बालदिन कार्यक्रम

**बार्शी, दि. १५ नोव्हेंबर-**

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय बार्शी येथे पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती व बालदिन साजरा करण्यात आला. प्रथमतः पंडित जवाहरलाल नेहरु यांचे प्रतिमेचे पूजन वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ संचालक धिरज कुंकूलोळ, प्रमोद भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वाचनालयाने यावर्षी बाल वाचकांसाठी एक वर्षासाठी मोफत वाचक नोंदणी सुरु केली आहे. आमच्या वाचनालयात बाल विभाग स्वतंत्र आहे. तसेच बाल विभागात बाल विभागाची साधारण ५ हजार बाल साहित्ये व मासिके आहे. याचा बार्शीतील बालवाचकाने व पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वाचनालयाच्यावतीने करण्यात आले. वाचक वर्ग व सभासद उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन किशोर श्रीश्रीमाळ यांनी तर आभार प्रदर्शन धिरज कुंकूलोळ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, सहा. ग्रंथपाल शितल लुकडे, क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.



### वळसंग अंगणवाडीत बालदिन साजरा

**वळसंग, दि. १५ नोव्हेंबर-**

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बाल दिवस म्हणून साजरा केला जातो. वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे अंगणवाडीमध्ये बालदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमला पालक वर्ग तसेच अंगणवाडी सेविका भागीरथी बिराजदार, बबिता राठोड, नाजिया अमलीचूंगे यांनी परिश्रम घेतले. तसेच पालकांनी अंगणवडीतील मुलांना चॉकलेट न देता फळे देण्यात आले. प्रसिद्ध हॉटेलचे मालक तोटप्पा मोटगी, राजकुमार बाबानागरे, शिवा धनाळी यांनी मुलांना फळे वाटप केले. कार्यक्रमात संगीत खुर्ची, लिंबू चमचा असे चिमुकल्यासाठी स्पर्धा घेण्यात आले.



### बालदिनानिमित्त झोपडपट्टी परिसरातील मुलांना खाऊ वाटप

**अक्कलकोट, दि. १४ नोव्हेंबर-**

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय बाल दिनाचे औचित्य साधून शिक्षणापासून व शाळेपासून वंचित असलेल्या झोपडपट्टी परिसरातीललहान मुलांना क्रीम बिस्किट, केक, डेरी मिल्क चॉकलेट अशा गोड-धोड पदार्थ वाटून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला. या खाऊ वाटप उपक्रमाला मोहसीन मोकाशी, अब्दुल हनान अत्तार,रशीद खिस्तके,अकीब बागवान,मुबिन अन्सारी, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांचे सहकार्य लाभले. झोपडपट्टी परिसरातील २५ ते ३० लहान मुलांना व महिलाना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी सोहेल फरास, मोहसीन मोकाशी, अब्दुल हनान अत्तार, रशीद खिस्तके, अकीब बागवान, मुबिन अन्सारी, अशरफ गोलंदाज, अल्ताफ बागवान उपस्थित होते.

## वाचकपत्र

### ॲम्बुलन्सचा मान राखा



सोलापूर शहरातची लोकसंख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढलेली आपल्याला दिसत आहे. या लोकसंख्येमुळे रस्त्यावरील वाहनांची संख्या देखील झपाट्याने वाढत आहे. मात्र रस्ते आहेत त्या जुन्या पद्धतीची आहेत यात काहीच बदल झालेले नाही उलट रस्त्यावर, फुटपाथवर देखील लोक वाहने लावतात व रहदारीला अडथळा आणतात. चौकात सिग्नलवर उभारलेले वाहने नियमाचे पालन न करता कशाही पद्धतीने आडवे तेवढे गाड्या लावून उभारलेले दिसतात. काही जागी तर सिग्नल चालू नसल्यामुळे वाहन चालकाला गाडी चालवणे, गाडी उभे करणे या गोष्टीसाठी खूप त्रास होतो. अशा वाईट परिस्थितीमध्ये एखादी ॲम्बुलन्स रुग्णाला घेऊन जात असताना तात्काळ त्याला वाचवण्यासाठी म्बुलन्स प्रयत्न करत असताना आपल्याला दिसते. ॲम्बुलन्सचे आवाज आल्यावर देखील नागरिक आपली वाहने रस्त्याच्या एका बाजूला न लावता तसेच उभारलेले बऱ्याचदा दिसतात अथवा बाजूला वाहान काढून देखील ॲम्बुलन्सला जाण्यासाठी मार्ग त्वरित मिळत नाही. यामुळे ॲम्बुलन्समध्ये असलेल्या व्यक्तीचे जीव जाऊ शकतो या गोष्टीची जाणीव नागरिकांना नसल्यामुळे ॲम्बुलन्सला महत्त्व देण्यात येत नाही. ही बाब माणुसकीला न शोभणारी आहे. तरी कृपया ॲम्बुलन्सचे आवाज आल्याबरोबर रस्त्याच्या बाजूला वाहने लावून ॲम्बुलन्सला जाण्यासाठी रस्ता मोकळा करून देणे हेच मानवतेचे कर्तव्य आहे, असे वाटते.

**फैय्याज शेख**, अध्यक्ष,
सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच, सोलापूर.

# माळशिरसमध्ये भाजपाला अच्छे दिन

## अनेक दिग्गजांच्या प्रवेशामुळे पक्षाला बळकटी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १५ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यात खरेतर लोकसभा व विधानसभा निवडणुकीत थोडासा फटका बसला कारण माढा लोकसभेला भाजपचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचा तर विधानसभेला माजी आमदार राम सातपुते यांना पराभवाचा सामना करावा लागला. मात्र केंद्रात तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. त्यानंतर अवघ्या काही महिन्यानंतर महाराष्ट्रात महायुतीचे सरकार सत्तेत देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले. याचा मोठा परीणाम तालुक्याच्या राजकारणावर झाला. त्यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले खास मर्जीतील व विश्वासू सहकारी जयकुमार गोरे यांची सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी वर्णी लावीत माजी आमदार रामभाऊ सातपुते यांना मोठी ताकद दिली.

माजी आमदार राम सातपुते यांनीही आपण आमदार असो काय आणी नसो काय देशात व राज्यात सरकार सत्तेत आहे यामुळे आपला कामाचा झंझावात व जनतेशी कसलाही संपर्क जरा सुद्धा कमी होऊ दिलाच नाही. जनता दरबार, लाखोंची सर्व सामान्यांची मोफत ऑपरेशन किंवा विकास कामांना निधी असो कुठेही कमी न पडता एखाद्या विद्यमान पदावर असणाऱ्या लोकप्रतिनिधीला लाजवेल असा कामाचा झंझावात राज्यातील सर्व मंत्र्यांशी असणारे सलोख्याचे संबंध यामुळे कुठल्याही कामाला कशलीच अडचण नाही. माळशिरस तालुक्यातील जनतेला हे पटले आणी सध्या मोहीते-पाटील गट असो की आमदार उत्तमराव जानकर यांचा गट असो या गटातील तालुक्यातील अनेक गावातील विद्यमान सरपंच, ग्रामपंचायत सदस्य माजी पदाधिकारी हे मोठ्या संख्येने भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत. यामुळेच या दोन्ही गटात सध्या प्रचंड खळबळ उडाली आहे.

नुकताच पानीव येथील काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील व श्रीलेखा पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. आता लवकरच सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व मोहीते पाटील यांचे अत्यंत विश्वासू बाबाराजे देशमुख हे आपल्या समर्थकांसह लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. तर तालुक्यातील अनेक दिग्गज सध्या भाजपच्या वाटेवर आहेत. यामुळेच तालुक्यात सध्या पालकमंत्री जयकुमार गोरे व माजी आमदार रामभाऊ सातपुते तसेच माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात भाजपमध्ये सध्या विविध पक्षांतील पदाधिकारी प्रवेश करीत आहेत.

यामुळे सध्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर भाजपच्या सर्व सामान्यांसाठी असणाऱ्या प्रधान मंत्रि किसान सन्मान योजना,नमो योजना, मुखयमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज, शेतीविषयक सर्व बाबींसाठी असणारा जीएसटी अठरा टक्केवरुन पाच टक्के, मोफत आरोग्य सुविधा, अतिवृष्टीत शेतकऱ्यांना केलेली मदत असो अशा कितीतरी योजना आहेत की ज्यामुळे एके काळी ग्रामीण भागात नसणारे भाजपाने सध्या ग्रामीण भागात भक्कम पाय रोवले आहेत. माळशिरस तालुक्यात सुद्धा सध्या प्रत्येक गावागावांत भाजपाने घट्ट पाय रोवले आहेत. माळशिरस तालुक्यातील भाजपाच्या या बळकटी आगामी नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूका तसेच जिल्हा परिषद व पंचायत समीती निवडणुकीत मोहीते-पाटील गट असो किंवा आ. उत्तमराव जानकर यांचा गट असेल या दोन्ही गटाला भाजपाचे तगडे आव्हान असेल.

विद्यमान खासदार धैर्यशील मोहिते-पाटील असतील किंवा आमदार उत्तमराव जानकर असतील हे दोन्ही विरोधी गटातील यामुळे यांना अद्यापपर्यंत म्हणावा तसा विकास निधी खेचून आणता आला नाही. याचाच परीणाम असा झाला की दोन्ही गटातील दिग्गज नेते व पदाधिकारी भाजपामध्ये प्रवेश करीत आहेत. अकलूजसह माळशिरस तालुक्यातील सर्वच गावातून मोठ्या प्रमाणात विविध पक्षांतील नेते, पदाधिकारी हे भाजपामध्ये प्रवेश करीत आहेत. यामुळे खरेतर लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर माळशिरस तालुक्यात भाजपला अच्छे दिन आले आहेत. आगामी सर्व निवडणुकांत भाजपा मोहिते-पाटील व उत्तम राव जानकर गटाला म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाला मोठे आव्हान देणार हे निश्चित आहे.



## गुणवत्ता शोध स्पर्धेत शिरवळ जि.प. शाळेचे यश

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १५ नोव्हेंबर**

पंचायत समिती शिक्षण विभागामार्फत घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय समूह गीतगायन विद्यार्थी गुणवत्ता स्पर्धेत शिरवळ येथील जि. प. प्राथमिक मुलींच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी 'या देशाचा उन्नत माथा' या सादर केलेल्या समूहगीतास प्रथम क्रमांक मिळाला.

या यशात वैभवी स्वामी, प्रतीक्षा स्वामी, नंदिनी कोळी,सृष्टी कोकरे, शिवानी बिराजदार, तृप्ती देवकर, प्रियंका दुधभाते, भक्ती इंगळे, श्रद्धा इंगळे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ समूहगीत गायन सादर केले. तसेच वक्तृत्व स्पर्धा लहान गटात आराध्या शिवनाथ लोमटे हिने तालुकास्तरीय स्पर्धेत विद्यार्थी कसा असावा या विषयाव भाषण करून प्रथम क्रमांक मिळविला. शिरवळ शाळेचे समूहगीत गायन आणि वक्तृत्व सादर केलेल्या विद्यार्थ्यांची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे. समूहगीत गायन स्पर्धा लहान गटातही शाळेने तालुकास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. लोकनृत्य स्पर्धा प्रकारातही केंद्रस्तरावर प्रथम क्रमांक पटकावून तालुकास्तरीय स्पर्धेतही चांगले यश मिळविले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांना सुनीता किरनळळी, प्रेमा कोणजी, रोहिणी बिराजदार, कल्पना मोरे, दयानंद चव्हाण, राजकुमार कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे शिक्षणविस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, लकप्पा पुजारी, केंद्रप्रमुख देविदास वाघमोडे, विषयतज्ज्ञ गणेश अंबुरे, केंद्रीय मुख्याध्यापक तोरप्पा चव्हाण, मुख्याध्यापक नागनाथ मिरजे, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## जेऊर येथे हुतात्मा व उद्यान रेल्वे थांब्यासाठी आज बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१५ नोव्हेंबर-**

हुतात्मा एक्सप्रेस आणि उद्यान एक्सप्रेस या गाड्यांना जेऊर रेल्वे स्टेशनवर थांबा मिळावा, यासाठी नागरिकांकडून वारंवार मागणी करण्यात येत आहे. मात्र संबंधित रेल्वे विभागाकडून या मागणीची सातत्याने उपेक्षा होत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे संतापाची लाट उसळली पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी नागरिकांनी येत्या १६ तारखेला महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर या गाड्यांना थांबा देणे अत्यावश्यक झाले आहे. विद्यार्थ्यांना, नोकरदारांना आणि जेष्ठ नागरिकांना प्रवासासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. अनेक वेळा निवेदने, निवेदन मोर्चे, तसेच लोकप्रतिनिधींच्या माध्यमातूनही मागणी पुन्हा-पुन्हा करण्यात आली; परंतु त्याची योग्य दखल घेण्यात आली नाही.या पार्श्वभूमीवर दि.१६ रोजी होणाऱ्या बैठकीत पुढील आंदोलनाचा आराखडा ठरवला जाणार आहे.

## अक्कलकोट नगरपालिका निवडणूक

### नगराध्यक्ष पदासाठी एक; सदस्यपदासाठी १५ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ नोव्हेंबर-**



अक्कलकोट नगर परिषदेच्या निवडणुकीकरिता नगराध्यक्ष पदाकरित पाचव्या दिवशी १ अर्ज व सदस्य निवडणुक करिता १५ उमेदवार नी अर्ज दाखल केले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यात १७ नोव्हेंबर शेवटची तारीख आहे यामुळे अर्ज दाखल करण्याची गती पुढील काही दिवसात वाढण्याची शक्यता आहे.

अर्ज दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी बळोरगी अश्पाक मुस्तफा योनी ऊर्ज दाखल केला आहे. नगर पालिका सदस्यसाठी प्रभाग ४ अ मधुन मोरे कल्लाप्पा लिंबाजी (४अ) पाटील सिद्धाराम रामेश्वर (१० ब) समाने रामचंद्र नागनाथ - (८ब ) यादव प्रियांका राजेश - (१२ क) आरती उत्तम गायकवाड - (११अ) (२फॉर्म) प्रभाग ७ ब साठी शिंदे अमृता खंडेराया प्रभाग ५ ब साठी लांडगे सौरभ संजय - यांनी ऊर्ज दाखल केला आहे.

प्रभाग २ ब साठी धनशेट्टी लक्ष्मीकांत काशिनाथ - व धनशेट्टी सोनाली लक्ष्मीकांत - (२ब) प्रभाग ११ अ साठी प्रियांका सचिन मडीखांबे - ११अ (२ रा) प्रभाग १० ब साठी देविदास कवटगी - (१० ब) कवटगी भाग्यश्री देविदास (१०अ). प्रभाग ४ अ साठी अविनाश रेवाप्पा मडीखांबे (४अ) प्रभाग क्र ३ अ साठी बळोरगी मुस्तफा अश्पाक (३ अ) प्रभाग क्र ४ अ साठी हरवाळकर नागेश सातप्पा (४अ) अर्ज सादर केला आहे.

## स्मिता जडे यांना महामृत्युंजय वाङ्मय पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १५ नोव्हेंबर-**

गडचिरोली येथिल नाट्यश्री कलामंचाचा राज्यस्तरीय महामृत्युंजय वाङ्मय पुरस्कार स्मिता प्रविण जडे यांच्या 'रुजता हलकेच' या कवितासंग्रहाला जाहीर झाला आहे. अशी माहिती संयोजक चुडाराम बल्हारपुरे यानी दिली आहे.



या पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. परशुराम खुणे यांच्या हस्ते आणि गडचिरोली इथल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रचित सावकार पोरेड्डीवार यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दिनांक ७ डिसेंबर रोजी गडचिरोली इथल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात होणार आहे. रोख रक्कम, सन्मान चिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. असेही बल्हारपुरे यांनी सांगितले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद, दामाजीनगर शाखेने हे पुस्तक प्रकाशित केले असुन स्मिता जडे यांचे पहिलेच पुस्तक आहे. या पुस्तकाला ज्येष्ठ कवियत्री प्रा.मनिषा पाटील यांची प्रस्तावना असुन पाठराखण ज्येष्ठ साहित्यिका डॉ.स्मिता पाटील यांनी केली आहे. अर्थपूर्ण मुखपृष्ठ अंधळगावच्या चित्रकार निकिता पाटील यानी रेखाटले आहे. त्यांना मिळालेले या पुरस्काराबद्दल साहित्य वर्तुळातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## आजपासून ऑनलाईन संस्कृत संभाषण वर्ग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ नोव्हेंबर-**

सर्वात प्राचीन, समृद्ध अन् शास्त्रीय भाषा म्हणून संस्कृतची ओळख आहे. ही सर्वांना समजावी. बोलता यावी यासाठी संस्कृत भारतीच्या वतीने १६ ते २५ नोव्हेंबर या कालवधीत सकाळी ८ ते १० यावेळेत ऑनलाइन संस्कृत संभाषण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे बहुतांश भारतीय भाषांची जननी असलेली संस्कृत भाषा सध्या केवळ ग्रंथामध्ये बंदिस्त असलेली देवभाषा आहे. ही संस्कृत लोकभाषा व्हावी यासाठी संस्कृतभारती ही संघटना कार्य करते. संस्कृतचा प्रचार, प्रसार, संवर्धनाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. या अंतर्गत ऑनलाइन विनामूल्य संस्कृत संभाषण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या मोफत शिबिरात हसत-खेळत, सोप्या पद्धतीने शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये संभाषणातून ही भाषा बोलण्यास शिकविले जाते. दहा दिवसांत विद्यार्थी दैनंदिन जीवनातील काही वाक्ये । संस्कृतमधून बोलून एकमेकांशी संवाद नाही. शिबिरात सहभागी होण्यासाठी https://tinyurl.com/SV-SOLPUR या लिंकवर क्लिक करून या शिबिरासाठी नोंदणी करता येते. अधिक माहितीसाठी संयोजक निखिल बडवे (मो. ९९७०६७६०९०) वर्गशिक्षक जितेश सोनार (७५८८०२१२२) यांच्याशी संपर्क साधावा. थेट व्याकरण न शिकवता परस्पर संभाषणातून शिक्षण देण्यात येते. यासाठी संस्कृतचे पूर्व ज्ञान असणे आवश्यक नाही. १५ वर्षांपासून पुढील वयाचे कोणीही यामध्ये सहभागी होऊ शकते. इतर कुठलीही अट या प्रवेशासाठी नाही.



## मोडनिंब येथे बिहार विजयाचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १५ नोव्हेंबर-**

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप आघाडीने (एनडीए) एकहाती सत्ता मिळवत मोठा विजय मिळवला. या विजयानंतर मोडनिंब (ता. माढा) शहरातील भाजप कार्यकर्त्यांनी दत्त चौकात जल्लोष करीत फटाक्यांची आतषबाजी केली. भारत माता की जय, वंदे मातरम, भाजपाचा विजय असो अशा प्रकारच्या घोषणा देत विजयाचा आनंदोत्सव साजरा केला.फटाक्याची आतषबाजी करून, पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला. बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवत मोठा विजय मिळवला.

या विजयामुळे देशात पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या धोरणांवर जनतेने विश्वास दर्शवल्याची भावना यावेळी भाजपा शहराध्यक्ष राहुल गांधी यांनी व्यक्त केली. या ऐतिहासिक विजयानंतर मोडनिंब शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. भाजप कार्यकर्त्यांनी फटाक्यांसह जोशपूर्ण घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

यावेळी किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष गणेश सुर्वे, सरचिटणीस धनाजी लादे, तालुका उपाध्यक्ष नितीन सुर्वे, कैलास तोडकरी, संतोष पाटील, मोडनिंब शहराध्यक्ष राहुल गांधी, शहर सरचिटणीस अमोल काटकर, सुनील पंडित, अनुसूचित जाती शहराध्यक्ष प्रमोद गाडे, ओबीसी सेल शहराध्यक्ष संपत महामुनी, किसान मोर्चा शहराध्यक्ष लखन पाटील, वैभव पाटील, संजय शेळके, ज्ञानेश्वर लादे, रोहन शिंदे आदी उपस्थित होते.

## नमस्ते सदा वत्सले मातृभूमी : संघ प्रार्थना

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग - ७**

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

सकाळची प्रार्थना ही आपल्या हृदय मंदिराचे कुलूप उघडते तर रात्रीची प्रार्थना आपल्या हृदय मंदिराचे कुलूप लावते असे म्हटले जाते. प्रार्थनेमध्ये मोठी शक्ती असते, ताकद असते, प्रार्थनेचा श्रद्धा हा आधार असतो. प्रार्थना हे बंधन असते, प्रार्थनेमुळे माणूस एखादी गोष्ट करण्यासाठी आत्मविश्वासाने तयार होतो म्हणूनच संघाच्या नित्यशाखेमध्ये शाखा समाप्तीपूर्वी प्रार्थना घेतली जाते. या प्रार्थनेतून आपल्या देशाला परम वैभवापर्यंत नेण्यासाठी मी कटिबद्ध असल्याची भावना स्वयंसेवक व्यक्त करतात. नमस्ते सदा वत्सले मातृभूमी ही सध्या प्रचलित असणारी प्रार्थना संघ स्थापनेपासूनची नाही.

सुरुवातीच्या काळामध्ये संघ कार्याचा विस्तार केवळ महाराष्ट्रात होता, त्यामुळे नमो मातृभूमी जिथे जन्मलो मी अशी मराठीतून प्रार्थना होती. पुढे देशभर संघ कार्याचा विस्तार होत असताना हे प्रभो श्रीरामदूता शील हमको दिजीये अशी हिंदीतून प्रार्थना करण्यात आली. जवळ जवळ पंधरा वर्षे या दोन्ही प्रार्थना संघ शाखेमध्ये म्हटल्या जात होत्या. पुढच्या काळामध्ये संपूर्ण देशभरात समजेल अशी संस्कृत भाषेतून प्रार्थना तयार करण्यासाठी सन १९३९ च्या फेब्रुवारी महिन्यामध्ये वर्धा जिल्ह्यात सिंदी या गावी नानासाहेब टालाटुले यांच्या वाड्यात दहा दिवसांची बैठक झाली. या बैठकीमध्ये डॉ.केशव हेडगेवार, श्री.गोळवलकर गुरुजी, श्री.बाळासाहेब देवरस, श्री.बाबासाहेब आपटे, श्री.अप्पाजी जोशी व श्री.नानासाहेब टालाटुले यांनी सहभाग घेऊन चर्चा केली. संस्कृतमधून प्रार्थना तयार करण्यासाठी काही मुद्दे ठरविण्यात आले व ते सांगलीतील काका लिमये, पुण्यातील विनायकराव आपटे व नागपूरमधील नरहर नारायण भिडे यांच्याकडे पाठवून संस्कृत प्रार्थना तयार करण्याची या तिघांवर जबाबदारी देण्यात आली. नागपुरातील संस्कृततज्ज्ञ व मोहिते वाडा शाखेचे तत्कालीन कार्यवाह श्री.नरहर नारायण भिडे यांनी आपले गुरु महामुखोपाध्याय डॉ.श्री.केशव गोपाळ धामण यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या प्रचलित असणारी संस्कृत प्रार्थना तयार केली. २३ एप्रिल १९४० रोजी पुणे संघ शिक्षा वर्गात डॉ.हेडगेवार यांच्या उपस्थितीत संघ प्रचारक श्री.यादवराव जोशी यांनी प्रथम प्रार्थना गायन केले तर नागपूर संघ शिक्षा वर्गात श्री.गोळवळकर गुरुजींच्या उपस्थितीत प्रथम प्रार्थना म्हटली गेली. संपूर्ण प्रार्थना संस्कृतमध्ये असून त्याचा शेवट भारत माता की जय असा हिंदी भाषेतून आहे.

या प्रार्थनेमध्ये संघाची ध्येय - उद्दिष्टे नमूद करण्यात आली आहेत. एखादा गुरुमंत्र स्वीकारल्यानंतर माणूस झपाटल्याप्रमाणे काम करतो, त्याप्रमाणे संघ स्वयंसेवक देखील या प्रार्थनेला जागून काम करताना दिसून येतात. या प्रार्थनेमध्ये वत्सला, हिंदूभूमी, महामंगला, पुण्यभूमी अशी चार विशेषणे मातृभूमीबद्दलची आहेत. हा देश अनादी काळापासून हिंदूंचा आहे, हिंदूंनी या देशात संस्कृती निर्माण केली आहे. या भूमीच्या दर्शनाने पावित्र्याचा भाव निर्माण होतो म्हणून ती महामंगल आहे. देव, देवता, संत, वीर यांच्या सहवासाने ही भूमी पवित्र झाली आहे, अशा या भूमीच्या वैभवासाठी मी माझे समर्पण करतो. या भूमीच्या उत्कर्षासाठी, येथील बांधवांच्या उन्नतीसाठी मी माझे सर्वस्वाचे अर्पण करीत आहे. बलवान असणाऱ्यांनाच यश मिळते म्हणूनच या भूमीला बलवान करण्यासाठी मी सतत प्रयत्न करीन. काट्याकुट्यांनी भरलेला मार्ग असला तरी तो सुगम करून या राष्ट्राला परम वैभवाच्या उच्चतम शिखरावर घेऊन जाण्याचा मी संकल्प करीत आहे. अशा प्रकारे या प्रार्थनेचा भावार्थ आहे. अशी प्रार्थना स्वयंसेवक रोज संघस्थानावर म्हणतात व प्रार्थनेत ठरविलेले ध्येय साध्य करण्यासाठी नित्य काम करत राहतात. संघ प्रार्थनेतील ताकद ही संघ स्वयंसेवकाच्या कार्यातून दिसून येते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अलिपुरात दिवसा घरफोडी; साडेपाच लाखांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ नोव्हेंबर-**

बार्शी तालुक्यातील अलिपूर येथे दिवसा घरफोडीची गंभीर घटना उघडकीस आली आहे. शिक्षक दाम्पंत्याच्या घराचे कुलूप तोडून ५ लाख ६४ हजारांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी बार्शी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रशांत शहाजी गुंड (वय ४३, रा. गुंड प्लॉट, अलिपूर) यांनी फिर्याद दिली आहे. ते आणि पत्नी राणी गुंड दोघेही शिक्षक असून घराची चावी तिघांकडे स्वतंत्र होती. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.४५ ते दुपारी ३.३० दरम्यान चोरट्यांनी सेफ्टी डोअर व लाकडी दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरात प्रवेश करताच हॉलमधील कपडे, शोकेस विस्कटलेले आढळले. बेडरुममधील लोखंडी कपाटाचा दरवाजा व ड्रॉवर उचकटलेले होते. दागिन्यांची पेटी रिकामी दिसून आली. चोरीस गेलेल्या मुद्देमालात सोन्याचे गंठण, नेकलेस, झुमके, वेल, चेन, कंगण, पेंडल तसेच चांदीचे पैंजण, करदोडा इत्यादी दागिन्यांचा समावेश असून किंमत ५ लाख ६४ हजारांची इतकी आहे. घटनास्थळी पंचनामा करुन पोलीस तपास करत आहेत.



# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धुरा पद्मजादेवी मोहिते-पाटील यांच्याकडे

### देवयानी रास्ते ह्या महापौर पदाच्या उमेदवार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १५ नोव्हेंबर-**

डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या कुटुंबियाचा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश झाला असून पद्मजादेवी मोहिते-पाटील यांच्याकडे अकलूज नगर परिषदेच्या निवडणुकीची धुरा देण्यात आली आहे. अकलूज नगरपरिषदेच्या सर्वच्या जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या घड्याळ या चिन्हावर लढविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेच्या अकलूज येथील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना ते पुढे म्हणाले, राकाँचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे मोहिते-पाटील कुटुंबाचा पक्षप्रवेश सोहळा लवकरच होईल. सध्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर औपचारिक प्रवेश व स्वागत करण्यात आले आहे.

मोहिते-पाटील कुटुंब हे पहिल्यापासून पवार कुटुंबाशी निगडित आहे. मध्यंतरी काही गोष्टी घडल्या. परंतु आता त्या दुरुस्त होताना दिसत आहे.

जनसेवा संघटनेची जिल्ह्याबरोबर राज्यात ताकद असून त्याचा फायदा पक्षाला नक्कीच होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पॅनलचे सर्व ए बी फॉर्म पद्मजादेवी मोहिते-पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून नगराध्यक्ष पदासाठी देवयानी सुधीर रास्ते ह्या उमेदवार असणार आहेत, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. यावेळी पद्मजादेवी मोहिते-पाटील, उर्वशीराजे मोहिते-पाटील, तालुकाध्यक्ष शिवाजी देशमुख, निरीक्षक सुरेश पालवे, जिल्हा युवाध्यक्ष अक्षय भांड, माणिकराव मिसाळ, अण्णासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

### राजकारणात कोणाचा तरी पाठिंबा

पद्मजादेवी मोहिते-पाटील याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, राजकारणात कोणाचे तरी पाठिंबा हवा असतो. पक्षसंघटनेने दिलेली जबाबदारी आम्ही निश्चित पार पाडू. आमच्या सर्वच्या सर्व जागा निवडून येतील, अशी आमची खात्री आहे.



# शिवसेना उबाठा गटाच्या जिल्हाध्यक्षांच्या कन्येने 'अपक्ष' म्हणून दाखल केला अर्ज

### राजकीय चर्चांना आले उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १५ नोव्हेंबर-**

कुर्डुवाडी नगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या सहाव्या दिवशी शिवसेना उबाठाचे जिल्हाध्यक्ष धनंजय डिकोळे यांची कन्या साक्षी डिकोळे यांनी नगराध्यक्षपदासाठी अपक्ष अर्ज दाखल केला. त्यामुळे राजकीय वर्तुळातून चर्चांना उधाण आले आहे.

शनिवार, दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी नगराध्यक्ष पदासाठी एक तर नगरसेवक पदासाठी दोन अर्ज दाखल झाले आहेत. नगराध्यक्ष पदासाठी साक्षी डिकोळे यांनी शिवसेना उबाठा गटाचे कुर्डुवाडी शहर प्रमुख कुमार गव्हाणे, यासिन बहामद, माणिक श्रीरामे, भीमा कोळी, महेंद्र मेहता, विशाल गोरे, स्वप्नील गवळी, निखिल धोका, रमण शेंडगे, अभिषेक डिकोळे, धीरज डिकोळे, वीरेंद्र डिकोळे, स्वराज डिकोळे आदींच्या उपस्थितीत अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला.

प्रभाग क्रमांक ४ ब सर्वसाधारण जागेसाठी सोमनाथ चंद्रकांत देवकते यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. प्रभाग क्रमांक ९ ब सर्वसाधारण जागेसाठी मेघना सुमित कोंडबळे यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. दरम्यान, वेळ संपल्याचे कारण सांगत निवडणूक निर्णय अधिकारी सुजित नरहरे यांनी भाजपाचे उमेदवार प्रेमनाथ वसंत आठवले यांचा अर्ज स्वीकारला नसल्याचे सांगण्यात येते.

## महत्त्वाचे



सोलापूर : स्वतःच्या कलेने निर्जीव पदार्थात प्राण फुंकणारे ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.



### बालदिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती शिबीर व शैक्षणिक साहित्य वितरण

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली बालदिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या कॅम्प शाळा येथे कायदेविषयक जनजागृती शिबीर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना त्यांच्या कायदेशीर हक्कांविषयी जागरुक करणे, सुरक्षिततेचे भान निर्माण करणे आणि न्यायव्यवस्थेबद्दल सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणे असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष तदर्थ जिल्हा न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रशांत पेठकर, न्यायाधीश एस. पी. शिलवंत, व्ही. पी. कुंभार व मुख्याध्यापक हारुण बंदुकवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमात मार्गदर्शक विधीज्ञ देवयानी किणगी यांनी बालहक्क, शिक्षणाचा अधिकार, पोक्सो कायदा, बालसुरक्षा या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिबीर यशस्वी करण्याकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे अधिक्षक शमोशोद्दीन नदाफ, विधीज्ञ रेवण पाटील, विधीज्ञ विनायक कुर्ले तसेच विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### कंबर तलावाजवळ रेल्वेच्या धडकेने महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

कंबर तलावाजवळ रेल्वे गाडीच्या धडकेने महिलेचा मृत्यू झाला. नरसम्मा मारूती म्हेत्रे (वय ३५, रा. प्रकाश बापूजी हौसींग सोसायटी, लष्कर, सोलापूर) असे मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. १४ नाव्हेंबर रोजी रात्री पावणे आठच्या सुमारास कंबर तलावाजवळील रेल्वे पटरी पोल क्र. ४५७/२६ च्या अलिकडे रेल्वे पटरीच्या बाजूस डोक्यास जखम झालेल्या अवस्थेत हालचाल न करण्याच्या स्थितीत मिळून आली. त्यामुळे नरसम्मा म्हेत्रे हिस उपचारासाठी सदर बझार पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक एस बी माडे यांनी उपचारासाठी शासकीय रुगणलयात दाखल केले. परंतु, नरसम्मा म्हेत्रे हिचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. श्रीकृष्ण बागल यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# न.प. निवडणूक अर्ज भरण्यासाठी होणारी गर्दी लक्षात घेता वाहतुकीचे नियोजन आवश्यक

### अक्कलकोट नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी रस्सीखेच

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ नोव्हेंबर-**

अक्कलकोट नगरपरिषदेच्या २५ नगरसेवक व नगराध्यक्ष पदाकरिता सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता ही नामनिर्देशन अर्ज भरण्याचा अंतिम दिवस आहे. त्यामुळे नगरपरिषद कार्यालय समोर प्रचंड गर्दी होण्याची शक्यता असून नगरपरिषद समोरुन जाणाऱ्या वाहतुकीचे नियोजन होणे आवश्यक आहे.

नामनिर्देशन अर्जाची छाननी व वैध अर्जाची घोषणा १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ पासून तर १९ ते २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत नामनिर्देशन अर्ज माघार घेता येणार आहे.



दरम्यान, नगर परिषद सदस्य व नगराध्यक्ष पदाकरिता भाजपाकडे इच्छुकांची संख्या जास्त आहे. यापाठोपाठ शिंदे गट शिवसेनेकडे नंतर शिवसेना उबाठा, काँग्रेस, राष्ट्रवादी अजित पवार व शरद पवार राष्ट्रवादी गट असा क्रम लागण्याची शक्यता आहे.

तर दुसरीकडे अक्कलकोटच्या नगराध्यक्ष पदासाठी मोठी रस्सीखेच होणार आहे. या पदासाठी भारतीय जनता पार्टीकडून मिलन कल्याणशेट्टी, काँग्रेसकडून अश्पाक बळोरगी, शिंदे शिवसेनेकडून रईस टिनवाला यांचे तर शिवसेना उबाठा व राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्याकडून आयत्या वेळेत उमेदवार प्रकट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी होतोय त्रास

### मोहोळ नगरपालिकेसाठी आजपर्यंत एकूण १० अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १५ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकांच्या निवडणूक प्रक्रियेला आता गती येत आहे. पहिल्यांदा ऑनलाईन अर्ज दाखल करायचे असून मग त्याची प्रिंट ऑफलाईन सादर करायचे आहे. मात्र ऑनलाईन अर्ज करताना सर्वर डाऊन होत असल्याचा त्रास उमेदवार किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांना होत असल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, मोहोळ नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारी अर्ज भरण्याच्या चौथ्या दिवशी ९ जणांनी तर गुरुवारी १ असे एकूण १० अर्ज दाखल झालेले आहेत.

मोहोळ नगरपालिकेसाठी आजपर्यंत अर्ज दाखल करण्यात आलेले उमेदवार,



पक्ष याप्रमाणे (कंसात प्रभाग क्रमांक) रणजीत रामकिसन देशमुख, शिवसेना उबाठा (प्रभाग-२), अजय अनिल कुर्डे, शिवसेना (प्रभाग-२), नूरजहाँ नसरुद्दीन मोमीन, अपक्ष (प्रभाग-३), सीना दिनकर गडदे, शिवसेना (प्रभाग -१०), कुरेशी अझरुद्दीन अनिस आणि भारती भारत बरे, दोघेही भारतीय जनता पार्टी (प्रभाग-७), प्रमोद मोहन डोके, भाजपा (प्रभाग-८) कुरेशी अझरुद्दीन अनिस आणि बरे भारती भारत (प्रभाग-१०), चैतन्य पद्माकर देशमुख, शिवसेना (प्रभाग १०).

# पानगावात भरदिवसा घर फोडून सहा तोळे दागिन्यांची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ नोव्हेंबर-**

तालुक्यातील पानगाव येथे शेतकऱ्याचे बंद घर भरदिवसा फोडून चोरट्यांनी लोखंडी कपाटातून ६ तोळ्यांचे दागिने चोरुन नेल्याची घटना घडली. ही घटना १३ रोजी सकाळी ११ ते ५ च्या दरम्यान घडली. याबाबत बापू भीमराव गाडे (वय ५२, रा.पानगाव) या शेतकऱ्याने तालुका पोलिसांत फिर्याद दिली असून पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेत ७ ग्रॅम कर्णफुले, मंगळसूत्र, दीड तोळे गळ्यातील हार, सहा ग्रॅमच्या सोन्याच्या साखळ्या, पाच ग्रॅम सोन्याचा वेल, दोन ग्रॅमचे मणी, पाच ग्रॅमच्या सोन्याच्या दोन अंगठ्या, पाच भार चांदीची जोडवी, दहा भार हातातील चांदीचे कडे अशी तीन लाखांची चोरी झाली. या दिवशी फिर्यादी हे त्यांची आत्या मानेगाव येथे आजारी असल्याने तिला पाहायला गेले होते. त्यावेळी त्यांची पत्नी व मुलगा हे घरास कुलूप व गेट लावून शेतात गेले होते. सायंकाळी पत्नी व मुलगा शेतातील काम संपवून घरी ६ वाजता येताच घराचे गेट उघडून आत येताच घराचा कडी कोयंडा उचकटलेला दिसला. आत डोकावताच मधला दरवाजा उघडा दिसला. त्याचवेळी फिर्यादी हेही आले. त्यांना लोखंडी कपाटाचा दरवाजाउघडा दिसला. याबाबत चुलत भाऊ दयानंद गाडे यांना कळविले. त्यानंतर फिर्यादीने व पत्नीने डोकावले असता कपाटातील ड्रॉव्हरमधून दागिने दिसले नाहीत. याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय भालेराव करीत आहेत.

# थंडीची चाहूल; विठुरायाला उबदार कपड्यांचा पोशाख

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ नोव्हेंबर-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत आसलेल्या पंढरीच्या श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचा थाटच काहीसा न्हारा आहे. कारण ज्या त्या ऋतुमाना प्रमाणे सावळ्या विठ्ठल आणि रखुमाईला वेगवेगळे कपडे परिधान करण्याची परंपरा आहे. ऐवढेच नव्हे तर ऋतुमाना प्रमाणे त्यांच्या खानपानाची देखील व्यवस्था असून ज्या त्या ऋतुमानाला योग्य होईल असे पदार्थ नैवेद्या मध्ये त्यांना दाखविले जात असतात. त्यामुळे गरीबांचा देव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विठ्ठलाचा थाट मोठा आहे.

सध्या थंडीचा मौसम सुरु झाल्यामुळे पहाटेच्या थंडीत विठुरायाला उबदार कपड्यांचा पोषाख करण्यात येत आहे. दोन हात करवती काठाच्या उपरण्याची कानपट्टी बांधून उबदार शाल पांघरण्यात येत आहे, तर रात्री शेजारती नंतर रझई पांघरण्यात येत आहे. त्या मुळे थंडीच्या उबदार वातावरणात राजस सुकुमार असलेल्या सावळ्या विठुरायाचे रुप अधिकच लोभस असे भासत आहे.



विठोबा रखुमाईस प्रक्षाळपूजे पासून दररोज रात्री तसेच पहाटे उबदार कपड्यांचा पोषाख करण्यात येत आहे. पहाटेच्या नित्यपूजा वेळीच देवाला दोन हात करवती काठाच्या उपरण्याची कानपट्टी बांधून उबदार शाल पांघरण्यात येत आहे, तर रात्री शेजारती नंतर रझई पांघरण्यात येत आहे. रुक्मिणी मातेला ही उबदार शाल पांघरण्यात येत आहे, हा पोशाख थंडी संपेपर्यंत राहणार आहे अशी माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे प्रभारी व्यवस्थापक राजेंद्र राऊत यांनी दिली.

# जिल्ह्यातील मराठा बांधवांना ५२ हजार ४२४ दाखले वितरण

## कागदपत्रांच्या त्रुटींमुळे ५०३ जणांना दाखले नाकारले; जिल्हा प्रशासनाची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हा महसूल प्रशासनाच्यावतीने जिल्ह्यातील मराठा बांधवांना कुणबी, मराठा कुणबी आणि कुणबी मराठा अशा ५२ हजार ४२४ दाखल्यांचे वितरित केले असून, पुराव्यात खाडाखोड, वंशावळ जोडण्यात चुकी, पुरावे सादर न केल्याच्या कारणावरुन ५०३ जणांचे कुणबी दाखले देण्याचे नाकारले असल्याची माहिती महसूल प्रशासनाकडून देण्यात आली. दरम्यान, कागदपत्रांच्या त्रुटी दूर केल्यानंतर या ५०३ जणांनाही हे दाखले वितरण करण्यात येणार असल्याचा निर्वाळाही त्यांनी दिला आहे.

### पंढरपूर विभागात सर्वाधिक अर्ज नामंजूर

पंढरपूर उपविभागीय कार्यालय अंतर्गत असलेल्या गावांतून कुणबी दाखल्यासाठी ८ हजार ६७८ अर्ज सादर झाले होते. यात ८ हजार २४० अर्ज मंजूर झाले असून, तब्बल ४३८ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. वंशावळ व्यवस्थित न जोडल्याने आणि त्याचे पुरावे सादर न केल्याच्या कारणावरुन सादर केलेले दाखल्याचे अर्ज नाकारण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यात ६ उपविभागीय कार्यालये असून, या कार्यालयाकडे कुणबी दाखल्यांसाठी ५२ हजार ९३४ अर्ज प्राप्त झाले होते. यात छाननीनंतर ५३ हजार ४२४ जणांना कुणबी दाखले वितरित करण्यात आले आहेत. तर ५०३ जणांचा कागदपत्रांच्या त्रुटींमुळे अर्ज बाद करण्यात आला आहे. वरील दाखले २४ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर या कालावधीत वितरीत करण्यात आले आहेत.

उपविभागीय कार्यालय सोलापूर क्रमांक १ या कार्यालयाकडे २२ हजार ४६३ अर्ज प्राप्त झाले असून, यात २२ हजार ४५७ जणांचे अर्ज मंजूर करुन कुणबी दाखला वितरीत करण्यात आला आहे. पुराव्यातील खाडाखोडमुळे दोन जणांचा अर्ज बाद करण्यात आला आहे. तर उपविभागीय कार्यालय सोलापूर क्रमांक २ या कार्यालयाकडे ११७ जणांचे अर्ज दाखल झाले असून, ५३ जणांना दाखले देण्यात आले. तर वंशावळ न जोडण्याच्या कारणावरुन ६३ जणांचे अर्ज नामंजूर करण्यात आले.

उपविभागीय कार्यालय, माढा विभाग कुर्डूवाडी कार्यालयाकडे २० हजार ७८७ जणांचे अर्ज प्राप्त झाले असून, यातील २० हजार ७८५ जणांना दाखले देण्यात आले आहेत.

उर्वरित दाखल्यांवर प्रक्रीया सुरु आहे. मंगळवेढा उपविभागीय कार्यालयाकडे १३३ अर्ज प्राप्त असून, सर्वच्या सर्व १३३ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. तसेच अकलूज उपविभागीय कार्यालयाकडे ७५६ अर्ज प्राप्त झाले असून, प्राप्त सर्व दाखले मंजूर करुन वितरीत करण्यात आले आहेत.